नागपूर प्रकाशन क्रमांक—३५

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय :..............
दा. क्र. : बा.वा. ३३८५

# विचित्रिता

( सहा नभोनाटिकांचा संग्रह )

अलका मुखोपाध्याय

शंकर बाळाजी शास्त्री

IRBK-0103398

सीताबर्डी * नागपूर प्रकाशन * नागपूर.

গ্রা০ সং০
৩৩৫৫

नागपूर प्रकाशन क्रमांक—३५

# विचित्रिता

( सहा नभोनाटिकांचा संग्रह )

अलका मुखोपाध्याय

शंकर बाळाजी शास्त्री

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ३०४०८
विभाग
क्रमांक २५४८
नों. दि.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय विभाग
वा. क्र. ३८ नों. दि ..........
वि. ..................

IRBK-0103398

सन १९५० ] सीताबर्डी नागपूर प्रकाशन नागपूर. [ किंमत २ रु.

प्रकाशक—
**दिगंबर मारुती धुमाळ,**
नागपूर प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर.

ह्या संग्रहांतील नाटिकांसंबंधी सर्व प्रकारचे अधिकार
**श्री. शं. बा. शास्त्री,** रामदास पेठ, नागपूर
ह्यांचेकडे आहेत.

मुद्रक—
**लक्ष्मणराव मनाजी पटले,**
रामेश्वर प्रिंटिंग प्रेस, सीताबर्डी, नागपूर.

# रेडिओ सुरू करण्यापूर्वी

नभोवाणीवरून श्रुतिकांचा प्रसार आजकाल फार झपाट्याने होऊं लागला आहे, आणि ह्या निमित्ताने वाङ्मयाच्या प्रांगणांत एक नवें दालन उघडलें गेलें आहे असें म्हटलें तर वावगें होणार नाहीं. 'नवें' म्हणण्याचें कारण असें कीं रेडिओवरून यशस्वीपणें ध्वनिक्षेपित होण्यासाठीं, त्या माध्यमाला अनुकूल अशा तंत्राचा अवलंब करून लेखकाने आपली 'श्रुतिका' लिहिली तरच ती परिणामकारक होऊं शकते; नाहींतर ह्या तंत्र-गुणाच्या अभावीं, एरव्हीं अनेक दृष्टींनी समृद्ध अशी रचनाहि अशी-तशीच ठरल्यावाचून राहत नाहीं, ही गोष्ट श्रोत्यांनी अनेकदां अनुभवली आहे.

हें नवें नभोनाट्यानुकूल तंत्र कोणतें ह्याबद्दल जेव्हां मी विचार करूं लागलों तेव्हां, स्वानुभवाने व आपल्या बुद्धीप्रमाणें मी कांहीं प्रयोग करून पाहिले. त्यांपैकीं कांहीं यशस्वी झाले, तसे कांहीं फसलेहि. शेवटीं अनुभव हाच सर्वोत्कृष्ट शिक्षक ही गोष्ट ह्या बाबतींतहि मला पटली. त्या बरोबरच, ह्या दिशेनें विचार करीत असतां, माझ्या एका स्नेह्याने माझ्या हातीं कांहीं नभो-नाटिकांचें पुडकें दिलें. त्यांपैकी प्रत्येक, नभोनाट्याच्या लेखनांत सिद्धि मिळविण्यासाठीं आवश्यक अशा एकाद-दुसऱ्या गुणाचा आविष्कार करण्याच्या हेतूनें लिहिण्यांत आली होती. ते गुण कोणते व ते कोणत्या प्रकारें उपयोगांत आणतां येतील त्याचीं उदाहरणें म्हणून ह्यांपैकीं कांहीं श्रुतिका मी मराठी वाचकांसमोर ठेवीत आहें. प्रस्तुत नभोनाटिकांचें संपादन करणाऱ्या अलका मुखोपाध्याय ह्यांचें ह्या बाबतींत म्हणणें असें:—

"नभोवाणीचा अवतार ज्यावेळीं झाला, त्यावेळीं गच्चीवर लावलेल्या 'एरिअल'च्या दोन खांबांमधून संगीताचे स्वर, किंवा मधून मधून रंगभूमी-वरील लांबलचक पंचांकी नाटकांचें अंगविच्छेदन करून त्यांना दिलेलें नभो-नाट्यरूप सोडून दुसरें कांहीं कधीं ऐकायला मिळेल असं फारसें कोणाला वाटलें

नव्हतें. जीर्ण मतवादाच्या शृंखलेनें ज्यांना बांधून ठेवलेलें आहे, त्यांच्या मनांत अजूनहि अशाच प्रकारची धारणा वास करीत असलेली दिसते. ह्या धोरणच्या मागें बरींचशीं कारणेंहि आहेत; त्यांपैकीं कांहीं विशिष्ट कारणें थोडा विचार केला असतां लक्षांत येणें कठिण नाहीं.

“ह्या नवीन यंत्राच्या किंमतीचें परिमाण योग्य आहे असें सिद्ध करण्याचा त्या काळांत, एकमात्र उपाय ह्या अल्पमूल्य आविष्काराच्या साह्याने घरांतल्या घरांत बसून एकादें लोकप्रिय नाटक ऐकण्याची सोय करणें हाच होता. म्हणूनच प्रारंभीच्या त्या काळांत रेडिओ कार्यक्रमांतील बहुतेक वेळ गाणें आणि नाटकें ह्या दोन लोकप्रिय उपायांनीच भरून काढलेला असे.

“ह्या कालावधींत घरोघरीं ग्रामोफोननें गाण्याची आवड निर्माण करून ठेवली होतीच; पण गायन ही गोष्टच मुळांत अशी आहे कीं ती माणसाला दृष्टीने कधींच पाहतां येत नाहीं. ती फक्त कानांनी ऐकूं येते. रेडिओवरील गाण्यांच्या व ग्रामोफोनच्या गाण्यांच्या बाबतींत जो एक फरक आहे, आणि ज्या बाबतींत रेडिओला ग्रामोफोनवर वरकडी करतां आली, तो म्हणजे गाणाऱ्याच्या व्यक्तित्वाचें स्पंदन,—ज्याला इंग्रजींत म्हणतात Personal touch. पण नेमकी ह्याच बाबतींत नभोनाट्यांचे बाबतींत अडचण पुढें उभी राहिली. नभोवाणीवरील नाटकें पाहिली जाऊं शकत नाहींत, तीं फक्त ऐकलींच जाऊं शकतात, ह्या वस्तुस्थितीकडे कोणाचें फारसें लक्ष गेलें नाहीं. हा मूलगामी भेद लक्षांत न येण्याचें कारणहि होतें. प्रारंभाच्या काळांत नभोवाणीवरून जीं नाटकें प्रसारित केलीं जात, त्यांच्याशीं कलवांतून, संमेलनांतून किंवा प्रत्यक्ष सुसज्जित रंगभूमीवरून श्रोते अगोदरच परिचित झालेले असत. म्हणून, तेंच नाटक आपल्या दिवाणखाण्यांत बसल्या बसल्या ऐकण्याचा योग आला, आणि अमुक अमुक नटवर्य किंवा नटी विशिष्ट भूमिका वठवीत असतांना त्यांचा स्वर कानानी ऐकायला मिळाला, कीं मग, त्यांचा चेहेरा प्रत्यक्ष डोळ्यांनी दिसत नसला तरी फारसें बिघडत नसे. कानांनी रेडिओवरील नाटक ऐकत असतांना, तेंच नाटक पूर्वी जेव्हां केव्हां पाहिलेलें असेल त्यावेळची रंगभूमीवरील सजावट,

पात्रांचा अभिनय इत्यादि गोष्टी आपोआपच श्रोत्यांच्या मनश्चक्षूपुढें उभ्या राहत. म्हणूनच घरबसल्या चालून आलेली ही करमणूक श्रोत्यांना बरी वाटली. विशेषेंकरून, अनेक कारणांमुळें रंगभूमीवर चाललेलें नाटक प्रत्यक्ष पाहणें घरांतल्या बायकांना सोयीस्कर होत नसल्याकारणानें, त्यांना तर रेडिओवर हीं नाटकें ऐकण्याचा योग फारच उपयुक्त वाटूं लागला. त्याशिवाय ह्या मार्गानें नाटक ऐकण्यांत एक नवीनपणा होता, तो निराळाच ! घरांतलीं कामें चाललेलीं आहेतच, चहा-चिवडयाची बैठक जमली आहे, हंसणें-बोलणें सुरूं असतांनाच चालू असलेल्या रेडिओकडेहि मधून मधून लक्ष देताहेत आणि त्यामुळें आपल्या आनंदांत भर पडते आहे, ह्यांत जो एक प्रकारचा सहज आनंद आहे त्याचें आकर्षण मनाला भुरळ पाडल्यावाचून राहत नाहीं. त्याशिवाय, केवळ पैसाच नाहीं, तर अनेक अडचणी पत्करून नाटक सिनेमा पहायला जाण्याची तयारी करून, त्यापायीं दोन-चार तासहि खर्च करायचे, आणि जें पाहून आलों त्यावर, शेवटीं, वेळ आणि पैसा फुकट गेला किंवा वाजवीपेक्षां अधिक खर्च झाला म्हणून जी वादावादी व्हायची, तीहि रेडिओच्या नाटकाच्या सोईमुळें सहज टळली. तीन-तीन दिवस अगोदर माणसाला पाठवून तिकिटें रिझर्व करा रे, टॅक्सि, टांगा, रिक्षा इ. पायीं खर्च करा रे, मग तासन् तास गर्दीत गुदमरत, खुर्चीवर ताटकळत बसा रे !– ह्या सर्व संकटांतून नभोनाटयानें प्रेक्षकांची एकदम सुटका केली.

"दररोज दुपारच्या वेळीं नाटकें वगैरे कार्यक्रम नियमितपणें ऐकायला मिळूं लागतांच घरांघरांतील बायकामंडळींत आनंदाचें वातावरण निर्माण झालें. त्यांनी नभोवाणीबद्दल प्रशंसेचे उद्गार काढायला सुरुवात केली. अंतःपुरांतील हे प्रशंसोद्गार रेडिओच्या दप्तरांत द्विगुणित होऊन उठले. आणि ह्या सहज प्रशंसेचा सरळ मार्ग आधारासाठीं घेऊन नभोवाणीवरील नाट्य आपला मार्ग चोखाळूं लागलें. नुसतें ऐकणें, आणि पाहणें व ऐकणें, ह्या दोहोंच्यामधें एक फार मोठें, प्रचंड व्यवधान आहे, ह्या सहज लक्षांत येण्याजोग्या सत्याकडे कोणाची दृष्टि गेलीच नाहीं. परिणाम असा झाला कीं 'नभोनाटय' म्हणून

कांहींच निर्माण झालें नाहीं; जें झालें तें रंगभूमीवरील पांच अंकी नाटकांची नभोवाणीवरील आवृत्ति !

" नभोनाट्य-अथवा श्रुतिका-केवळ ऐकायलाच येतें, तें पाहिलें जाऊं शकत नाहीं हें अगोदरच सांगितलें आहे, आणि तीच सर्वांत अधिक महत्वाची गोष्ट आहे. पण मूलतः नाटक, मग तें नभोवाणीसाठीं असो अथवा रंगभूमीसाठीं असो, ह्या दोन जातींच्या मधोमध सीमारेषा टाकून त्यांना दोन स्पष्ट भागांत विभाजित करणें शक्य नाहीं. एवढेंच सांगतां येणें शक्य आहे कीं एकाचा केवळ ऐकूनच आस्वाद घेणें संभवनीय आहे, आणि दुसरें ऐकतां तर येतेंच, वर पाहतांहि येतें. गोष्ट दिसायला लहानच आहे, आणि तिचें पूर्ण रूप लक्षांत घेतलें तर पुष्कळच अडचणी नाहींशा होतील. पण आश्चर्य असें कीं आजहि पुष्कळसे लोक नभोवाणीसाठीं नाटक लिहायला बसले म्हणजे आंखतात, 'अंक पहिला, दृष्य पहिलें' !

" अंकाला स्थान असलें तरी दृष्याला नभोनाट्यांत स्थान नाहीं. म्हणूनच रंगभूमीवरील नाटक जसें दृष्यप्रधान असतें, तसें हें शब्दप्रधान असतें. येथें शब्द म्हणजे भाषा, आंगिक शब्द आणि संगीत, असं मला म्हणायचें आहे.

" नभोनाट्य शब्दाश्रयी असल्यामुळेंच तें स्वल्पायु असतें. रंगभूमीवरील निरनिराळीं दृष्यें पाहण्यांत आणि नाटकांतील अनेक सुदर्शन-सुदर्शनांचे चेहरे मनांत घोळवीत वेळ सहजच निघून जाऊं शकतो; पण घरांतल्या साधारण वातावरणांत, केवळ शब्द कानांनी ऐकून, तें शक्य होत नाहीं. डोळ्यापुढें साकार मूर्ति ठेवून ध्यान करणें आणि सीमाहीनाची केवळ कल्पना करूनच ध्यान करणें ह्यांत जो भेद, तोच पुष्कळसा ह्या बाबतींतहि आहे. ह्याशिवाय, आणखीहि एका बाबतींत भिन्नता आहे. रंगभूमीवरील नाटकांत एका प्रवेशांत एका पात्राला पाहिल्यानंतर बऱ्याच काळानंतर पुन्हा दुसऱ्या एखाद्या प्रवेशांत त्यालाच पाहिलें म्हणजे ओळख पटायला अडचण नसते; पण नभोनाट्याची गोष्ट तशी नाही. एका पात्राचा स्वर कल्पनेच्या बाहेर काढून फेंकल्यानंतर पुन्हां तोच नव्याने कानांवर आदळला म्हणजे ओळखायला अडचण वाटल्यावाचून राहत नाहीं.

म्हणूनच, ह्या नाटकांचे बाबतींत मनोयोगाची फार मोठ्या प्रमाणांत गरज असते. आणि म्हणून, सबंध दिवसाचे श्रम संपवून संध्याकाळचे वेळीं विश्रामरत मनाला पावलोंपावलीं, क्षणोक्षणीं, लगाम खेचून, टाच देऊन, चाल कायम ठेवण्यांत जे श्रम असतात, जो ताण असतो, तो फार वेळपर्यंत टिकवणें कठिण असतें एकाग्रतेच्या बाबतींत मन साधारण माणसांचीं शासनबंधनें फारशीं जुमानीत नाहीं. नभोनाट्याच्या कालावधीच्या बाबतीत हें एक फार मोठें व्यवधान आहे.

"नभोनाट्य अशा रीतीने स्वल्पायु असतें, म्हणून ह्यांत उपयोजिल्या जाणाऱ्या शब्दविन्यासाचें रूप विशिष्ट प्रकारचें असणें आवश्यक आहे. त्याच प्रमाणें, नाट्योपकरणाच्या बाबतींत वैशिष्ट्य आणि लेखनाची पद्धतीहि विशेष प्रकारची असणेंहि तितकेंच आवश्यक आहे शाई-लेखणीच्या बंधनांत जखडून ती विशिष्ट पद्धति सीमाबद्ध करतां येणें शक्य नाहीं, हें तर खरेंच. एवढेंच काय तें सांगतां येईल कीं, नभोवाणीसाठी नाटक लिहायला बसलों असतां, आपण हें नाटक आंधळ्यांच्यासाठीं लिहितों आहोंत अशा प्रकारची खूणगांठ जर मनाशी बांधून ठेवली तर मग पुष्कळच सोपें होईल. प्रस्तुत संग्रहांत आलेलीं नाटकें 'मॉडेल' म्हणून उपयोगांत आणलीं जाऊं शकलीं तरी, उदाहरण म्हणूनच त्यांची खरी किंमत आहे. ह्यांपैकीं एक-दोघांवर इंग्रजींतील कल्पनेची छाया पडली आहे; पण छाया तीं छायाच, ती कांहीं काया नव्हे. म्हणून त्या गोष्टीचा प्रामुख्याने उल्लेख करण्याचें प्रयोजन वाटत नाहीं."

ह्या संग्रहांत आलेल्या सहा नाटिकांचें नभोनाट्याच्या दृष्टीने तांत्रिक महत्त्व कसें आहे तें ह्यावरून वाचकाच्या लक्षांत येईल. पण नभोनाट्याचा विषय जरी क्षणभर बाजूला ठेवला, तरी निव्वळ एकांकिका म्हणूनहि ह्या नाटिका बहुगुणी ठरल्यावाचून राहणार नाहींत. प्रसंगविशेषीं त्यांचे प्रयोग फार यशस्वी होतात हा अनुभव आहे. बंकिमचंद्र, रवींद्रनाथ आणि शरच्चंद्रांशीं चांगल्याच परिचित असणाऱ्या मराठी वाचकांना व साहित्यमर्मज्ञांना शेवटची नाटिका निराळ्या अर्थानेहि वाचनीय वाटेल अशी खात्री आहे.

**शं. वा. शास्त्री.**

# ना ग पू र प्र का श न,

## सी ता ब र्डी, ना ग पू र

★

## प्रकाशित वाङ्मय

| | | |
|---|---|---|
| १ | माझें कादंबरी लेखन | १॥ |
| २ | वीणा | ३ |
| ३ | ऌढवय्ये | ३ |
| ४ | शककर्ता शालिवाहन | २॥ |
| ५ | परामर्श | ३ |
| ६ | प्रमद्वरा | २॥ |
| ७ | द्राविडी प्राणायाम | २। |
| ८ | अमावास्या | २॥ |
| ९ | कंगाल | २। |
| १० | अडेलतट्टू | ४ |
| ११ | प्रत्यय | २॥ |
| १२ | पुन्हां एकदां | ४ |
| १३ | माझी शीला | १॥ |
| १४ | मृगाचा पाऊस | २ |
| २५ | दोन घडीचा डाव | ३। |
| १६ | म्हणे लढाई संपली | १॥ |
| १७ | लांब लांब सांवल्या | २ |
| १८ | तेरी चूप मेरी चूप | २ |
| १९ | दोन प्रख्यात युद्धतंत्रें | २ |
| २० | सन १८५७ चें स्वा. यु. | -॥- |
| २१ | नवीं मूल्यें | ४ |
| २२ | सखी | २॥। |
| २३ | सावलीच्या उन्हांत | ३ |
| २४ | जीवनप्रवाह | २॥ |
| २५ | हंसदूत | २। |
| २६ | मार्क्सवादी अभ्यासक्रम | १॥ |
| २७ | तिसरें राज्य | ॥= |
| २८ | इंदिरा | २॥। |
| २९ | गोल देऊळ | ३ |
| ३० | दूर कुठें तरी | २॥। |
| ३१ | जगाला कळलं पाहिजे | ३॥ |
| ३२ | कालसमुद्रांतील रत्नें | ४ |
| ३३ | लकेरी | ३ |
| ३४ | मधु | २॥ |
| ३५ | विचित्रिता | २ |

★

★ ★

# मुखवंटा

ह्या नाटिकेंत केवळ शब्द आणि साधारण संवादाच्या माध्यमांतून नाट्य-प्रसंग अगदी प्रारंभापासूनच अनुभवास येतात. रहस्यमयता कायम ठेवून केवळ कथेची कलापूर्ण उभारणी करीत असतांना श्रोत्याच्या मनावर परिणाम घडविण्यास योग्य तेवढाच वेळ लागतो, आणि 'शेवटी काय झालें' तें जाणण्याच्या उत्सुकतेपायीं, मधल्या विलंबामुळें, ऐकणाऱ्याच्या मनांत कंटाळा उत्पन्न होत नाहीं. थोडी पात्रें, त्याहूनहि थोडी घटना-स्थळें आणि घटनाक्रमाला लागणारा थोडासाच कालावधि ह्या तीन गोष्टी नभोवाणीवरील नाटक यशस्वी होण्यास पुष्कळच सहाय्य करतात, ह्याचें उदाहरण म्हणून हें नाटक उल्लेखनीय आहे. केवळ भाषेची सजावट नाहीं, सहज रोमांचकारी घटनाहि नाहीं, आणि तरीहि ज्यांत रहस्यांचे आकर्षण पुरेपूर आहे, आणि एकंदरींत जें श्रोत्याची सहानुभूति आकर्षित करून ठेवूं शकतें, अश्या स्वरूपाचें नाटक नभोवाणीसाठीं विशेष उपयुक्त ठरतें. हें नाटक पुष्कळसें अश्याच जातीचें आहे.

अभिनय काळः—३५ मिनिटें.

# मुखवटा

[ गिरणीच्या भोंग्याचा आवाज; मधून-मधून यंत्रांचा भयंकर घर घराट; कधीं मधीं अस्पष्ट असा ग्राम-गीतांचाहि आवाज. ]

**प्रवक्ता**:—सभ्यतेच्या कक्षेच्या बाहेर, शहरापासून वीस पंचवीस मैल अंतरावर खाणीच्या भोवतालची वसती. येथे खाण-कामगार राहतात. थोडेसे छोटे छोटे बंगलेहि आहेत आणि कारखान्याची उंचच उंच चिमणीहि आहे. येथे शहर वस्तीतील कोलाहल नाहीं, केवळ यंत्रांची एकसारखी घर घर........

सूर्यास्त होऊन बराच वेळ लोटला आहे. अद्यापि चंद्रोदय झालेला नाहीं. एका छोटेखानी बंगल्यातील एका खोलींत दोन व्यक्ति बसलेल्या आहेत, पुरुष आणि स्त्री, अरुण आणि संध्या!

अरुणचे तोंड काळयाकभिन्न मुखवटयाखालीं झांकलेलें आहे. त्यांत दोन ठिकाणींच फक्त छिद्रें आहेत,—एक नाक आणि तोंडाचे ठिकाणीं आणि दुसरे उजव्या डोळयाच्या जागीं.

अरुण कांहींसा अन्यमनस्क,–चिंताक्रान्त आहे.

खिडकींतून पलीकडे अंधार, आणि आकाशांत चमकणाऱ्या अनंत तारका दिसताहेत. आणखी, जवळच कारखान्याची उंच चिमणीहि दिसते आहे. खिडकीच्या चौकटीवर हात ठेवून अनंत आकाशा कडे दृष्टि लावून संध्या उभी आहे.

उभयतांच्या गांभीर्यामुळें खोलींतील वातावरण कोंदट झाल्यासारखें झालें आहे.–हळू हळू रात्र अधिक होते आहे—

[ कारखान्याचा भोंगा वाजतो. ]

ग्रंथ संग्रहालय
३०४८०८
मुखवटा
मा.वा.
२८४
नों. दि. ४-४-६१

**प्रवक्ता**:—निस्तव्धतेची छाती चिरीत कारखान्याचा भोंगा चीत्कारून उठला.—

[—कांहीं क्षणांची स्तब्धता—]

**संध्या**:—आज तुम्ही काहीं खाल्लं नाहीं ?

**अरुण**:—अंहं !–भूक नाहीं.......

[ पुन्हां निस्तव्धता. ]

**संध्या**:—तुमची जाण्याची वेळ झाली. भोंगा मघाशींच झाला.

**अरुण**:—ऐकला मी.......

**संध्या**:—अंधार जास्तच वाढतो आहे....आणखी उशीर लावाल तर अंधारांत वाट दिसणं कठिण होईल. काळोखांत,–तुमच्या डोळ्यावर झांपड........

**अरुण**:—मला डावा डोळा नाहीं हें खरं; पण म्हणून मला कमी दिसतं असं मात्र नाहीं...पुष्कळांना त्यांच्या दोन डोळयांनी जितकं दिसतं त्यापेक्षां अधिक मी माझ्या एकाच डोळ्यानं पाहूं शकतों !

**संध्या**:–तें आहे ठाऊक. तुमची ताकद काहीं अशी तशी नाहीं.... डोळ्यासारखा डोळा गेला, पण जसं काहीं तुमचं नुकसान काहीं झालंच नाहीं. ( थांबून ) तुम्हाला परत यायला बराच उशीर होईल का ?

**अरुण**:—कदाचित् !

**संध्या**:—डॉक्टरकडे जाल ?

**अरुण**:—हं. अगोदर डॉक्टरकडे जाऊन त्याला डोळा दाखविणार आहे मी.

**संध्या**:–हा डॉक्टर म्हणे फारच हुशार म्हणून नावाजलेला आहे ?

**अरुण**:—असायलाच हवा. त्या शिवाय माझा गेलेला डोळा मला परत मिळणार कसा ?....हें घे संध्या, मी आपल्या तोंडावरचा हा

मुखवटा थोडावेळ बाजूला काढून ठेवला बघ. एकदां शेवटचं माझं तोंड नीट डोळे भरून पाहून घे. कोणी सांगावं ? पुन्हां कदाचित् तुला अशी संधि मिळणारही नाहीं ?....हेंच कदाचित् शेवटचं !

**संध्या**:—[ अस्फुट चीत्कार करीत ]···नको, नको ! तुमचा हा मुखवटा दूर करूं नका !–मला भिती वाटते !

**अरुण**:—[ कर्कशपणें हंसून ] आपल्या नवऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याची सुद्धां तुला भिती वाटते,···खरं ना ? ( त्याचें तें कर्कश हंसणे जणू थांबण्याचें चिन्हच नाहीं,–प्रतिध्वनित होऊन पुन्हां पुन्हां तें कानावर आदळतेंच आहे. ) माझ्याशीं तुझं लग्न म्हणजे तुझ्या-साठीं केवढा भयंकर शाप ठरला तें आज मला कळलं. तुला हवा होता, सुंदर, देखणा पति ! पण मी त्या अपघातांत सांपडलों, अन्....

**संध्या**:—आतां आणखी त्या अपघाताची गोष्ट काढूं नका.

**अरुण**—तुझ्या दुर्दैवाबद्दलच विचार येतात मनांत.–पण तूं काहीं म्हण संध्या, लग्नाच्या वेळीं मी खरोखरीच खूब सुंदर, देखणा होतों.—हो, खरोखरीच. मला तूं किती हवी हवीशी वाटत असस ! माझ्या मनांत आशा फुलली होती, गर्वहि भरला होता ! मनांत म्हणत होतों, मी काहीं कमी देखणा नाहीं. तुझ्यासारख्या सुंदर स्त्रीला घेऊन मी आपला संसार थाटीन ! प्रदीपचं तुझ्यावर प्रेम होतं; पण त्याच्या पासून मी तुला हिसकावून आणलं.–दैव त्या वेळीं हंसत होतं ! पण–आज जर प्रदीपची········

**संध्या**:—प्रदीपच्या गोष्टी कशाला ?–त्याच्याशीं अन् आमच्या लग्नाशीं काय संबंध ?

**अरुण**:—मला ठाऊक का नाहीं संध्या, त्याचं तुझ्यावर प्रेम होतं,–अन् तुझंहि त्याच्यावर प्रेम होतं !

**संध्या**:—प्रदीप बद्दल गोष्टी नकोतच पण.

**अरुण**:—हं ! प्रदीपबद्दल गोष्टी नकोतच !....प्रदीप !.... प्रदीप !....[ पुन्हां तो खदखदून हंसला. ]

**संध्या**:—तुम्हाला आज झालं आहे काय ? असं काय करतां आहांत तुम्ही आज ?–एवढा चांगला डॉक्टर, तुम्हाला बरं करूं नाहीं शकणार ?

**अरुण**:—हं !–निदान, काम करूं शकण्याइतपत तरी तो मला बरा करूं शकेल, ह्यांत शंका नाहीं !

**संध्या**:—पहावं तेव्हां काम, काम !–कामाशिवाय तुम्हाला दुसरं काहींच सुचत नाहीं !

**अरुण**:—त्या शिवाय दुसरं आहे काय आयुष्यांत ?

**संध्या**:—तें मलाहि ठाऊक आहे, अरुण !–अन् म्हणूनच मधून मधून माझ्या मनांत विचार येतो, माझ्याशीं तुम्ही लग्न तरी कशाला केलं ? तुम्हाला स्त्रीची गरज तरी कोणती वाटली ? तुमचं लग्न लागलं आहे तुमच्या कामाशीं ! तुमचं कामच तुमचं सर्वस्व आहे !

**अरुण**:–होय. माझं काम हेंच माझ्या जीवनाचा एकमात्र आधार आहे, खरं आहे. मी ग्लासगोहून एन्जिनिअरिंगची परीक्षा देऊन आलों तेव्हांपासूनच माझं काम हाच माझ्या विचाराचा एकमेव विषय बनला आहे. जमिनीची छाती फोडून तींतून ऐश्वर्याचं भांडार, कोळसा, सोनं, टिन, अभ्रक, हें सारं कसं बाहेर काढतां येईल, हाच विचार सतत माझ्या मनांत असतो.–त्या दिवशीं, त्या रात्रीं मला माझ्या कल्पने-प्रमाणें यशहि अगदीं आल्यासारखंच होतं.

**संध्याः**—केव्हां ? अपघात झाला, त्या दिवशीं ?....

**अरुणः**—हं !—त्याच भयंकर रात्रीं.—आज पुन्हां तो प्रसंग माझ्या मनापुढें उभा आहे. मॅनेजरला सांगून मी पिटमध्यें खालीं उतरलों.—मला फार वाटत होतं, आज मी अभ्रकाची अशी एक खाण शोधून काढीन कीं तिच्यांतून हवं तेवढं अभ्रक बाहेर काढतां येईल !—आणखी मग कामच काम. त्या खाणींत मी हजार हजार माणसांना कामें देऊं शकेन ! हजार हजार लोकांना अन्नाला लाऊं शकेन ! हजारों वर्षां-पासून जमिनीच्या पोटांत दडून बसलेली ही अपार संपत्ति माझा हस्तस्पर्श होतांच सजीव होऊन उठेल,—जगाच्या उपकारासाठीं ती मातीचा कोट फोडून बाहेर येईल ! लोकांना मिळेल अन्न, मिळेल काम !—काम, केवळ काम !—पण सारं—सारं संपलं !—आतां आयुष्यभर मी माझ्या पत्नीच्या पुढें बसून राहणार,—तुझ्या तोंडाकडे नुसतं पाहत !—खरं कीं नाहीं संध्या ? अन्, कोणी सांगावं ? कदाचित् माझ्या साऱ्या आयुष्य-भर, हा मुखवटा असाच तोंडावर ठेवूनच मला दिवस काढावे लाग-तील !—पण, म्हणून काय बिघडलं ? माझी पत्नी किती सुंदर आहे, साऱ्या जगांत तिच्या सौंदर्याला तोड नाहीं, हें तरी मी पाहूं शकेनच ना ! माझ्या कामाचा तुला पूर्वी राग यायचा; पण आतां तर तुला आनंद झाला ना ?—पुन्हां तूं माझ्यावर पूर्वींसारखंच प्रेम करूं लाग-शील, नाहीं का संध्या ?—हें काय ? अशी भितीनं दचकून दूरशी सरकलीस ?···[ पुन्हां हंसतो ]

**संध्याः**—छे, छे !—भितीनं नाहीं !—

**अरुणः**—[ आपल्या मनाशींच ]—सारे म्हणतात, माझ्या बायको सारखी बायको मिळायला भाग्य हवं !—तूं आपल्या पतीची सेवा-चाकरी

करतेस, तुझ्या आंधळ्या पतीला प्रकाश दाखवितेस!–त्या रात्रीचा प्रकार मला आजहि चांगला आठवतो. खाणींतल्या त्या अपघातांत माझे डोळे गेले, अन् शुद्धहि गेली; त्यानंतर महिन्यामागून महिनें, मी एखाद्या अजाण अर्भकाप्रमाणं अंथरुणावर नुसता पडून होतों.– माझ्या जिवाला केव्हां दगा–फटका होईल त्याचा भरंवसा डॉक्टरलाहि नव्हता,–अन् तूं,! तूं, दिवसामागून दिवस, रात्रीं मागून रात्री, एकसारखी माझ्या अंथरुणाशीं बसून राहिलीस! झोप नाहीं, जेवण-खाण नाहीं, विश्रांति नाहीं!–तुला एकच काळजी, मी बरा कसा होईन!–तुझा पति अरुण कधीं बरा होईल!–खरंच, संध्या, माझ्यासाठीं तूं किती कष्ट सोसलेस!—

**संध्याः**–जाऊं द्या तें.

**अरुणः**–जाऊं द्या, काय म्हणून? खरोखरच मी मरून गेलों असतों तर हें सारं कुठें बोलतां आलं असतं मला?–बरं पण कां ग संध्या, मी त्या प्रसंगांतून वाचेन, बरा होईन, पुन्हां तुझ्याशीं गोष्टी बोलूं शकेन, असं तुला तरी तेव्हां वाटलं होतं का?—

**संध्याः**–तुमची जायची वेळ होऊन गेली.

**अरुणः**–आहे ठाऊक. मी कांहीं विसरलो नाहीं तें. तूं तर जशी कांहीं मला हांकून लावायलाच बसली आहेस!– इथें तुला एकटीला भिती बिती तर वाटणार नाहीं ना, मी बाहेर गेलों म्हणजे?

**संध्या**:–भिती?–भिती कशाची?

**अरुणः**–आज काळोख नेहमीपेक्षां अधिकच आहे जरा! हे निशाचर पक्षी सुद्धां आज काहींशी जास्तच आरडा ओरड करताहेत. ह्यांचं हें केकाटणं ऐकलं की वाटतं, शतकानुशतकांचा विक्षुब्ध आत्मा

हमसा हमशी रडतो आहे जसा काहीं. मनाला वाटतं, आज कुठें तरी, कोणतं तरी भयंकर कारस्थान शिजतं आहे ! शिवाय, रात्रींचं असं एकटयानं राहण्याचा प्रसंग तुझ्यावर आलाहि नाहीं कधीं !—सारे नोकरहि आज रजा घेऊन गेले आहेत.

**संध्याः**—खाणींच्या त्या मशीन–घरांतून जातांना जरा सांभाळून जा. त्या मेल्या जागेची मला भारी भिती वाटते.

**अरुणः**—( हंसून ) भिती वाटण्यासारखी जागा आहेच मुळीं ती ! मशीनमधें एकदां जर का कोणी सांपडला तर एका मिनिटाच्या आंत त्याचा अक्षरशः चेंदामेंदा होऊन पार !—तूं काळजी करूं नकोस ! मी सांभाळूनच जाईन् तिथून. तुला खरं सांगू ? त्या यंत्रानं आजवर किती माणसं आपल्या पोटांत गडप केलीं असतील, कोण जाणे. कोणी काम करतां करतां मेले, कोणी आत्महत्या केली,—अन् कोणाचा खून करण्यांत आला !—पण एकाचाहि राई एवढातरी तुकडा हातीं लागला असेल तर शपथ !—पण जाऊं द्या तें.—मी जातों. तूं नीट सावधपणानं रहा.

**संध्याः**—परत आलांत म्हणजे दाराची कडी चांगली मोठयानं खडखडून वाजवा.—माझा डोळा लागला तर ऐकूंहि नाहीं यायचं.

**अरुणः**—ठीक आहे.

**प्रवक्ताः**—संध्येच्या तोंडाकडे एकदां नीट न्याहाळून पाहून तो निघून गेला. जाताना तो म्हणालाः—

**अरुणः**—नीट, सावधपणानं रहा, बरं का !—

**प्रवक्ताः**—अरुण निघून गेला, संध्येचा जीव जणूं काय भांडयांत पड़ला. काहीं वेळपर्यंत ती खिडकीशीं उभीच होती. अरुण गेला, त्या

वाटेकडे तिने मान उंचावून काहीं तरी पाहिलें. त्यानंतर ती खिडकी जवळून मागे आली, मनांत काहीं विचार केला आणि पांढरी साडी बदलून ती एक काळी साडी नेसून आली. काळीकुट्ट अंधारी रात्र! रात्रीच्या छातीवर निस्तब्धतेने जणूं काय अत्यंत निष्ठुरपणें आपले पाय पक्के रोवले होते,—

[ संकेताची शीळ ]

ह्या निस्तब्धतेचा भंग करीत शीळ वाजून उठली. पहिल्यांदा वाटलं, ही कोणीतरी निशाचर पक्ष्याची व्यथित किंकाळीच असावी !– पण दुसऱ्या खेपेलाच तिचा संकेत स्पष्ट ध्यानांत आला. संध्या लग-बगीने खुर्चीवरून उठली व खिडकीशीं गेली, मान उंचावून ऐकूं लागली. काहीं दिसेना, म्हणून परत येउन खुर्चीवर बसली.–पुन्हां संकेत–ह्या खेपेला शीळ नाहीं, दारावर हलकी थाप !–संध्या दचकून उठून उभी राहिली.

**संध्या**:–कोण ?

**प्रवक्ता**:–ती दाराजवळ गेली. दारावर कान ठेवून गुपचूप उभी राहिली- कोणाची तरी छायामूर्ति खिडकींतून हळूच डोकावून गेल्याचा भास झाला.—संध्या खिडकीशीं येऊन उभी राहिली. दारावर पुन्हां हलकेच थाप पडली. पुन्हां, पहिल्यापेक्षां किंचित् जोरानें–नेपथ्यांतून कोणीतरी दाबलेल्या स्वरांत हांक मारली—

**प्रदीप**:–संध्या !—संध्या !—संध्या !—

**संध्या**:–कोण ?

**प्रदीप**:—दार उघड.

**संध्या**:–कोण,–तुम्ही ?

**प्रदीप**:–भ्यालीस संध्या ?–मी प्रदीप.

**संध्या**:–किती रे भिववलंस मला ! माझी छाती बघ कशी अजून देखील धडधडते आहे.—पहिल्यांदा तर मला वाटलं, अरुणच परत आले ! तूं एकादे दिवशीं खरोखरीच पंचाइत ओढवून आणशील माझ्यावर !—बाहेरच्या फाटकापलीकडेसुद्धां गेले नसतील ते !—

**प्रदीप**:–खिडकीखालच्या जाईच्या वेलीआड मी दडून बसलों होतों. अरुण फाटक उघडून बाहेर गेलेला मी स्पष्ट पाहिला.–पण तूं अशी दूर दूर कां ? जीवनांत व्यवधानं तर आहेतच लागलेलीं. मीलनाचा हा क्षणस्थायी वसन्त वाया कां दवडतेस उगाच ?

**संध्या**–घाई कसली एवढी ?–तुझ्यासाठीं बघ आज मी एक अशी सुंदर वस्तु आणली आहे, कीं—

**प्रदीप**:–मला भुलवूं पाहतेस ?—पण, तुला स्वतःला सोडून दुसरी कोणतीहि वस्तु मला भुरळ पाडूं शकणं शक्य नाहीं !–वा: ! ही साडी चांगलीच खुलून दिसते तुला ! अमावास्येचा मूर्तिमंत अंधःकारच जणूं ! काळं आकाश वरून जणूं कांहीं खालीं जमिनीवर अवतरलं आहे !

**संध्या**:–खरंच ?–तुझी आपली नेहमी थट्टाच !

**प्रदीप**:–तुला तसंच वाटणार ! चंद्र आकाशांत उगवतो तेव्हां त्याला कल्पना तरी असते का, पृथ्वीवर शेकडों कवी त्याच्याकडे टक लावून पाहत, आकंठ अमृत-पान करतात, अन् काव्य-सरोवरांत यथेच्छ डुंबून चिरंतन कीर्ति संपादन करतात म्हणून ? स्कायलार्कला उद्देशून शेलेनं जेव्हां आपली कविता रचली तेव्हां आकाशांत उंच भराऱ्या

मारणाऱ्या त्या पक्ष्याला कल्पना तरी होती का, आपण किती सुंदर आहोंत त्याची ?

**संध्या**:–थांबलास कां ?—आणखी असाच बोलत रहा!

**प्रदीप**:–आणखी बोलण्याची शक्ति असती माझ्या ठायीं, तर कवि अन् कामिनीचं मूर्तिमंत क्रीडाकाव्य मी साकार उभं करून दाखविलं असतं !—पण जाऊं दे तें !–संध्या, आज ही काळी साडी काय म्हणून ?–विलायती दृष्टीनं काळं म्हणजे अशुभ चिन्ह !

**संध्या**:–आज माझ्या लग्नाचा वाढदिवस ! चार वर्षांपूर्वीं आजच्याच दिवशीं माझं लग्न झालं.

**प्रदीप**:–मग तर तुला आज पांढरी शुभ्र साडीच नेसायला हवी होती.

**संध्या**:–नेसली असती, जर लग्नाचा दिवस मला लग्नाप्रमाणं वाटत असता तर ! आज माझ्या लग्नाच्या श्राद्धाचा दिवस वाटतो मला ! म्हणूनच आजला शुभ्र चंद्रिकेप्रमाणं नाहीं, काळ्याकुट्ट अमावास्येप्रमाणंच साडी योग्य !–थांब, हा पडदा ओढून घेतें जरा.

**प्रदीप**:–अरुण केव्हां परत येणार आहे ?

**संध्या**:–कुणाला ठाऊक !

**प्रदीप**:–आज पुष्कळ दिवसानंतर कामावर गेला तो, नाहीं ? आजकाल त्याचा स्वभाव कसा विचित्र बनला आहे ग ?

**संध्या**:–हं !–भयंकर कठोर, निष्ठुर !....प्रदीप—

**प्रदीप**:–काय संध्या ?

**संध्या**:–[ दीर्घ निःश्वास सोडून, थोडें हंसून ]—नाहीं, काही नाहीं !—

**प्रदीप**:–सांग ना, संध्या !

**संध्या**:–[ अत्यंत चंचल भावाने,–जणूंकाहीं, स्वतःला आवरणं अशक्य होऊन–]—प्रदीप, वेड लागेलसं वाटूं लागलं आहे मला ! त्यांचा तो मुखवटा,–मुखवटा !—मला सहन होत नाहीं तो ! दिवसामागून दिवस, रात्रींमागून रात्री—

**प्रदीप**:–पण ह्या मुखवटयाआडचं त्याच्या चेहेऱ्याचं दृष्य, —तें तर त्या मुखवटयापेक्षांहि अधिक भयंकर आहे, संध्या.

**संध्या**:–ठाऊक आहे मला.—त्यांच्या चेहऱ्याकडे डोळा उचलून पाहण्याचं सामर्थ्य माझ्या अंगीं नाहीं.—त्या दिवशीं अशीच अंधारी रात्र होती. अरुणांना गाढ झोंप लागली होती, पण मी जागी होतें.–त्या भयंकर अंधारांत माझ्या मनाला वाटूं लागलं, हा मुखवटा जणूं काय मला गिळायला येतो आहे,–भयानक पिशाच्चासारखं रूप धारण करून तो माझ्या जवळ–जवळ येतो आहे,–हळू हळू,–एखाद्या विराटकाय दैत्यासारखा !–मी किंकाळी फोडली आणि त्यांच्या तोंडावरून तो मुखवटा काढून मी फेंकून दिला,—पण त्या मुखवटयाखालीं झाकलेलं तें—तें त्याचं तोंड !–तें त्यापेक्षांहि अधिक भयंकर, अधिक पैशाचिक होतं ! मला त्या खोलींत मग क्षणभर देखील थांबवेना. मी उठून खालीं आलें !—[ किंचित् काळ थांबून ती पुढें बोलूं लागली ]–आणखी एका दिवसाची गोष्ट मला आठवते. अरुण बागेंत काहीं तरी काम करीत होते. एकाएकीं वाऱ्याचा जोराचा झोत त्यांच्या तोंडावर आला, अन् सबंध मुखवटा त्यांच्या तोंडावर अगदीं घट्ट, चिकटून बसल्यासारखा बसला. दुरून मला वाटलं, हें तोंड नाहीं, ही तर प्रेताची कवटी आहे !

**प्रदीपः**—संध्या, पुरे कर हें !

**संध्याः**—तुला हें कसं कळणार प्रदीप !—दिवसामागून दिवस, रात्रींमागून रात्री, मला हेंच पहावं लागतं, मला त्यांच्यावर प्रेमहि केलं पाहिजे. कारण मी त्यांची पत्नी आहें !—माझं कर्तव्य मला करायलाच पाहिजे !—

**प्रदीपः**—ह्यांतून सुटकेचा कोणताच का मार्ग नाहीं, संध्या ?

**संध्याः**—[ आपल्याच नादांत बोलते आहे ]—त्यांच्या बद्दल मला दु:ख वाटत नाहीं—ममताहि वाटत नाहीं. त्यांच्या कठोरतेला सीमा नाहीं. सहन करण्याची त्यांची शक्ति देखील विलक्षण आहे....मला भिती वाटते, भारी भिती वाटते ! एकादे वेळीं ते आपलं तें बीभत्स तोंड घेऊन माझ्याकडे पाहत बसले कीं इकडे माझा श्वास गुदमरायला लागतो....वाटूं लागतं, जशी कांहीं मी डोक्यापासून पायांपर्यंत नुसती दगड बनलें आहें !—अन् मग मला त्यांचा तिरस्कार वाटूं लागतो!—पूर्वीं ते आपल्या कामात गुंग रहायचे, माझी आठवणहि त्यांना व्हायची नाहीं. त्यावेळीं मला वाटायचं, हे माझी अवहेलना करताहेत!—एक घटकाभरच कां होईना, पण ते अगदीं माझे, माझे म्हणून माझ्याजवळ यावे म्हणून मी एकान्तांत बसून किती अश्रू ढाळले आहेत !—अन् आज !—आज त्यांना काम नाहीं, आज ते सर्वस्वी माझ्याच आश्रयावर अवलंबून आहेत,—पण मला त्यांची किळस येते, तिरस्कार वाटतो !

**प्रदीपः**—अन्, माझ्याबद्दल संध्या ?

**संध्याः**—तें जाणण्याची इच्छा तर तूं कधींच दाखविली नाहींस प्रदीप !—तुझ्याबद्दल काय वाटतं !—हं: !—पण,—

**प्रदीपः**—मी तुझ्यावर नेहमींच प्रेम करीत आलों आहें, संध्या !

**संध्या**:–पण त्याबद्दल पूर्वीं तूं कधीं उच्चार सुद्धां केला नाहींस!—जेव्हां बोललास, तेव्हां वेळ निघून गेली होती!—सारं संपलं होतं ! .

**प्रदीप**:–कधीं तरी योग्य संधि मिळेल अशी मी वाट पाहत होतों—

**संध्या**:–वाट पाहत होतास !–अन् ते येऊन मला हिसकावून घेऊन सुद्धां गेले ! मला तो दिवस आठवतो. खाण पाहण्यासाठीं मी बाबांच्याबरोबर आलें होतें. मशीन-रूमच्या जवळ जेव्हां आम्ही आलों तेव्हां चारी बाजूला संध्याकाळची छाया खालीं उतरूं लागलेली होती. अरुण त्या वेळीं नुकतेच विलायतेहून परत आलेले होते. मशीन-रूमच्या वरच्या भागाला ते उभे होते. संध्याकाळच्या त्या गोरज-मुहूर्तावर, दाट निळ्या आकाशाखालीं उभे असलेले ते स्वप्नलोकांतील एकाद्या राजकुमारासारखे मला वाटले!—मी मुग्ध होऊन त्यांच्याकडे पाहतच राहिलें—

**प्रदीप**:–मग ?

**संध्या**:–मग ?—मग काय?—कोणाबद्दल सांगू ? माझ्या बद्दल कीं त्यांच्याबद्दल ?—त्यांनीं माझ्याकडे पाहिलं, अन् ते थबकून जागच्याजागींच उभे राहिले.—त्यांची ती निर्वाक् दृष्टि जणूं काय एकच गोष्ट कंठरवानं ओरडून सांगत होती,–हवं होतं ते मिळालं !

**प्रदीप**:–त्यानंतर ?

**संध्या**:–त्या नंतर ते आमच्या घरीं येऊं—जाऊं लागले.—हं !—तऱ्हेतऱ्हेच्या विषयांवर आमचीं बोलणीं होत.

**प्रदीप**:–तुझं त्याच्यावर प्रेम जडलं होतं ?

**संध्या**:–कुणाला ठाऊक ?—कदाचित् त्यांची इच्छा असावी, —मी त्यांच्यावर प्रेम करावं, अगदी मनापासून.—

**प्रदीप**:–तूं मिळावीस म्हणून तो वेडयासारखा नाहीं झाला ? लग्न करावं म्हणून उत्कंठा नाहीं लागली त्याला ?

**संध्या**:–हँ ऽ !—एक दिवस त्यांनी बाबांच्या जवळ गोष्ट काढली. बाबांनीहि संमति दिली. आपल्या जवळच्या अनेक उपभोगाच्या सुंदर वस्तूंप्रमाणं माझ्यावरहि आपली सत्ता असावी, अशी त्यांची इच्छा होती, एवढंच !

**प्रदीप**:–पण, तूं लग्नाला संमति दिलीस काय म्हणून ?

**संध्या**:–कोणत्या बळावर ' नाहीं ' म्हणूं ?—तूं तर त्यावेळी दूर असामच्या जंगलांत होतास !—

**प्रदीप**:–विचार केला होता, नोकरी मिळवूनच परत जावं. कामापायीं तीं रानं तुडवीत हिंडत असतांना तुझ्याबद्दलचेच विचार माझ्या मनांत सारखे घोळत असायचे. क्षणोक्षणीं वाटायचं, जणूं काय तूं माझ्या जवळ उभीच आहेस. कल्पनेंतच मी तुझ्याशीं किती तरी गोष्टी बोलायचा. झाडावरचं वाळलेलं पान ' सळ सळ ' करीत खाली पडलं म्हणजे त्याचा तो ध्वनि ऐकून मनाला वाटायचं, तूंच मला हांक मारते आहेस,—हळूं,—अगदीं हळूं, कानाशीं तोंड आणून, तूं दाबलेल्या दीर्घ निःश्वासाच्या आडून मला बोलावते आहेस,–'प्रदीप '!–

**संध्या**:–प्रदीप !—प्रदीप !—आज देखील माझं मन तुला तसंच साद घालीत आहे.......अगदीं तसंच !—तूं पुन्हा माझ्या जीवनांत ये ना !

**प्रदीप**:–येईन !–संध्या, तुझ्या जीवनाच्या प्रवाहांत मी पुन्हा प्रवेश करीन !–अगदी अनंतकाळपर्यंत !–संध्या, अपघात घडैला तो दिवस तुला आठवतो ?

**संध्या**:–त्याचा विसर मला कधींहि पडणार नाहीं.

**प्रदीप**:–त्याच दिवशीं मी असामहून परतलों होतों. सुट्टी घेऊन. तुझ्या विवाहित जीवनाच्या अवहेलनेच्या गोष्टी ऐकत ऐकत, शेतांच्या कडेकडेनं मी पायींच तुझ्याकडे यायला निघालों.—आकाशांत तारकांचा समुदाय निःशब्दपणे माझ्याकडे टकमकां पाहत होता.–एकाएकीं प्रचंड, गगनभेदी आवाज झाला, खाणीतल्या अपघाताचा ! डोक्यावर वीज कोसळल्या सारखंच मला वाटलं माझ्या !–कदाचित् माझ्या मनांत पाप असेल !....

**संध्या**:–पाप कसचं ?

**प्रदीप**:–निर्जन रात्रीं, परस्त्रीला बरोबर घेऊन अनंताकडे धांवत सुटणं,–ह्याला पापच समजत आलों होतों मी !

**संध्या**:–अन् आज ?—आजसुद्धा मी परस्त्रीच आहें !

**प्रदीप**:–पण आज हें मला पाप वाटत नाहीं ! अन्याय वाटत नाहीं. आजचं हें, अगोदरपासून मनाशीं ठरवून, जुळवून आणलेलं नाहीं.—आज तर हें आपल्या जीवनाचं मूळ प्रयोजनच झालेलं आहे.—प्रेमाच्या प्रबल प्रवाहांत आपल्याला वाहत जाण्याखेरीज....

**संध्या**:–मला देखील तेंच हवं आहे.—कोणीतरी माझ्यावर प्रेम करावं, हीच तळमळ मलाहि लागलेली आहे !–तिरस्कार उत्पन्न होऊन मी आपला पती गमावला, पण त्याच्या बरोबर माझं स्त्रीत्व नाहींसं झालेलं नाहीं.

**प्रदीप**:–केवळ एवढया कारणासाठींच का मी तुला हवासा वाटतों ?

**संध्या**:–नाहीं, नाहीं !—प्रदीप, आयुष्याच्या आरंभापासूनच मी तुझ्यावर प्रेम करीत आलें आहें !–....कोण ?—

**प्रवक्ता**:–वाऱ्यानें पडदा थोडा वर गेला.–पण वारा नाहीं,—एका काळ्या मुखवटयाचा किंचित्सा भाग,–क्षणभरच दिसून पुन्हां दिसेनासा झाला.—

**प्रदीप**:–[ हंसून ] भ्यालीस संध्या ?—वाऱ्यानं पडदा हालला.—हें काय, संध्या ?—तूं कांपते आहेस ? इतकी भिती ?—भिती कशाची ?

**संध्या**:–तुला ठाऊक नाहीं प्रदीप, मी किती भित्री आहें ! मला एकदम वाटलं,—अरुणच परत आले !—तुलादेखील भिती वाटली असेल, ना ?

**प्रदीप**:–कां बरं ? मला कसची भिती वाटायची ?

**संध्या**:–त्यांच्या बायकोबरोबर बसून इथं प्रेमाचे खेळ खेळतो आहेस. त्यांच्याबद्दल विचार मनांत येऊन तुला भिती वाटणार नाहीं ? ह्यावर विश्वास ठेवूं मी ?–तूं इथे वरचेवर येत असतोस हें अरुणला कदाचित् ठाऊकसुद्धां झालं असेल !—

**प्रदीप**:–कळूं दे, कळूं दे त्याला ! त्याला कळूं दे, तुला त्याच्या बद्दल अंतःकरणापासून किळस वाटते म्हणून !– आणखी कळूं दे, माझं तुझ्यावर प्रेम आहे ! संध्या, बोल !–आज पासून तूं माझी ना ?–बोल–

**संध्या**:–प्रदीप,–मी तुझी !– मला त्यांचा तिरस्कार वाटतो !–

**प्रवक्ताः**–खिडकींतून उडी मारून खोलींत प्रवेश करीत अरुण मोठयान खदखदून हंसला. त्याच्या त्या प्रचंड अट्टहास्याने घर जणूं हादरलें! संध्याने किंचाळी फोडली.

**अरुणः**–तुला माझ्याबद्दल तिरस्कार वाटतो, मला ठाऊक आहे. प्रदीपचं तुझ्यावर प्रेम आहे, हेंहि मला ठाऊक आहे.–पण त्याचं स्वरूप असं किळसवाणं, भ्याडासारखं, चरित्रहीनासारखं असेल, असं नव्हतं वाटलं मला. तूं इतका हीन, नीच, सैतान असशील, अशी कल्पना नव्हती मला!– मी घरी नाहीं अशी संधि पाहून—

**प्रदीपः**–सांभाळ, सांभाळ अरुण!–नीच!

**अरूणः**–[ हंसून ] : नीच!–नीच! कोण, मी कीं तूं?—

**संध्याः**–अरुण, !—

**प्रदीपः**–नीच कोण, तेंच तुला दाखवतों मी, थांब!

**संध्याः**–प्रदीप!–अरुण!–

**प्रदीपः**–दूर हो, संध्या! नीच, सैतान,–[ उडी मारून, अरुणचा गळा पकडून ] –नीच कोण, मी की तूं?–एका असहाय अबलेला भुरळ पाडून तिला कायमची दुःखांत डांबून टाकलीस! तूं तिचा पति आहेस, ह्याची खरी जाणीव तिला कधी एक दिवस तरी दिलीस? तिच्या हक्काचं तिला कधी एक दिवस तरी दिलंस तूं?–आपली पत्नी म्हणून तूं कधी एक दिवस तरी तिच्यावर खरं प्रेम केलंस?

**संध्या**–ःप्रदीप, मी तुझ्या पाया पडतें, सोड त्यांना!–

**प्रदीपः**–दूर हो, संध्या।–सैतान कोण तें आज ह्याला दाखवूनच देतों.–[ गळा जोराने दाबतो–पुन्हां–पुन्हां–] सैतान!–पिशाच्च!–

[ त्याला ढकलून देतो. अरुण भिंतीवर आपटतो आणि मग जमीनीवर कोसळतो. ]

**प्रवक्ता**:–संध्या आणि प्रदीप अरुणच्या मातींत लोळणाऱ्यां देहाकडे पाहत उभे राहिले!–संध्या अरुणकडे धांव घेऊं पाहत होती, परंतु प्रदीपने तिचा हात धरून ठेवला. त्याचा स्वत:चा देहहि थरथर कांपत होता. अंधार हळू हळू वाढतच होता. अरुण निश्चल दगडासारखा जमिनीवर पडला होता. त्याच्या तोंडांतून रक्त ठिबकत होतें. प्रदीपचे हातहि रक्ताने माखले होते. आपल्या हातावरील रक्ताकडे प्रदीपचें लक्ष गेलें व तो म्हणाला:—

**प्रदीप**:–हें काय ? –रक्त ! –रक्त ! –संध्या, माझ्या हातावर हें रक्त !—

**प्रवक्ता**:–तो अरुणजवळ गेला आणि त्याच्या देहाला हालवून डोलवून पाहूं लागला. अरुण निश्चेष्ट पडला होता. संध्याहि अरूणजवळ धावली. त्याच्या तोंडावरून हात फिरवीत ती एकाएकीं किंचाळली:—

**संध्या**:–प्रदीप !–प्रदीप ! –रक्त !–माझ्याहातावरहि रक्त !—

**प्रदीप**:–हें व्हावं, अशी माझी इच्छा नव्हती, संध्या !–रागाने वेडावून जाऊन, मी त्याला शिक्षा करण्यासाठीच त्याच्यावर चालून गेलों होतों.–मी–मी–मी खून करण्याची इच्छा कधींच केली नव्हती. मी–तुझ्यासाठी–मी....तो स्वत:च तर माझ्यावर–माझा जीव घ्यायला तोच तर प्रथम माझ्यावर चालून आला. अन् मग स्वत:चं रक्षण करण्यासाटीं —नाहीं, नाहीं, खून करावा, असं मला कधींहि वाटलं....ते–ते मला फांसावर—मी, मी जाऊन डॉक्टरला घेऊन येतों.

**संध्या**:–[ विचलित होऊन ]–कांही नको. आमच्या आजच्या ह्या लग्नाच्या वाढदिवशीं डॉक्टर वगैरे दुसऱ्या लोकांची गर्दी नको इथें!

**प्रदीप**:–मग?–मग काय करायचं आतां, म्हणतेस ?

**संध्या**:–हा मुखवटा !

**प्रदीप**:–मुखवटा ? ? ?

**संध्या**:–हं. मी काय सांगतें तें नीट समजून घे. तुझ्यांत आणि अरुणांत वाहेरून दिसायला तसा फारसा फरक नाही. तुझं चालणं, बोलणं, उठणं–वसणं, सारं कांही बहुतेक त्यांच्याशी जुळणारंच आहे. फक्त तोंडवळा तेवढा निराळा आहे.–प्रदीप, तूं हा मुखवटा तोंडावर ओढून घे आपल्या !

**प्रदीप**:–मी ?

**संध्या**:–हो. तूं.

**प्रदीप**:–तें माझ्याच्यानं होणार नाहीं. लोक मला सहज ओळखतील, अन् मी मग पकडला जाईन.

**संध्या**:–तसं व्हायचं नाहीं.—त्या अपघाताच्या दिवसापासून माझ्याखेरीज अरुण दुसऱ्या कोणाशी कधीं एक शब्दहि बोललेले नाहींत.

**प्रदीप**:–पण संध्या, समज, मी एक अरुण झालों.–पण प्रदीपचं काय ? लोकांनी त्याचा तपास सुरू केला म्हणजे ?–

**संध्या**:–लोकांना कळेल, प्रदीप परत नोकरीवर असामच्या जंगलांत निघून गेला.–कांही दिवसांनंतर तिथें कुठल्यातरी अपघातांत सांपडून तो मेला, असंहि पुढं पसरवतां येईल. मीच ही बातमी चार चौघांत पसरवीन, हवीतर.

**प्रदीप**:–पण आयुष्यभर हा मुखवटा तोंडावर चढवून मिरवणं माझ्याच्यानं होणार नाहीं !–

**संध्या**:—संबंध आयुष्यभर तुला तसं करावं लागणारहि नाहीं. लवकरच आपण इथून दुसरीकडे निघून जाऊं. माझ्या पतीची प्रकृति सुधारण्यासाठी मी त्याला दुसरीकडे नेतें आहें, असं मी सांगेन लोकांना.

**प्रदीप**:–माझ्याच्यानं ते होणार नाहीं, संध्या ! –माझ्याच्यानं तें होणार नाहीं !

**संध्या**:–भेकड !– एवढा प्रयत्न सुद्धां करायला तूं तयार नाहींस ?

**प्रदीप**:—( किंचाळून ) नाहीं.–नाहीं.–माझ्याच्यानं हें होणार नाहीं.

**संध्या**:—( विनवणीच्या स्वरांत )– प्रदीप,–माझ्यासाठीं–तुझ्या संध्येसाठींहि आपला जीव वाचवावंस तुला वाटत नाहीं ?

**प्रदीप**:—पण मग,–अरुणचं हें प्रेत ?–ह्याचं कसं ?—

**संध्या**—त्याचाहि विचार मी केला आहे.–मशीन रूममधें यंत्राखालीं त्याला टाकून देऊं

**प्रदीप**:—मशीन-रूममधें ?

**संध्या**:—हो.–अरुण सांगत असत, त्या यंत्राखालीं आज पर्यंत शेंकडों माणसं कायमचीं झोंपीं गेलीं आहेत. तिथंच अरुणलाहि टाकून येऊं आपण. आपल्या आवडीच्या यंत्रांच्या अन् कामाच्या सहवासांत त्यांना गाढ झोंप लागेल चांगली !–चंद्र वर येण्यापूर्वी अंधारांत आपल्याला हें सारं उरकून घेतलं पाहिजे.–तूं हा मुखवटा तोंडावर चढवून घे.

**प्रदीप**:—( किंचाळत )–नको, नको ?–अरुणच्या तोंडावरून तो मुखवटा काढू नकोस ! तो मी घालणार नाहीं. त्याच्या डोळ्याची ती भयंकर खांच,–माझ्याच्यानं ती पाहवणार नाहीं !—

**संध्या**:—वरं तर थांब. मी दुसरा मुखवटा घेऊन येतें.

**प्रदीप**:–( हताश भावाने )–ठीक आहे !

**संध्या**:–तूं इथें, असा ह्या दारांत येऊन उभा रहा. एकटीला मला भिती वाटते.

**प्रवक्ता**:—संध्या गेली. प्रदीप, ती गेली तिकडे पाहत उभा राहिला. चौकटीवर त्याने आपलं कपाळ टेकलं. त्याचं मन थाऱ्यावर नव्हतं.–अरुण हळू हळू उठून उभा राहिला. तोंडावरचें रक्त त्याने पुसून टाकलें व टेबल धरून तो उभा राहिला. जेवणाची सुरी त्याने टेबलावरून उचलून घेतली व तो प्रदीपच्या मागे जाऊन उभा राहिला प्रदीप दगडा प्रमाणें निश्चल होता. अरुणने ती सुरी अगदी मुठीपर्यंत त्याच्या खांद्याच्या मधोमध खुपसली. अस्पष्ट किंकाळीं फोडून प्रदीप खाली कोसळला.

**संध्या**:—( पलीकडच्या खोलींतून )–काय झालं, प्रदीप ?

**अरुण**:—काहीं नाहीं.

**प्रवक्ता**:—संध्येने तिथूनच दुसरा मुखवटा खोलींत फेकला. ती म्हणाली:–

**संध्या**:–( पलीकडच्या खोलींतून ) तूं मुखवटा घालून तयार हो. मी कपडे बदलून ही आलेंच.

**अरुण**:—ठीक आहे.····

**प्रवक्ता**:—अरुणने आपला मुखवटा प्रदीपच्या व नवा आपल्या तोंडावर चढविला.

**संध्या**:—प्रदीप, कुठं आहेस तूं ?

**अरुण**:—हा इथें.

**संध्या**:—चल प्रदीप, आतां निघूं या.

**अरुण**:—चल.

**प्रवक्ता**:—अश्या प्रकारें, निर्जन, अंधाऱ्या रात्रीं संध्या आणि अरुण प्रदीपचा देह यंत्राच्या बुभुक्षित मुखांत फेंकून आले. प्रदीपचा अतृप्त आत्मा तेथेंच घुटमळत राहिला. तीं दोघें परत आलीं.

**संध्या**:—मला भारी भय वाटतं, प्रदीप !

**अरुण**:—भय ? –( विकट हास्य )–भय ! !

**संध्या**:—असं पिशाच्चासारखं हंसूं नकोस ! मला भारी भिती वाटते !

**अरुण**:—मी खुनी,–खुनी, ! –( पुन्हां हंसतो )–हा मुखवटाच ह्याचं मूळ !

**संध्या**:—प्रदीप, काढून फेंक तूं हा मुखवटा ! मला तो बघवत नाहीं !

**अरुण**:—अन्, कुणी पाहिलं तर ?

**संध्या**:—आज रात्रीं पुरता काढून ठेव तो, प्रदीप ! केवळ आज रात्री पुरता ! मी हात जोडतें प्रदीप, दया कर. काढ तो. माझ्याच्यानं नाहीं पाहावत !

**अरुण**—काढूं ?

**संध्या**—तुझ्या पायां पडतें, प्रदीप !–

**अरुण**—ठीक आहे ! घे तर ! ( मुखवटा काढून फेंकतो )

[ संध्या भीतीनें किंचाळून उठली, अरुण महा भयंकर अट्टहास्य करूं लागला. चारी दिशांतून त्याच्या हास्याचे प्रतिध्वनि उमटले.···· पुन्हां कारखान्याचा भोंगा वाजला. ]

ग्रंथ संग्रहालय,
३०८७६
२५८६

# नवजातक

मन, देश, जाति अथवा जगताच्या कोणत्याहि एका विशिष्ट अवस्थेचें रूप नभोवाणीवरील नाटकाच्या रूपानें अगदीं सहज आकर्षणीय करतां येऊं शकतें. घटनाक्रम त्यांत मुख्य नाहीं, कथा आणि शब्दांचा उपयोग, भाषेची सजावट आणि सर्वांत अधिक म्हणजे संभाषणाची पद्धति ह्यांच्या योगानें हें नाटक अपूर्व रूप धारण करूं शकतें.

ह्या रूपकांत 'पुरुष' हा मन, देश, जाति किंवा जगताचें प्रतिरूप आहे.

'स्त्री' ह्या रूपकांत आशेचें प्रतीक आहे.

वादळ म्हणजे मनाचें मालिन्य, देशाची दुर्दशा, जातीचें अधःपतन किंवा संसारांत दुर्योगाचें प्रतीक मानावें.

शेवटीं नवजीवनाच्या वाणीचा उद्गार आहे !

आपल्या इच्छेप्रमाणें, विचार-प्रणालीप्रमाणें आणि ऐकण्याच्या वेळच्या मनोभावाप्रमाणें ह्यांपैकीं हवें तें रूपक जुळवून ऐकण्याची सोय श्रोत्यासाठीं येथें झालेली आहे.

अभिनय-काळः-१५ मिनिटें

# नवजातक

[ समुद्राच्या लाटांचा ध्वनि,–कांठाजवळ नाहीं,–खूप लांब,– समुद्राचा तो हृदय-भेदक हाहाःकारच वाटतो आहे. ]

**स्त्री**:–किती काळीकुट्ट रात्र आहे !

**पुरुष**:–हं. आकाश मेघांनी झांकळलं आहे.

**स्त्री**:–पण हा तर शुक्लपक्ष आहे ना ?

**पुरुष**:–आमच्यासारख्या हतभाग्यांच्या नशिबांत चंद्रोदय कुठला ?

**स्त्री**:–जहाजावरून आपण ह्या होडींत येऊन पडलों, त्याला किती दिवस झाले असतील ?

**पुरुष**:–कोण ठेवील हिशेब ?–नाहीं पाहिला सूर्य, नाहीं दिसला. चंद्र !—आकाशांत मेघ दाटलेले !—

**स्त्री**:–आपलं जहाज बुडालं कसं ?

**पुरुष**:–कोणाला ठाऊक ?–कदाचित् युद्धाच्या वेळीं कोणीतरी सुरुंग पेरून ठेवला असेल, तो लाटांवर वाहत वाहत दूर गेला असेल अन् कोणाला तो काढून घेतां आला नसेल !—

**स्त्री**:–अन् म्हणून, त्यांच्या त्या ध्वंस-यज्ञांत आपला बळी पडला ?

**पुरुष**:–शक्य आहे.–पण आम्ही ह्या होडींत आलों कसे त्याचा विचार करून आतां उपयोग काय ?

**स्त्री**:—तेंहि खरंच !–उपयोग कांहीच नाहीं !·······तुम्हांला राग आला ?

**पुरुषः**—छे!—राग येण्याचं कारण काय?—माणसाचा कंठस्वर कानांनी ऐकायला मिळतो आहे, हेंच भाग्य! कांहीं वेळानंतर कदाचित्....

**स्त्रीः**—थांबलांत काय म्हणून? अस्सं.—तुम्हाला वाटलं, मला भिती वाटेल, म्हणून?—पण मला आतां कशाचीच भिती वाटत नाहीं.—ह्या चमत्कार तुमच्या लक्षांत आला का?

**पुरुषः**—कोणता?

**स्त्रीः**—मृत्यु असा समोरासमोर उभा राहिला म्हणजे गंभीर प्रशांतिखेरीज दुसरा कोणता भाव मनांत उत्पन्नच होत नाहीं.

**पुरुषः**—हंऽ!

**स्त्रीः**—जहाज जेव्हां फुटलं त्यावेळीं किती स्त्री-पुरुषांच्या कोण त्या किंकाळ्या! त्यांत माझे आप्त-स्वजन होते,—तुमचेहि असतीलच.—ते सारे समुद्राच्या तळाशीं गेले!

**पुरुषः**—ह्या होडींत सुद्धां तर आणखी किती तरी लोक होते. खायला प्यायला न मिळाल्यामुळें त्यांनीं साऱ्यांनीहि, एका एकाने मृत्यूची कांस धरली!

**स्त्रीः**—एका-एकाला ह्या विक्षुब्ध सागराच्या लाटांवर आम्ही फेंकून दिलं.—माझ्या मनांत काय येतं, सांगू? युगां-युगांपासून हजारों मानवप्राणी ह्या विराट समुद्राची भूक भागविण्यासाठीं बळी गेले आहेत. माझ्या मनाला वाटतं, आपले आप्त-नातलग, आपल्या ह्या होडींतले साथीदार,—सारे ह्या लाटांच्या रूपाने हात उंचावून आपल्याला बोलावताहेत!—म्हणताहेत,—पुष्कळ दिवसांनंतर आज

समुद्रदेव पुन्हां जागृत झाला आहे. त्याच्या विश्वग्रासी क्षुधेची पूर्ति करण्याच्या यज्ञांत आणखी आहुति पाहिजे आहे !—

**पुरुष**:—तुझं मन उत्तेजित झालं आहे.

**स्त्री**:—माझ्या देहावर, माझ्या मनावर काळ्या मेघांनी झांकळलेल्या ह्या आकाशाचं दडपण बसलं आहे. ह्या निरंध्र निःसीमतेच्या अत्याचारापासून सुटका व्हावी म्हणून माझं हृदय व्याकुळ झालं आहे. मनांत येतं, आपणहि त्या सर्वांच्या बरोबर, समुद्र—गर्जनाच्या ह्या आर्त हाहाःकारांत लाटांच्या तालावर त्यांच्यांत विलीन होऊन जावं ! पृथ्वीच्या अन्तःस्तलांतून मृत्यूचा स्तब्ध कोलहल वर उठतो आहे;···· त्या कोलाहलांत आपला सूर मिळवण्याची इच्छा मनांत उत्पन्न होते.

**पुरुष**:—तुझ्या ठायीं अनागत कालाचं बीज आहे. ज्या काळचा माणूस आकाशांतील काळ्या ढगांचं हें आवरण फाडून, छिन्न भिन्न करून, नवीन सूर्याचा उदय पाहणार आहे त्याच काळच्या एका जिवानं तुझ्या ठायीं आपलं घर केलं आहे. मृत्यूसंबंधीच्या विचाराला मनांत थारा देण्याचा तुला अधिकार नाहीं.

**स्त्री**:—पण ही काळोखी रात्र,—हिचा कधीं अंत होणार आहे का ?

**पुरुष**:—अगदीं खात्रीनं.—आणखी थोडे तास वाट पहा. त्या नंतर प्रभात होईल. सूर्य वर येईल. कदाचित् आपल्याला जमिनीचा किनाराहि डोळ्यांनी दिसेल.......त्यापूर्वी तूं थोडा वेळ स्वस्थ झोंपी जाण्याचा प्रयत्न कर.

**स्त्री**:—झोंपी जाण्याचा प्रयत्न ?- बरं तर. गप्पच बसून राहतें.

[ काहीं क्षण बोलणें चालणें बंद;— नुसता लाटांचा शब्द ]

**पुरुष:**—ऐकलंस का ?····झोप लागली ?

**स्त्री:**—झोप नाहीं.–विचार करीत होतें.

**पुरुष:**—कसला विचार ?

**स्त्री:**—विचार करीत होतें.—खायला आणखी कांहीं शिल्लक उरलं आहे कीं नाहीं.—तूं गप्प बसलास ?–अस्सं !–आलं लक्षांत. सारं संपलं वाटतं. कालसुद्धां तर मला एक ब्रेड दिली होतीस, पण ?

**पुरुष:**—तेवढीच शिल्लक होती. जहाजावरून खाण्याचं तर कांहीच आणतां आलं नव्हतं. थोडया ब्रेड मी कश्यातरी आणल्या होत्या, त्याच आतांपर्यंत तूं खाल्ल्यास.

**स्त्री:**–आणखी, दुसरे लोक, खायला मिळालं नाहीं म्हणून एका मागून एक मेले !—तुलाहि खायला मिळालं नाहींच. केवळ मला जिवंत ठेवण्यासाठीं तुझे एवढे प्रयास काय म्हणून ?

**पुरुष:**—हे केवळ माझेच प्रयत्न नव्हते; साऱ्यांचेच ते प्रयत्न होते.—आम्ही सारे अतीत आहोंत,—आमच्यासाठीं वर्तमान अंधारानं भरलेलं आहे, भविष्य आम्हाला नाहींच !—तूं जगद्धात्री आहेस.—भावी काळचा मानव तुझ्या देहांतून बाहेर येण्यासाठीं मार्ग शोधीत आहे. तुला जगलंच पाहिजे.

**स्त्री:**–काळोख अधिकच दाट झाल्यासारखा वाटतो आहे.

**पुरुष:**—हं.—तूं कुठं आहेस तें सुद्धां मला दिसेनासं झालं आहे.

**स्त्री:**—लाटांचा आवाज देखील, मला वाटतं, जास्तच वाढूं लागला आहे.

**पुरुष:**—मला वाटतं, शेवटच्या पाठाचा अभ्यास चालला आहे.

**स्त्री**:—बरं, सांग पाहूं !—आकाश अन् समुद्र ह्या दोघांच्या शक्तिपरीक्षेंत ही आमची छोटीशी होडी,—तूं अन् मी, आपण दोघे मनुष्य जीव,—आमचं प्रयोजन काय ? आपण इथें नसतों तरी आकाशांत हे काळे मेघ असेच जमले असते, समुद्राच्या उत्ताल लाटांच्या राशी गर्वाने फुलून अश्याच नाचत सुटल्या असत्या !—आपण तळाशीं गेलों असतों तरी हें झालं असतंच. मग आपण वाचलों कशासाठीं ? एक हात थोडा उंचावून समुद्रानं आमचं अस्तित्व चुटकीसरसं नामशेष कां नाहीं करून टाकलं ?····आपण इतके लहान, इतके क्षुद्र,····आपण वाचलों आहोंत कशासाठीं ?—कां ?—कां ?

**पुरुषः**—बोलूं नकोस.—शांत हो ! अगोदरच खायला कांहीं नाहीं, अन् त्यांत तुझ्या शरीराची ही अशी अवस्था. मनाला भडकूं देणं तुला योग्य नाहीं.

**स्त्री**:—पण असं स्वस्थ मला बसवत नाहीं.—ही कसली स्थाणूची अवस्था झाली आहे आपली !—आकाशांतल्या मेघांचा भार हळूं हळूं आपल्याबर कोसळणारच····मृत्यू हा आपल्यावर झेप घेणारच····आपल्याला मरावं लागणारच····मग ह्या जलकल्लोलांच्या कोलाहलांत आपल्याला उडी कां घेतां येऊं नये ?

**पुरुष**:—शान्त हो. बोलावल्याने मृत्यु येत नसतो.

**स्त्री**:—मला कांहीं तरी करावंसं वाटतं आहे.—असं गपचुप् बसून भ्याडाप्रमाणं मृत्यूची वाट पाहत राहणं, हें मला सहन होत नाहीं.

**पुरुष**:—विनाकारण उत्तेजित होऊन आपली शक्ति कमी करूं नकोस. चल, आपण दुसऱ्या कोणत्यातरी गोष्टी बोलूं.—तुझा पति कुठं आहे ?

**स्त्री**:—त्या जहाजाबरोबरच तेहि समुद्राच्या तळाशीं गेले.—फक्त पतीच काय ?—आई, वडील, दोन छोटी छोटीं मुलं,— सारेच गेले !

[ एकाएकीं रडूं लागते. ]

**पुरुष**:—[ थोडया वेळाने ]—रडूं नकोस!—महासमुद्रानं त्यांना बोलवून नेलं आहे. त्यासाठीं असं रडूं नये.

**स्त्री**:—[ थोडयाच वेळांत तिचें रडणें थांबलें ]. नाहीं ! ते गेले म्हणून मी दु:खानं रडत नाहीं. त्यांना विसरून गेल्याच्या दु:खामुळेंच मला रडूं आलं —माणूस तरी कसा विचित्र असतो पहा:—एक दिवस होता, जेव्हां माझे पति, मुलं, आई, बाबा ह्यांना सोडून जिवंत राहणं ही कल्पनाच मला सहन होत नव्हती.—अन् आज ते सारे माझ्या मन:पटलावरून एकाएकी पुसून गेल्यासारखे कसे झाले ?

**पुरुष**: — विराटाचं स्वरूप पुढें उभं ठाकलं म्हणजे क्षुद्र स्वार्थाच्या गोष्टीचा माणसाला विसर पडतोच.

**स्त्री**: — त्या जहाजाबरोबर आणखीहि कितीतरी माणसांचा जीव गेला. आपल्या ह्या होडींतल्या आपल्या साथीदारांनीहि, एका-एकानं समुद्राच्या लाटांचाच आश्रय धुंडाळला.— ह्यापूर्वीं शेकडों वर्षांच्या गत काळांत किती जहाजं बुडालीं असतील, किती हजारों स्त्री-पुरुष प्राणाला मुकले असतील.—आमचे जे अगदीं जवळचे, आपले म्हणून होते, ते सारे आज ह्या हजारोंच्या पंक्तींत जाऊन बसले. आज आतां आपल्याला त्यांची ओळखहि उरली नाहीं. ते आतां आम्हांला परके झाले ! त्यांच्यासाठीं आमचं मन शोकहि करायला फारसं तयार नाहीं !···हें कसं झालं ?— कां झालं ?

**पुरुषः**—आतांपर्यंत तूं लहान होतीस;– आज तूं फार मोठी झाली आहेस, म्हणून ! .

**स्त्रीः**—आतांपर्यंत मी माझ्या संबंधींच बोलत आलें, तुझ्याबद्दल कांहींच कळलं नाहीं. तूं कुठचा, कोण ?

**पुरुषः**—सर्वच ठिकाणीं माझं घर आहे.····त्या घराचा शोध करतां करतांच माझा प्राण कंठाशीं आला आहे. माझा देश कोणता, तें मला आठवत नाहीं.

**स्त्रीः**—कुणी नातलग बितलग ?

**पुरुषः**—घरां–घरांत माझे आई-बाप; बहिण-भाऊ; बायका-मुलं आहेत. माझं स्वतःचं कांहींच नाही, म्हणूनच जें कांहीं आहे तें सारं माझंच आहे. हें बघ, इतका वेळपर्यंत तुझ्या गोष्टी ऐकल्या अन् एक विचार माझ्या मनांत आला,···· " तूं एक स्त्री, जीवनाच्या शेवटच्या सीमेवर उभी राहून तूं आत्म–त्याग करण्याची इच्छा दर्शविलीस,—पण तसं करणं मला कां बरं शक्य नाहीं झालं ? बंधनं तुटलेला, नेहमींच इतस्ततः भटकणारा मी !— ह्या महोत्सवामधून निसटून पळून जाण्याचीं इच्छा माझ्या मनांत कां म्हणून उत्पन्न व्हावी ?

**स्त्रीः**—भविष्यावर तुझा विश्वास आहे. तूं घर सोडून बाहेर पडलेला जीव आहेस ! पुन्हां कधीं तरी, कुठें तरी नवीन सूर्योदयाचं दर्शन करण्याची वासना तूं नाहींशी करूं शकलेला नाहींस.

**पुरुषः**—जाऊं दे तें. त्या गोष्टीबद्दल विचार करून लाभ नाहीं.

**स्त्रीः**—आकाशांतल्या काळ्या मेघांनी धुक्याचं रूप धारण करून आपल्याला घेरून टाकलं आहे.

**पुरुषः**—हं !— समुद्राच्या लाटा डोळ्याला दिसत नाहींत खऱ्या !

**स्त्री**: —आपले हात–पाय देखील दिसेनासे झाले आहेत. शेवट आला वाटतं जवळ.

**पुरुष**: —तुझा–माझा शेवट आला असेल जवळ, कदाचित् ! पण ह्या संग्रामाचा शेवट अजून दूर आहे. समुद्रानं कुठं आपली हार कबूल केली आहे ? ऐक ना, त्याच्या गर्जना अधिकच गगन-भेदी व्हायला लागल्या आहेत.

**स्त्री**: —आक्टोपसप्रमाणं ह्या धुक्यानं जखडून धरल्यामुळं कसं असहाय झाल्यासारखं वाटतं आहे. समुद्रच आपलं शेवटचं विश्रांतिस्थान, त्याच्या लाटांच्या स्वरांत आपला शब्द–स्वर मिसळवून देणं, हेंच माझं शेवटचं दान ! माझ्या मनाला समुद्रापासून निराळं, दूर सारण्याच्या आकाशाच्या ह्या दुष्ट प्रयत्नांना मी यशस्वी होऊं देणार नाहीं. मी आपला हात पाण्यांत सोडून ठेवला आहे.

**पुरुष**: - ( लांबून आल्यासारखा स्वर )—मला भारी झोंप येते आहे. डोळे उघडतच नाहींत मुळीं.

**स्त्री**:—( लांबून आल्यासारखा स्वर )—नीज तर मग, —नीज तूं.

[ कांहीं वेळपर्यंत नुसता लाटांचा आणि होडीच्या बाजूवर थडथडणाऱ्या पाण्याचाच आवाज होतो, बाकी सारें निस्तब्ध ! एका-एकीं, कातर स्त्री–कंठांतून दाबलेला आर्तनाद ऐकूं आला. ]

**पुरुष**: - ( लांबच्या आवाजांत ) हें काय ? असं कळवळल्य सारखी कण्हते आहेस काय म्हणून ? काय झालं ?

**स्त्री**:–उ: !—ओ: !—

**पुरुषः**–काय करूं ? भुकेनं तूं तडफडते आहेस, तें मला ठाऊक आहे.—पण मी काय करूं ? माझा निरुपाय आहे.

**स्त्रीः**–(जोराने दम लागला आहे)–नाहीं–नाहीं,—तसं नाहीं!–तो येतो आहे. त्याच्या आगमनासाठींच ही माझी जय-भेरी सुरू आहे.

**पुरुषः**–कोण ?—कोण येतो आहे ?

**स्त्रीः**–भिऊं नकोस. येतो आहे,–तो,–भावी काळचा पुरुष !–

**पुरुषः**–जयजयकार असो !--जयजयकार असो !–येऊं दे, येऊं दे तो !--त्याच्याबरोबर प्रभातहि येणारच !—पहा, हे धुकं हळू हळू विरळ होत चाललं....आकाशांतले मेघदेखील पांगायला लागले,—पूर्वाकाश लाल दिसूं लागलं !....[ लाटांचा व संगतीचा ध्वनि हळू हळू मोठा होऊं लागला. लांबून पहांटेच्या अजानची हांक आली,—प्रथम अगदीं अस्पष्ट आणि मग हळूं हळू चांगली स्पष्ट ! अजानची हांक अधिकच स्पष्ट; पक्ष्यांची चिव–चिव, यंत्र–संगीत, समुद्राचा प्रचंड कल्लोळ. ]

**पुरुषः**—

भंगलें द्वार हें, येई ज्योतिर्मया ।
स्वागता सज्ज, जय-नाद तूझ्या ॥
फाड तिमिरावरण, होउं दे अभ्युदय ।
स्वागता सज्ज, जय–नाद तूझ्या ॥
जीवनाची नव्या, सु–प्रभा फांकली ।
खड्ग आशा नवी हातिं तूझ्या ॥
जीर्ण आवेश ते, टाक रे खंडुनी ।
भंग करि वीरवर ! बंधनांचा ॥

आई ! उठ !—पहा, तुझ्या नव-जातकानं आपल्या बरोबर निर्मल प्रभात आणली आहे. फळाफुलांनी, पक्ष्यांच्या गायनांनी भरलेली तीर-भूमि समोर आहे. आजवर सहन केलेल्या साऱ्या कष्टांचं अन् परिश्रमांचं आज सार्थक झालं आहे. भविष्यकालचा मानव तूं भावी दिवसाच्या ओटींत निरवला आहेस ! – उठ, जागी हो आई !

[ गंभीर आणि अस्पष्ट ]

**कंठस्वर**:—भय नको !—भय नको !—भय नको !—

**पुरुष**: – हा कोणाचा स्वर ? – कोण ? काय सांगतो आहे ?

**कंठस्वर**:—

भय नको ! भय नको ! भय नको !
संपूर्ण प्राण ।
करि जो दान ॥
क्षय कधीं तया न हो ॥

[ चोहोंबाजूंनी असंख्य कंठस्वरांत प्रतिध्वनि ]

भय नको ! भय नको ! भय नको !
संपूर्ण प्राण ।
करि जो दान ॥
क्षय कधीं तया न हो ॥

---

# अन्तराय

लांबच लांब पन्नास वर्षांची ही घटना-वहुल कहाणी आहे. तऱ्हेतऱ्हेच्या चरित्रांच्या समन्वयानें आडंवरपूर्ण, आणि संभाषणांच्या अभिनवत्वामुळें अल्प परिसरांतहि आकर्षणीय असें तिचें रूप आहे. नाटकीय उपादानांचा तिच्यांत अभाव नाहीं, अभिनय वैचित्र्याचा अंत नाहीं. चरित्र—संख्याहि थोडींथोडकी नाहीं. आणि हें सारें असूनहि, प्रयोगाच्या दृष्टीनें फारसे प्रयास नकोत. नभोवाणीचा नाटय—प्रयोग शब्दाश्रित असतो ह्याचें ' अन्तराय' एक अपूर्व उदाहरण आहे.

अभिनय-काल, २० मिनिटे

# अन्तराय

[ संपूर्ण नाटिकेची पार्श्वभूमि भावाश्रयी संगीत-वैचित्र्याने नटलेली ]

**प्रवक्ता**:—गंभीर, निस्तब्ध रात्र····

जनहीन स्थान, त्याच्या एका टोकाला एक घर. घराच्या एका खोलींत दिवा जळतो आहे; खिडकीवर येणाऱ्या उजेडावर मधून मधून एक सावली इकडून तिकडे व तिकडून इकडे येता-जाताना, पडताना दिसते आहे. भावनांच्या ओझ्याने वाकलेलें मस्तक खांद्यावर वागवि-णारा कोणीतरी विशालकाय पुरुष चंचल मनाने येरझारा घालीत आहे हें ह्यावरून स्पष्ट दिसतें·······

[ येथें बारा वाजल्याचे ठोके कानीं पडतात···ठोक्याचा आवाज कुठून तरी लांबून येतो आहे; जेवढा काहीं अंश कानीं पडतो तो त्या आवाजाचा शेवटचा पुसट अंशच काय तो आहे. ]

लांबच्या नाक्यावरचे हे बाराचे ठोके···रात्रीचे बारा !·······

[ घरांतल्या घड्याळांतील बाराच्या ठोक्यांपैकी शेवटचे तीन ठोके कानी आले; त्या नंतर घड्याळाची 'टक्-टक्' हळू हळू स्पष्ट आणि स्पष्टतर होऊं लागली······· ]

**अशोक**—रात्रीचे बारा वाजले····

आज माझ्या वयाला पन्नास वर्षे पुरी झालीं !—लांबच लांब पन्नास वर्षे ! आजच्या ह्या निःशब्द, निस्तब्ध रात्रीच्या निवांत अवकाशांत मी स्वतःकडे, ह्याच रोज—रोजच्या माझ्या जीवन—

यात्रेकडे एकान्तिक भावाने पाहतों आहें. काय केलें ? ह्या अर्ध शताब्दीच्या दीर्घ आयुष्यांत मी काय काय केलें ?....कांही नाही, कांही सुद्धां नाहीं....केवळ फसवणूक ! साऱ्यांना फसविलें, आणि त्याबरोबर हळूं हळूं स्वतःचीहि पुरी फसवणूक करून घेतली. ह्या पन्नास वर्षांत मी काय करायचें बाकी ठेवलें ? कोणते खेळ खेळायचे सोडले ? सत्य, धर्म, प्रेम, —साऱ्यांचींच बाहुलीं बनवून मी त्यांचा खेळ केला. मनुष्यत्वाच्या एक—एक आदर्शाला, जुन्या, उष्टया, पानपात्राप्रमाणें तोडून-मोडून मी फेकून दिलें. चोरी, लबाडी, खोटें प्रलोभन, अत्याचार, अनाचार, नारी-हृदयाशी आणि नारी-देहाशी अमानुषिक नृशंसतेचा व्यवहार,—पन्नास वर्षांच्या माझ्या ह्या म्हाताऱ्या थोबाडावर ह्यांपैकी प्रत्येक आपली छाप मारून गेला आहे ! आज पन्नासाव्या वर्षाच्या ह्या शेवटच्या प्रहरांत मी एकटा ह्या अंधाऱ्या खोलींत बसून हें पत्र तुला लिहीत आहें. आज निव्वळ व्यर्थ बनलेल्या, प्रेतरूप झालेल्या जीवनांतील एक-एक वर्षांतल्या घटना वर्णन करून सांगतों आहें.

—पहिल्यांदा मनापुढे उभी राहते माझी ती अव्याज, निष्पाप किशोरावस्था ! आज तिचें एकहि चिन्ह, एक सुद्धां स्पर्श कुठें आढळत नाहीं.

**मिहिर**:—नाही कसें, अशोक ? मी आहें ना ! मी,—तुझ्या किशोरावस्थेंतला साथीदार, तुझ्या स्वप्नविभोर अनंत आकांक्षा आणि अपेक्षांनी भरलेल्या जीवनाचा साक्षीदार ! नेहमीच्या विस्मरणाच्या गव्हरांत लुप्त होणाऱ्या छात्र—जीवनांतल्या अनेक गोष्टी मी विसरून गेलों, पण अशोक, तुला मी विसरूं शकलों नाहीं. आठवत नाहीं का तुला, मी कोण तें ? एककाळीं तुझ्या - माझ्यांत किती दाट मैत्री

होती !—वर्गांतलीं इतर सर्व मुलें आपली थट्टा करीत ! त्या बंधनाचा तुला विसर पडला, पण मी मात्र तें विसरलेलों नाहीं. कारण, त्या काळांत मीच काय पण सारीच आम्ही मुलें तुला आपलें दैवत मानीत असूं. अभ्यासांत काय, क्रीडांगणावर काय, बुद्धि, साहस,— सर्वच बाबतींत तूं आमचा आदर्श होतास. वर्गांत कधी कोणत्याहि परीक्षेत तुझा पहिल्याचा दुसरा अनुक्रम आला नाहीं; अन् एक शिक्षणाची बाब सोडली तर तूं कधीं शिक्षकांची स्तुति – पूजाहि केली नाहींस. आपण दोघे एकाच वर्षी कॉलेजांत दाखल झालों. तुझ्या भावनाशील मानस – द्वारावर विश्व—साहित्याच्या सर्वच महामनीषींची एकच गर्दी उसळली ! त्यांच्यापासून मिळालेल्या स्फूर्तीने तूं वेडा बनलास. अशोक तूं बनलास साहित्यिक. ह्याच काळांतल्या एका दिवसाची गोष्ट सांगतों. त्या दिवशीं तूं आपले प्राण संकटांत घालूनहि त्या अप-घातांतून माझें रक्षण केले होतेंस ! अंहं ! कृतज्ञता म्हणून नाहीं मी हा उल्लेख केला. आज तुझ्याजवळ पुन्हां आल्यानंतर माझ्या जीवनांतल्या एका फार मोठया घटनेचा उल्लेख केला मी, दुसरें कांही नाहीं. आणखी एक प्रसंग. त्या दिवसाचीहि मला फार फार आठवण येते. इंटरमीजिएटचा परीक्षेत पहिला आल्यानंतर तूं आम्हा सर्वांना हॉटेल-मधें नेऊन चमचमीत मेजवानी दिली होतीस, तो तो दिवस.

**अशोकः**—तो मेजवानीचा दिवस ! त्या दिवसाचा मलाहि विसर पडणें शक्य नाही. त्या दिवशीं संध्याकाळी खाणें-पिणें संपल्यानंतर मी कुठें गेलों, . काय केलें तें माझ्या मित्रांपैकीं कोणालाच ठाऊक नाहीं. कोणी मला हांक मारली, कोणी मला हात धरून ओढत नेलें, मला कांही आठवत नाहीं. ....पण, परत आलों मी मध्यरात्रीं. त्या वेळीं स्वतःवर माझा ताबा नव्हता. पाय डळमळत होते, सर्वांगाला कंप

सुटला होता,--बाबांनी दार उघडून पाहिलें,-- त्यांच्या पुढें उभा होता एअ उन्मत दारुडा ! रात्र संपतां--संपतां मी शुद्धीवर येऊन पाहिलें, भाग्य-विधात्यासारखे बाबा माझ्या पुढें उभेंच होते ! ते म्हाणाले,....काय म्हणाले तेंहि आज मला माझ्या ह्या शेवटच्या पत्रांत लिहिलें पाहिजे. ते म्हणाले,–मी तुझा जन्मदाता बाप नाहीं !

माझ्या बाबांनी मला जन्म दिलेला नाहीं ? मग कोण मी, कुठून आलों मी, माझा परिचय कोणता ? इतके दिवस ज्यांना मी ‘ बाबा ’ म्हणून ओळखीत आलों, परीक्षेंत थोर यश मिळाल्याच्या त्या दिवशीं, पद--स्खलनाच्या त्या पहिल्या रात्रीं मला त्यांच्या तोंडून कळलें, मी त्यांच्या एका मित्राचा मुलगा आहें,-- लंपट, दारूबाज, अनाचारी, चरित्रहीन अश्या त्यांच्या एका मित्राचा ! तो मित्र वेडयांच्या इस्पि-ताळांत फार पूर्वींच मरून गेला होता, आपल्या चारित्र्याचा संपूर्ण वारसा माझ्या रक्तांत ठेवून ! अन् माझी आई ?.... जाऊं द्या. आईची गोष्ट राहूं द्या. बाबा म्हणाले, जी कुलीनता, जें शिक्षण माझ्याकडून इतके दिवस तुला मिळालें आहे, तें फार मोठें आहे ह्यांत शंका नाहीं. पण तुझ्या जन्मदात्याच्या रक्ताचें ऋण तूं टाळूं शकशील एवढें सामर्थ्य त्या संस्कारांत कुठलें ? म्हणूनच आज तुला दारू प्यावीच लागली !—तुझ्या जीवनांतला हा सर्वांपेक्षां मोठा अन्तराय ओलांडून तूं कधींहि त्याच्या पार जाऊं शकणार नाहींस !

पार जाऊं शकणर नाहीं ! टाळूं शकणार नाहीं ! कलंकित रक्ताच्या हांकेला ‘ ओ ’ देत मला वाहवत जावेंच लागणार ? म्हणूनच तर, त्या दिवशीं सकाळीं मी वाहवत गेलोंच !–इतके दिवसांचा आश्रय सोडून मी निघून गेलों. ह्यावर कोणता अधिकार होता माझा ? आणि

हातखर्चापुरती थोडीशी पुंजी खिशांत घेऊन मी मग ह्या गावीं येऊन दाखल झालों, ह्या महानगरीच्या आवर्तांत येऊन पडलों.

**मालती**:—विसरून जाऊं नकोस. तूं आलास तो माझ्याकडे.

**अशोक**: - तूं ?

**मालती**:—मी, मालती! आठवतें का ? तूं इथें कॉलेजांत दाखल झालास. अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी होतास तूं. माझ्या बाबांचा प्रियतम शिष्य व्हायला तुला फार दिवस लागले नाहींत. त्यानंतर किती दिवस तुझें आमच्याकडे जाणें—येणें होऊं लागलें. माझ्याशीं तुझी ओळख झाली. आणि मग किती सन्ध्याकाळ, किती तऱ्हेतऱ्हेच्या गोष्टी तूं मला सांगण्यांत घालविल्यास. होतां होतां, हळूं हळूं, बाबांचा प्रियतम शिष्य माझाहि प्रियतम होऊन बसला,—नाहीं आठवत ?... थांब, थांब ! —ह्यांत विनवणी कांहीं नाही. ही सारी आज गतकाळांतली केवळ एक गोष्टच उरली आहे. म्हणूनच म्हणतें, मला सांगून टाकूं दे. दरिद्री, चरित्र-हीन तूं; बाबांच्या जवळून गरीब आश्रितांना मदत करण्याच्या निमित्तानें पैसे घ्यायचास, पण ते सारे पैसे नियमितपणें खर्च व्हायचे कलंकाच्या काळ्या बाजारांत! मला सारें कळत होतें, पण तरीहि कळावें अशी इच्छा नव्हती. मी पुन्हां पुन्हां तुझ्या नजरेंत नजर भिडवून फक्त पहायची, आणि तिथें मला वंचनेची छाया कधीं दिसलीच नाहीं. कधींहि तुझा स्वर थोडातरी कांपत असलेला मला आढळला नाही. !

आपलें लग्न जुळणें शक्य आहे,—बाबांना हें पाहून सुखच वाटलें. म्हणूनच, पुढच्या शिक्षणासाठीं विलायतेला जाण्याची आपली इच्छा जेव्हां तूं बोलून दाखविलीस, त्या वेळीं तुझा सारा खर्च चाल-

ठा. म. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
अ. क्र. २३९८ नों. दि ...



त्रिण्यासाठीं बाबा आनंदाने तयार झाले. तूं परत आल्यानंतर लग्न व्हायचें असे ठरलें होतें, पण तूं जगाला न कळतां माझ्याशी लग्न लावूनच निघून गेला होतास !

**अशोक:**— पण मालती...

**मालती:**— मला ठाऊक आहे, मला पुन्हां पुन्हां एक नवें आश्वासन तूं देऊन गेला होतास. पण तो तुझा शब्द किती कवडीमोलाचा होता!—दोन महिने लोटतात न लोटतात तेवढ्यांतच मला कळून आलं. तुझीं पत्रेंहि कमी—कमी व्हायला लागलीं,—अन् त्यांच्या भाषेचा सूरहि पालटून गेला. अन्, त्यावेळचें माझें असहाय, सकरुण मातृत्व !

**अशोक:**— मालती, तुझं बाळ ?

**मालती:**—तुझं ते बाळ ! तें आतां नाही !

**अशोक:**—सुटलों ! सुटलों !

**मालती:**— कळलं,—समजलं मला !— पण सांगत होतें मी, तें निराळंच. माझ्याशीं तसं लग्न करून मलाच तूं फक्त आश्वासन दिलें होतें, एवढेंच का ? त्याचा पाठीशीं तुझा स्वतःचा कोणताच का स्वार्थ नव्हता ? मला जामीन ठेऊनच तूं विलायतेला निघून गेला होतास. म्हणूनच, महिन्यामागून महिने, वर्षांमागून वर्षें, माझ्या बाबांकडून तूं पैसे घेत राहिलास. तुला ठाऊक होतें, त्यांना तुला पैसे द्यावेच लागणार! हे कर्ज त्यांचें संपलें, ते वारले त्या दिवशीं ! त्या पूर्वीं तुझा सारखा तगादा सुरूच असे, पण ते वारल्यानंतर, दुसरी कशाचीहि, कोणतीहि विचारपूस करण्याची तुला कधींच काहीं गरज वाटली नाहीं !— माझ्याशीं तूं लग्न लावलं होतंस, पण त्या आपल्या लग्नाचा साक्षीदार कोणीच नव्हता ! तूं मला मातृपदावर नेऊन बसवलंस,—पण

माझ्या पोटच्या गोळ्याचा स्वीकार करणेंहि मला ह्या संसारांत शक्य नव्हतें!-तूं तर मला तुझ्या जीवनांतून हांकूनच लावलें होतेंस!-केवळ जीवनांतूनच काय, पण स्मरणांतूनहि तूं मला बाहेर फेकून दिलें होतेंस.—कां बरें असें केलेंस तूं? कां? माझ्या कुमारी हृदयांतल्या प्रीतिभांडाराची अशी फसवणूक करून, माझ्या देहाचा आणि मनाचा सत्यानाश करून तूं तोंड दडवून बसलास. कुठें होतास?

**अशोक**:....होतों नशेंत! होतों रक्ताच्या उन्मादांत! रक्ताची आणि संस्कृतिची बंधनें,-ह्या दोघांचें युद्ध, माझ्या आयुष्यभर चाललेंच आहे. हेंच पहा ना. मी एक चांगल्यापैकीं विद्यार्थी होतों; पण दारूचा मोह कांहीं टाळूं शकलों नाहीं.— म्हणूनच मी प्रेमहि करूं शकलों.— खरोखरच मी प्रेम केलं तुझ्यावर, मालती.— जीवनांतलें पहिलें प्रेम होतें तें. आनंदाबरोबर वेदनेचें, वासनेबरोबर साधनेचें एक अपूर्व संमिश्रण माझ्या त्या उत्कट प्रीतींत होतें. आणि तरीहि मी त्या प्रेमाचीहि वंचना केली! जी संपूर्ण देह-मनानें माझी होती तिच्याच प्रीतीची भेट मी धुळींत मिळवून टाकली. तिच्या कपाळीं मी एक दारुण अभिशाप लिहून ठेवला!

मी आपल्या गुरूलाहि ठकविलें. त्याचे पैसे घेऊन विलायतेला बॅरिस्टर होण्यासाठी गेलों. वाटलें होतें, परत येईन तो मोठा मान-मरातब मिळवून, मोठा माणूस बनून येईन. त्या आवरणाखालीं मग माझा सर्व कमीपणा झांकून जाईल.-पण तें झालं नाहीं. व्हावें तरी कसें? अमानुषत्व स्वीकारून माणूस मनुष्यत्वाचें ऋण टाळूं शकतो, पण तो रक्ताचें ऋण कसें टाळूं शकणार? पोषाख वगैरे बदलून फार तर बाहेरचें रंग-रोगण बदलतां येईल, एवढेंच. सांप वर्षावर्षाला

कांत टाकतो; पण त्यामुळें त्याच्या विषाच्या पिशवींत अमृत थोडेंच जमा होतें? ह्या पन्नास वर्षांच्या जीवनांत पुष्कळदां मनांत आलं, टाकावें बदलून सारें! पण तसं करणें म्हणजे बदल होणें नाहीं. तो तर स्वतःचा अंत करणेंच झालें. हें माझें जीवन, इन्द्रियांची हाकाटी, वासना-परितृप्तीचा उद्दाम उन्माद,–ह्यांचा समूळ अंत केल्या-शिवाय मुक्ति कुठची? पण इतकें साहस आणि शक्ति हृद्यांत असेल तर ना? मी जो कांहीं आहें त्याच्या पार जाऊं शकत नाहीं; म्हणूनच या माझ्या जन्माच्या मुळाशीं जें विष गोळा झालेलें आहे, तें आपलें कार्य करीत राहणारच.

— पण सांगत होतों तें निराळेंच. मी विलायतेला गेलों. लिहिणें-वाचणेंहि खूब केलें. अभ्यासांत चुकारपणा केला नाहीं. बॅरिस्टरच्या परीक्षेंत यशहि फार मोठें मिळविलें. त्याशिवाय, पहायला मिळाला एक स्वतंत्र देश! ह्या इथल्या घाणेरडया चिखलानें बरबटलेल्या, आश्लेषा-मघेच्या आणि कोंदट वातावरणाच्या, प्राण कासावीस करून सोडणाऱ्या जीवनाचें कवच फोडून – मी जाऊन पडलों स्वच्छ मनाच्या आणि बलिष्ठ चेतनेच्या आश्रयाखालीं, स्वाधीन हृद्य-वृत्तीच्या उन्मुक्त इंगितां-वर हुकूम! मी चकित होऊन गेलों; पण त्या बरोबरच माझा मार्गहि हरवून बसलों! म्हणून, मुक्तीच्या नांवाखालीं, जें मनाला येईल तें करीत सुटायला मी शिकलों,—स्वातंत्र्याचा अर्थ केला मी उच्छृंखलता! पुन्हां तीच पैतृक वारस्याची पुनरावृत्ति.—चरित्र-हीन, लंपट, सैतान! तरीपण, मधून-मधून....

**रजत**:– तें मला ठाऊक आहे. मी तुझा परदेशांतला सोबती, रजत!-आपला अभ्यास तूं किती मन लावून करीत होतास, आपल्या

ज्ञानाच्या, ध्यानधारणेचा तूं किती अदम्य परिश्रम करून विकास करीत होतास, तें सारें मी प्रत्यक्ष पाहिलें आहे. केवळ बुद्धिमत्तेचाच नव्हे, तर करुणेचा, सहानुभूतीचा, प्रेमाचा किती अपरूप सुंदर क्षणिक स्पर्श तूं मागें सोडून गेलास तेंहि मला ठाऊक आहे. आणि त्याचप्रमाणें, किती भयंकर पापाच्या, पंकिल कलंकाच्या आवर्तांत तूं गटंगळत होतास, तेंहि माझ्यापासून लपलेलें नाहीं. तुझी मला भिती वाटायची! वाटायचें, देवाच्या मंदिरांत हें सैतानानें घर केलेलें आहे.—त्यानंतर एके दिवशीं, एका इंग्रज तरुणीला रस्त्यावर बसवून तूं कुठें तरी नाहींसा झालास!

**मालती**:—आलास पुन्हां स्वदेशीं परत, ह्याच गावीं. त्या दिवशीं पुन्हां एकदां मी आपलें व्यर्थ यौवन, विनष्ट जीवन, दग्ध प्रीति घेऊन तुझ्याकडे आलें होतें.

**अशोक**:—तूं आली होतीस माझ्या जीवनात परमश्रेष्ठ आशीर्वाद घेऊन,—आणि मी त्याला लाथाडून घराबाहेर फेकून दिलें होतें! त्यानंतर मग अभिशाप! नरकाच्या अंधःकारापूर्ण गव्हराकडे अश्या प्रचंड वेगाने धांवत सुटलों मी!—मला थांबतांहि येईना, स्वतःला सांभाळलेंहि जाई ना! तें गव्हर जणू काय नुकताच विझलेला ज्वालामुखी,—त्याच्या बुडाशीं जें अंध-रसातळ आहे त्याचा ठाव घेण्यासाठीं जसा कांहीं मी वेड लागल्या सारखा धावत सुटलों. स्वास्थ्य गेलें, पैसा गेला,- नांव गेलें,समाजाचा अत्यंत तिरस्करणीय असा शत्रु मी होऊन बसलों. अश्यावेळीं,—जेव्हां मला कोणताच उपाय उरला नव्हता, करायचें असे कोणतेंहि पाप जेव्हां मी शिल्लक

ग्रंथ संग्रहालय
30806
अन्तराय
26-8-61

ठेवलें नव्हतें, अश्या वेळीं मी माझ्या शेवटच्या पक्षकाराला फसवून, त्याने मळजवळ ठेवायला दिलेली रक्कम घश्यांत घालून पोबारा केला.

**मिहिर**:-- कोण होता तो पक्षकार ?

**अशोक**:--हें देखील आज सांगावें लागेलच कां, मिहिर ? आजच्या ह्या दुःस्वप्नांनी भरलेल्या मध्यरात्रीच्या वेळीं, कोणतीच गोष्ट मला लपवून, दडवून ठेवतां यायची नाहीं ?—तो माझा पक्षकार म्हणजे तुझीच विधवा बहिण होती, मिहिर! कायद्याचा योग्य सल्ला मिळेल अश्या आशेने आली होती आपल्या भावाच्या मित्राकडे. शेवटीं ती गेली वेडयांच्या इस्पिताळांत, आणि मी गेलों दार्जिलिंगला !

**मिहिर**:– त्यानंतर, पुढें ?

**अशोक**:—पुढें, दार्जिलिंगचे प्रशस्त मार्ग टाळून मी पहाडी गल्ल्यांतून हिंडण्यांत दिवसामागून दिवस घालवीत होतों.—रात्रीं घरीं परत यायचा, पण झोंप येई ना! प्रहरचे प्रहर तळमळत अंथरुणावर पडून राहीं.—असाच एके दिवशीं एका निर्जन पहाडी रस्त्यावरून जात होतों. तिथें एका म्हाताऱ्या तिबेटी माणसाशी गांठ पडली. बोलतां बोलतां त्याने मला अष्टधातूची एक ड्रॅगॉनची मूर्ति दिली.– होती लहानशीच, पण अति सुंदर ! तो म्हणाला, ही मूर्ति तूं घे. ही ज्याच्या जवळ असेल तो लक्षाधीश होईल, राजा होईल, जें इच्छील तें होईल. मी विचारलें, “हिची किंमत काय द्यावी लागेल ?” त्याने उत्तर दिलें, “रस्त्यावरची मूठभर धूळ उचलून दे माझ्या हातीं ! एके काळीं, शेकडों वर्षांपूर्वी हिची किंमत बिनमोल होती, आज एका कडून दुसऱ्याकडे जातां जातां, रस्त्यावरच्या मूठभर धुळीपेक्षां अधिक

किंमत तिची उरलेली नाहीं." म्हाताऱ्याच्या हातावर मी मूठभर माती ठेवली. त्या वेळीं तो म्हणाला, "हिची पुढें तूं विक्री करशील त्यावेळीं ह्यापेक्षांहि कमी किंमत आकारली पाहिजेस. नाहींतर तुझें सारें ऐश्वर्य काळेंकुट्ट, दाहक, विषाक्त झाल्यावांचून राहणार नाहीं. आणि तें विष तुझ्या रक्तांतील बिंदू-बिंदूत भिनल्यावांचूनहि राहणार नाहीं."— त्यानंतर मी राजा झालों. राजाची ख्याति सारी मला मिळाली. ज्या गोष्टीची इच्छा मी केली ती पुरीच झाली. वासना-कामनांचा संभोग मी पुरेपूर लुटला. माझें पहिलें नांवहि मी विसरून गेलों. साऱ्या जगाच्या शीर्षप्रदेशावर मी जाऊन बसलों. पण आज कोणीतरी कानाशीं फुसफुसतें आहे, 'आतां तुला ती द्यावीच लागेल,— द्यावीच लागेल ! मिळायचें तें सारें तूं मिळवून घेतलें आहेस. आतां शिल्लक काहीं उरलें नाहीं. तुझें यौवन ढळलें आहे, आसक्तीलाहि भोंक पडलें असून गळती लागली आहे, आतां तुला ही मूर्ति विकावीच लागेल. नाहींतर सूड उगवला जाईल ! '— मूर्ति देऊं तरी कोणाला ? कशी देऊं ? एक मूठ माती पेक्षांहि कमी अश्या कोणत्या किंमतीला मी ही विकूं ?

**मालती**:—ती मूर्ति मला देऊन टाक, अशोक !

**अशोक**:—काय किंमत देणार तूं हिची ?

**मालती**:—माझें जीवन ! ज्या जीवनाला तूं अश्या रीतीने लांछित करून टाकलेंस, अवहेलून आणि अत्याचार करून ज्याचा तूं सर्वनाश केलास, त्या ह्या माझ्या जीवनाची किंमत तुझ्या दृष्टीने काय मूठभर मातीपेक्षांहि तुच्छ नाहीं ?

**अशोकः**—मालती, इतके दिवसांनंतर तूं मला पुन्हां मिळणार ? आपलें जीवन माझ्या हातीं सोंपवून देशील तूं ? घे, ही मूर्ति तूं घे मालती !

**मालतीः**—[ मृत्यूचा आर्त-नाद ]

**अशोकः**—मालती !....मालती !....

[ कांहीं क्षणांपुरता संगीताचा सेतु ]

**अशोकः**—मालती ! मालती !—

**मालतीः**—( अस्पष्ट स्वरांत )–काय ?....

**अशोकः**—मालती, तूं वारल्यालाहि आज दहा वर्षें होऊन गेलीं; पण, तुझें प्रेम मी समजूं शकलों, पण तुझा मृत्यु मात्र अजूनहि मी समजूं शकलों नाहीं. तुला काय वाटलें होतें,–तूं स्वतः मरणाला कवटाळून माझें जीवन महान बनवूं शकशील ? झालें का तसें ? माझ्या जीवनांत पावला-पावलाला अंतराय म्हणून आडवा येणारा कलंक,, आपल्या विषमय ज्वालेने माझ्या एक एक क्षणाचा उन्मत्त भडका उडविणारा तो कलंक, स्वतः मरून तूं तो कलंक पुसून टाकूं शकलीस का ?—आज पश्चात्तापाचा तीव्र अनल मला जाळीत सुटला आहे.—हा पश्चात्ताप कशासाठीं, ठाऊक आहे तुला ?

आज सांगतों तुला····आज तूं हें ऐकूं शकणार नाहींस, ऐकून तुझी निर्मल प्रीति शहारून उठूं शकणार नाहीं ! तरीहि, हें बोलून टाकलें म्हणजे माझें मरणहि सोपें होईल.—माझ्या संपूर्ण कलंक-कथेच्या पलीकडे असणारी एक गोष्ट आहे,—खोटेपणाच्या मिथ्या-चाराच्या काळ्याकुट्ट प्रांतांतहि शाश्वत सूर्याप्रमाणें सत्य अशी एक गोष्ट आहे.

ती गोष्ट हीच,........माझें तुझ्यावर प्रेम आहे....

[ प्रभात काळच्या कोणत्यातरी रागिणीचा आभास स्पष्ट होऊन उठला....खोलीतल्या घड्याळांत चार वाजल्याचे ठोके पडले....त्या ठोक्यांची स्वररेषा बाहेरच्या ठोक्यांत मिसळली....बाहेरच्या त्या ठोक्यांची स्वर रेषाहि हळू हळू विलीन झाली ]

# आठव तव विसरातहि

अशरीरी आत्मा, अथवा एकाद्या विशिष्ट परिस्थितींत अवचेतनेने किंवा कल्पनेने धारण केलेलें रूप शब्दांच्या द्वारे किती सहज आणि प्राणवन्त होऊं शकतें त्याचे, हें रूपक एक ज्वलन्त उदाहरण आहे. आजपर्यंत ताज महालाकडे अनेकांनी अनेक दृष्टीनीं पाहिलें आहे आणि अनेक भाषांतून त्याचीं परोपरीचीं वर्णनेंहि झालेली आहेत. प्रस्तुत रूपकांत एक विशेष दृष्टिकोण किती सहजपणे व्यक्त करण्यांत आला आहे तें पाहण्याजोगें आहे. केवळ कवि-कल्पनाहि नाहीं, किंवा केवळ शैलीचें कारुकार्यहि नाहीं, पण दोहोंच्या समावेशांतून जें निर्माण झालें आहे तें सहज, आकर्षक आणि सुंदर आहे.

अभिनय-कालः तीस मिनिटें.

# आठव तव विसरातहि

[ सुमधुर संगीताचे उच्छ्वास क्रमा-क्रमाने अस्पष्ट होत होत गाण्यांत मिसळून गेले....]

" प्रीतीच्या समाधीवरी । शुभ्र मेघांचें हें जाल
ताजमहालाच्या मर्मरीं । कवीच्या अश्रूंचें जल....
ताज महाल—ताज महाल.... "

[हळू हळू गाणेंहि विरलें; उरले केवळ अस्पष्ट संगीताचे उच्छ्वास ]

**निवेदक**:—प्रवास्यांचे समूह ताजमहालाकडे निरंतर जात आहेत....आग्र्याला....अनेक कवींच्या आणि अनेक प्रेमिकांच्या दीर्घ उच्छ्वासांनी पवित्र बनलेल्या त्या प्रीतीच्या तीर्थाकडे....

रात्रीची वेळ—पौर्णिमेची रात्र....

धुक्यांत मिसळलेल्या चंद्राच्या प्रकाशानें एक अपूर्व मायाजाल निर्माण केलें आहे....दोन माणसें एकमेकाला चिकटून अगदीं स्तब्ध-पणें बसलीं आहेत. त्यांतला एक तरुण....आणि त्याच्या शेजारीं एक तरुणी........

**तरुणी**:—आठवते का रवीन्द्रनाथाची ती कविता···

**तरुण**:—हात जोडतों तुला....गोष्टी बोलून ह्या नीरवतेचा भंग करूं नकोस....ह्या निस्तब्धतेचाच अनुभव कर....हा चन्द्रालोक, चमेलीच्या फुलांच्या सुगंधाने ओलावलेली ही रात्र....

[ संगीताचे उच्छ्वास पुन्हां हळू हळू स्पष्ट झाले. चोहोंकडे एक मधुर स्वप्नावेशाची सृष्टि निर्माण झाली....]

**तरुणी**:—हें बघ....

**तरुण**:—काय ?

**तरुणी**:—तो पाहिंलास का,—तो म्हातारा ?—ह्या असल्या रात्रीं....कोण बरं असावा तो ?

**तरुण**:—खरंच कीं !—कोण बरं असेल हा ?

**तरुणी**: - हांक मारूं त्याला ?

**तरुण**:—अंहं !....चल, गुपचूप....पाहूं या....ही कोण मंडळी ?

**तरुणी**:—कोणाला तरी बोलावतो आहे तो....ऐकलंस ?.... किती बारीक आवाज आहे ह्याचा !....असं वाटतं, जसा कांही जगाच्या पलीकडून कुठून तरी बोलतो आहे....ही पहा, ही पहा त्याने पुन्हां हांक मारली—

**शाहजहान**:—ताज !....ताज !....

**मुमताज**:—कोण ?—सम्राट ?—

**शाहजहान**:—नाहीं, मुमताज !....आज तर मी सम्राट नाहीं.— तूंहि साम्राज्ञी नाहींस....मी नुसता शाहजहान, तूं नुसती मुमताज ! ....कशासाठी हांक मारली होतीस मला ?

**मुमताज**:—हें पहा, तुम्हाला एक गोष्ट सांगूं का ?

**शाहजहान**: – कोणती ?

**मुमताज**:—कांही दिवसापासून रोज-रोज, रात्रीच्या निस्तब्ध वेळीं,–माझ्या समाधीच्या भोंवती कोणीतरी हिंडतो अन् सारखा रडत असतो असा मला भास होतो. सुरवातीला मला वाटलं, कदाचित् तुम्हीच····

**शाहजहान**:–मी ? मी कशासाठीं रडूं, ताज ? आपण जिवंत होतों त्यावेळी तूं अन् मी—आपल्यावर वेगवेगळे राहण्याचा प्रसंग तरी येत होता. पण मृत्यूने आपल्याला पूर्णपणें अभिन्न, अविच्छेद्य करून टाकलं आहे....मग....

**मुमताज**:—म्हणूनच तर, माझ्या मनांत सारखा विचार येतो, माझ्या समाधीभोवती रोज रडत, घिरट्या घालणारा हा कोण असावा ? —अगदी रोज, नेमानं, रात्र संपायला आली, शुक्राचा तारा झळ-झळ करायला लागला, की नेमका त्याच वेळीं कोणाच्या तरी पावलांचा आवाज ऐकायला येतो....पहा,–हें पहा,–ऐका—

**शाहजहान**:—मुमताज,–हें पहा, इकडेच हा कोणीतरी येतो आहे.–तोंडाने कांही पुटपुटतोहि आहेच....ऐक !

**सिराज**:—" विसरुं जरि तुला ।

आठव तव विसरांतहि सोडिना मला ॥ "

**शाहजहान**:—रात्रीच्या अश्या अवेळीं भटकणारा तूं कोण आहेस ?

**सिराज**:—कोण ? सम्राट शाहजहान ?– बेगम साहेबा ?— आदाब ! बंदा आदाब करीत आहे !—

**शाहजहान**:—आदाब !—पण तूं आहेस कोण ?—अन् आमच्या समाधीच्या आवारांत असा भटकतो आहेस काय म्हणून ?

**सिराज**:—आपल्याला माझा विसर पडला एकूण, सम्राट ! जग मला विसरलें, माझी स्वत:ची सृष्टि मला विसरून गेली,–पण आज मी पाहतों आहे, आपणालाहि माझी आठवण उरलेली नाहीं !

**शाहजहान**ः—थांब, थांब !—तूं....तूं....तुला मी ओळखतोंसं वाटतं आहे. हां–ओळखलं. तूं.–सिराजच तूं, खरं ना ? थोडा वेळ विस्मरण झाल्यासारखं झालं, ह्यावद्दल माफ कर. आपल्या अमर रचनेनं माझ्या हृदयांतील प्रीतीलाहि अमर करून सोडणारा तूं !–नाहीं, नाहीं, दोस्त. मी तुला विसरलों नाहीं. दुसऱ्या कोणाला ठाऊक असो अथवा नसो, पण हा ताजमहाल तुझ्याच कल्पनेचं दान आहे, हें दगडाचं महाकाव्य ही तुझीच रचना आहे, ही गोष्ट मला चांगली ठाऊक आहे. ती मी कसा विसरेन ?

**सिराज**ः—हंऽ !–पण निष्ठुर जगताला मात्र तिचा पूर्ण विसर पडला आहे....सम्राट, आपल्या नांवाच्या, ऐश्वर्याच्या मागें माझी शिल्प –साधना लोपून गेली....पण, त्याचं मला कांही वाईट वाटत नाहीं....

**शाहजहान**ः—तुला नसेल, पण मला मात्र वाईट वाटतं. ज्या दिवशीं ताजमहाल बांधणं पुरं झालं, शेवटच्या संगमरवरी दगडावर तुझ्या इच्छेप्रमाणं शेवटचं माणिक जडवलं गेलं, त्या दिवसापासून तुझा मात्र मला कुठेंच पत्ता लागला नाहीं....

**सिराज**ः– त्यानंतर मग माझी कोणती गरज उरली होती ?.... माझी इच्छा होती;—पण नको. जाऊं द्या ! ती गोष्ट जगांत कोणालाच ठाऊक नाहीं. आजच, ह्या शंभर वर्षांचा दीर्घ अवधि उलटून गेल्यानंतर, ती उकरून काढण्यांत काय हांशील ? जाऊं द्या बेगम साहेब....जातों मी....

**मुमताज**ः—नाहीं सिराज.–तुझ्या मनातली गोष्ट आम्हाला सांगितल्याखेरीज जाता यायचं नाहीं तुला.

**सिराज**ः– पण, ती सर्वस्वी माझी खाजगी गोष्ट आहे, साम्राज्ञी.

**मुमताज**:—म्हणून काय झालं ? आतां कांही आपण मानवी इतिहासाच्या पानांशीं बांधलेली माणसं नाहीं. आतां आपण पूर्णपणें मुक्त आहोंत त्या बंधनापासून. म्हणून, तुझी गोष्ट आपल्यांतच राहील. मग हा संकोच कशाला हवा ?

**सिराज**:—तो दिवस आठवतो का, सम्राट ?

**शाहजहान**:—तो कसा मी विसरेन, सिराज ? आज देखील अगदी स्पष्ट रूपानं मनांत ती आठवण ताजी आहे. माझ्या एकान्तांत एकेदिवशीं आपल्याशींच विचार करीत पडलों होतों, अन् मनांत दुर्दम्य अभिलाशा उभी झालीं,—मृत्यूनंतरहि मुमताजच्या स्मृतीशीं मी संलग्न होऊन कसा राहूं शकेन !—मृत्यु येईल, अन् आम्हा उभयतांना एकमेकापासून वेगळें करून टाकील, हा विचार एखाद्या भयानक स्वप्नाप्रमाणे माझ्या मनांत घर करून बसला.

**मुमताज**:—आठवतं मला. दुसंर कोणी मिळालं नाही, तेव्हां सम्राट माझ्याजवळ येऊन म्हणाले,—ताज, तूंच सांग. माझ्या ह्या वासनेला मी कोणत्या तऱ्हेने मूर्तरूप देऊं ?

**शाहजहान**:—दिल्लीच्या राज—कोषांत त्या काळांत अपरंपार ऐश्वर्य भरलेलं होतं—देश—देशांतरांतून आलेल्या रत्नमण्यांच्या ओझ्याखालीं राजभांडार दडपून गेलं होतं,—सबंध देश समृद्धीने परिपूर्ण होता....

**मुमताज**:—म्हणूनच मी सुचविलं,—हें ऐश्वर्य शिल्पकाराच्या हातीं सोपवून द्या. केवळ हिंदुस्तानच्याच नव्हे, संपूर्ण आशिया खंडाच्या शिल्प—गुणाला एका विराट कल्पनेंत आकार धारण करूं द्या.

**शाहजहान**:—ती कल्पना ऐकून माझं मन आनंदानं नाचूं लागलं. जें दुसऱ्या कोणीहि केलं नाहीं तें करण्याची अनिवार

इच्छा मनांत जागृत झाली. ह्या विराट, महान् देशांत इकडे-तिकडे विखुरलेल्या शिल्प-प्रतिभेच्या अनेक धारांना एका महासागरांत मी आणून सोडणार ! एवढा मोठा शिल्प-संयोग भारतांत दुसऱ्या कोणा-लाहि, केव्हांहि साधतां येणार नाहीं.–अरब, इराण, गांधार, चीन, तार्तार, भारत....आजवर हे एकमेकाशीं युद्धच करीत आले. एक देश दुसऱ्याची लूट–मारच करीत आला.–पण आतां एक नवीन मार्ग मोकळा करीन मी. प्रत्येक देशाने आपलें श्रेष्ठतम अर्घ्य–दान आणावें, अन् भारताने त्या सर्व निरनिराळ्या फुलांची एक अशी माळ गुंफावी जी कधींहि कोमेजणार नाहीं, जी आशियाच्या अभ्यंतरांच्या मीलनाची प्रतीक म्हणून गणली जाईल,–संपूर्ण प्राच्य-भूखंडातल्या शिल्पाचें जें मीलन–तीर्थ म्हणून गणली जाईल.

**मुमताजः**—पण मग सम्राटांना काळजी पडली,–ह्या विराट विच्छिन्नतेला एका सूत्रांत गुंफणारी, तिचें मिलन-सूत्र कुठें आहे तें शोधून काढूं शकेल अशी प्रतिभा सांपडेल कुठें ?

**शाहजहानः**—म्हणूनच मी हिंदुस्तानच्या कानाकोपऱ्यांतच नव्हे, तर ह्या देशाच्या सीमेबाहेरील सर्व प्राच्यखंडांत आपले दूत पाठविले.–सांगितलं त्यांना, असा शिल्पकार जिथें कुठें लपून बसला असेल त्याला हुडकून आणा !

**सिराजः**—त्या वेळीं मी इराणांत होतों. आपल्या झोपडीसमोर बसलों असतांना माझ्या कानावर दिल्लीच्या सम्राटाच्या दूतांची ती घोषणा आली. त्यांच्या तोंडून मला आपल्या ह्या अपूर्व अभिलाषेसंबंधी इत्थंभूत माहिती कळली. माझं अंतःकरण उचंबळून आलं....पण....

**मुमताजः**—थांबलास कां सिराज ? बोल ना ! पुढें काय झालं ?

**सिराज**:—माझ्या फाटक्या झोपडीच्या आंत, मोडक्या खाटे-वर त्यावेळीं पडलेली होती....इतिहास तिचं नांव जाणत नाहीं, जगाला तिचं नांव ठाऊक नाहीं....—ह्या दीन-गरीब शिल्पकाराच्या प्रेमापायीं एक स्त्री आपला राज-प्रसाद सोडून त्याच्या झोपडींत आली होती,–ऐश्वर्याचं सारं आवेदन सोडून ह्या....

**मुमताज**:—तुझी प्रेयसी !—काय तिचं नांव ?

**सिराज**:–आज आणखी तिचं नांव ऐकून काय होणार साम्राज्ञी ? जगांतील अनंत अनामिकांमधील तीहि एक होती. तिच्या नांवाचा उच्चार करून त्या अनंताच्या श्रेणींतून तिला निराळं करावंसं वाटत नाहीं मला. सर्व अनामिकांची प्रतीक ती, शिल्पी सिराजची प्रेयसी होती, एवढाच तिचा परिचय पुरे !

**मुमताज**:–येऊं देण्याच्या बाबतींत ती तुला आडवी आली वाटतं.

**सिराज**:—मुळींच नाही. माझी अनामिका मला कधींच, कोणत्याहि कामांत आड येत नसे. माझ्या इच्छेंतच तिचं अस्तित्व विलीन झालं होतं....एकीकडे माझ्या जिवाला शिल्प-तृष्णेची अनावर ओढ लागली होती, अन्, दुसरीकडे त्यावेळी मृत्युशय्येवर माझी अनामिका पडलेली होती.–किती किती संध्याकाळ, किती किती रात्री, माझ्या मनांत अस्पष्ट छायेप्रमाणे एक स्वप्न-सौध उभारला जायचा.... पण वास्तवांत त्याला प्रत्यक्ष रूप देण्याचा प्रयत्न करतांच, दगड, माती, लाकूड हेंच हातीं यायचं. कांही जमे ना ! कितीदां मी पुन्हां पुन्हां मोडून त्याची नव्यानं उभारणी केली असेल, पण माझ्या जिवांतल्या स्वप्नाचं रूप मला त्याला कधींच देतां आलं नव्हतं.—त्या दगडांत प्राण फुंकतांच आला नाहीं कधीं मला. माझी सारी

कल्पना कोणत्यातरी अभावामुळें मातीमोल होऊन जायची.—अशावेळीं समुद्रापलीकडून भारताचं आव्हान माझ्या दाराशीं येऊन थडकलं ! पण त्या वेळी मी माझी सारीं कामं बंद ठेवलेली होतीं. माझ्यापुढे विचार एकच होता, माझी नामहीन अनामिका बरी कशी होईल, तिला वांचवायला मीं कोणता उपाय करूं ?—ही माझी रात्रंदिवसाची काळजी माझ्या मुद्रेवरहि दिसूं लागली असावी बहुतेक. म्हणूनच एके दिवशीं ती आपण होऊन म्हणाली,....

**अनामिका**:—सिराज, स्वयंवराची माझी वरमाला व्यर्थच जाणार का ?

**सिराज**:—कां ?–कां बरं असं बोलतेस तूं ?

**अनामिका**: – मी तुझ्यावर प्रेम केलं, आपल्या प्रीतीनं तुझी शिल्पकला सुंदर करतां येईल अश्या इच्छेनं. ती तुझी कला जर अशी आंतल्या आंत गुदमरून जाऊं लागली तर मग माझ्या प्रीतीची सार्थकता कोणती ?

**सिराज**:—तूं चिंता करूं नकोस. मी तुझी प्रीति व्यर्थ होऊं देणार नाहीं. तिच्या बळावर मी ह्या इराणी शिल्पकलेची अशीं फुलं फुलवीन कीं त्यांच्या सुगंधांत तुझी–माझी प्रीति अमर होऊन दरवळत राहील !....

**अनामिका**: – मला ठाऊक आहे, विधात्याची इच्छा असली तर आपली प्रीति कायमच राहील. पण मी तुला हात जोडून सांगतें, इतिहासांत ती दाखल होईल असं कांहींहि तूं करूं नकोस !. ..तुझी शिल्पकला चिरंजीव होवो, आपल्या मीलनांतून निर्माण झालेली तीच आपली संतति ठरो ! – आज कोणती तिथि आहे ?

**सिराज**: – पौर्णिमा !

**अनामिका**: – अश्याच पौर्णिमेच्या एका रात्रीं तुझ्या हांकेला 'ओ' देऊन मी आपला राज–प्रासाद सोडून बाहेर पडलें होतें. आठवतं ?

**सिराज**:—ती गोष्ट मी विसरलों नाही. म्हणूनच तर माझ्या-साठीं प्रत्येकच रात्र पौर्णिमेची रात्र बनली आहे. ज्या दिवशीं तूं आपल्या इच्छेने ह्या जीर्ण-शीर्ण पर्णकुटीची वाट धरलीस,....संपूर्ण इराण देशाच्या नजरा त्या दिवसापासून ह्या झोंपडीकडे वळल्या. हिची जाळून राखरांगोळी करण्याचा त्यांनी कितीदां प्रयत्न केला ! कोणी सांगावं,–त्या दिवशीं तर त्यांनी आग लावूनहि दिली असती–

**अनामिका**: – पण त्या दिवशीं मला काय झालं होतं कोणाला ठाऊक. रात्रीं झोंपच येई ना. तूंहि शहरांतून परतला नव्हतास. मी जागीच खिडकींतून बाहेर डोळे लावून बसलें होतें. मी पाहिलें, चार काळी कभिन्न माणसं हळू हळू एकमेकाशीं काहींतरीं बोलत होतीं. त्यांच्यापैकीं एकाच्या हातांत एक मशाल होती.....ते आपल्या झोंप-डीला आग लावण्याच्या उद्देशानं आले आहेत, हें मी ओळखलं....मी भ्यालें,–दुसऱ्या कशासाठीं नाहीं, पण घरांत तूं काढलेलीं चित्रं होतीं, तीं सारीं जळून जातील म्हणून. घर जळून गेलं तर जावो, मीहि स्वतः त्यांत होरपळून मेलें तरी हरकत नाहीं,....पण तुझीं चित्रं.... त्यांतल्या कित्येकांवरून अद्यापिहि तुझा शेवटचा हात फिरलेला नव्हता ! —मी उठलें, अन् हळू हळू दारातून पुढें येऊन त्या माणसांच्या पुढें जाऊन उभी राहिलें. डोक्यावर चंद्र होता, – अगणित तारका होत्या. पलीकडच्या रानांत कुठें तरी रान-फुलें फुललीं होतीं. वाऱ्यांत त्यांचा गंध दरवळला होता. माझ्या समोर तींच चार माणसं उभी होतीं.

मला पाहतांच त्यांच्या हातांतील मशाल एकदम खालीं गळून पडली. हंसून मी त्यांना म्हटलं,– असे बाहेर उभे काय म्हणून ?– या भाई, आंत या ! अंधारांत त्यांनी एकदां एकामेकांच्या चेहेऱ्याकडे पाहिलं, अन् मग हळू हळू ते माझ्या पाठोपाठ घरांत शिरले. त्यांना मी बसायला आसन दिलं.

**सिराज**:—मी परत येऊन पाहिलं ! वाटलं, घरांत, माझ्या खोलींत, असल्या रात्रीच्या वेळीं इतकी पुष्कळ माणसं आली कोठून ? त्यांची मुद्रा पाहूनच माझ्या उरांत चर्रर झालं. पण जेव्हां तू हांसते आहेस असं मला दिसलं, त्या वेळीं माझं मन शांत झालं.

**अनामिका**:—तूं येईपर्यंत ते माझे बंदे गुलाम बनून गेले होते. आंत आल्यानंतर माझ्याकडे पाहत त्यांच्यांतला एक माणूस म्हणाला, ' तूं माणूस नाहींस,–परी आहेस. ही ज्योत्स्ना आकाशांतून खालीं येत नाहीं, तुझ्याच देहांतून ती निघते आहे. आम्हाला तूं क्षमा कर. '

**सिराज**:—तो तुझ्या रूपाचाच दिग्विजय होता.

**अनामिका**:—पण माझा दिग्विजय तेव्हां झाला नाहीं,–तो पुरा होणार आहे आज....दिवा विझवून टाक....असा जवळ ये, —आणखी जवळ !

**सिराज**:—हें काय ? तुझं आंग असं थंडगार ?

**अनामिका**:—हंऽ !—जो उत्ताप होता माझ्यांत,....तो ह्या शेवटच्या चुंबनांतून मी तुला दिला !....ह्या उत्तापाच्या सहाय्यानेच तूं तुझं स्वप्नमंदिर पूर्ण उभं करूं शकशील, आजवर तुझ्याजवळ इतर

सारं कांही होतं,–एवढया उत्तापाचीच काय ती उणीव होती.–तोच मी आज माझ्या मरणाच्या मधून तुझ्या स्वाधीन करून जातें आहें.

[चारी बाजूंनी जणूं काय असंख्य वीणा झंकारून उठल्या ]

**मुमताज**:–थांबलास काय म्हणून, सिराज ? बोल,– पुढे बोल !—

**सिराज**:—म्हणूनच, सम्राटांच्या मनांतील इच्छा जेव्हां माझ्या कानीं आली, तेव्हां मी तडक हिंदुस्तानांत, दिल्लीमधें येऊन दाखल झालों. तेथें आपल्या मनोकांक्षेबद्दलचें, आपल्या प्रेमाला अमरपदवीवर नेऊन बसवील अश्या एका मर्वर-स्मृतीच्या निर्मितीसंबंधींचें सारें वर्तमान माझ्या कानीं आलें.

**शाहजहान**:—हं ऽ !—पण एकाहि शिल्पकाराची कल्पना माझ्या पसंदीला उतरली नाहीं....प्रत्येकीबद्दल एकच वाटायचं,– सुंदर चित्र आहे, ही कल्पना. पण नुसतं चित्रच. त्यांत प्राण नाहीं ! अन् ज्यांत प्राण नाहीं तें महाकालाशीं झुंज कशी घेणार ?–अश्यांतच, तूं योजलली कल्पना माझ्यापुढें आली. अन उल्हासानें मी म्हणालों, हेंच, हेंच शोधीत होतों मी !

**सिराज**:—त्या दिवशीं मी बोलूं शकलों नाहीं, तें आज बोलतों आहें, सम्राट, क्षमा करा. मी जी परिकल्पना आपल्यापुढें ठेवली होती, ती माझी, केवळ माझी खासगी अशी गोष्ट होती. आपलं स्वतःचं प्रेम अमर करून ठेवावं असं मला कधीं वाटलं नाहीं, मुगल सम्राट आणि मुगल सम्राज्ञीचं प्रेमहि अमर करून ठेवण्याची कधीं माझ्या मनांत इच्छा उत्पन्न झाली नाहीं. माझी इच्छा एकच होती,–ज्या प्रेमाची दीक्षा मृत्यूमधून मला देऊन माझी अनामिका निघून गेली होती, त्या, तश्या

प्रेमाला अमर करून सोडावं ! तें प्रेम नित्य आहे, शाश्वत आहे, अमर आहे ! तेंच प्रेम शाहनशाह बादशहापासून तों गरीबांतल्या गरीब शेतकरी–मजूराच्या हृदयापर्यंतहि एका स्वर्गीय फुलाला फुलवूं शकतं....म्हणूनच, ज्या दिवशीं ताजमहालाची बांधणी पूर्ण झाली, त्याच दिवशी मी माझ्या देशाला परत निघून गेलों. ताजमहाल मुमताजची समाधि मला वाटत नाहीं,–ती मला प्रेमाची समाधि वाटते,–माझ्याच हृदयांत फुलणारं फूल वाटते !

**शाहजहान**:—पण सिराज, आज तर असं कोणालाहि वाटणार नाहीं. आज तर ताजमहाल पाहून प्रत्येकाच्याच मनांत मुमताज आणि शाहजहानचंच चित्र उभं राहील.

**सिराज**:—माझं नांव कोणीहि घेत नाहीं, त्याचं मला यत्:-किंचितहि दु:ख नाहीं. माझ्या प्रेयसीचा तसाच आदेश होता मला. इतिहासांत आमचं प्रेम चिन्हांकित व्हावं असं तिला कधींच वाटलं नाहीं. निखिल–प्रेमांतच तें जिवंत आहे....

**मुमताज**:—पण मग रोज रात्रीं तूं ह्या ठिकाणीं येऊन कां घोटाळतोस ?

**सिराज**:—ती गोष्ट विचारण्याचं कारणच कोणतं, साम्राज्ञी ? हा ताजमहाल, ह्यांतला एक एक दगड, ह्याची रेघान् रेघा,–हीच माझ्या त्या अनामिकेच्या प्रेमाची शिल्लक उरलेली स्मृति. तुम्हाला काय वाटलं, मी मोगल सम्राटाचा मोहोरांनी विकत घेतलेला कारागीर होतों ? मी आलों होतों आपल्या स्वप्न–सौधाला साकार बनविण्यासाठीं ! पैश्याच्या मोबदल्यांत आपली कला विकणाऱ्या कोणत्या शिल्पकाराला हें दगडांचें महाकाव्य रचतां आले असतें ?

[ दूर चार वाजल्याचा ' ठण्–ठण् ' ध्वनि. ]

आतां अधिक वेळ नाहीं....ही पहा, महाकालाच्या देवडीवर रात्र संपून दिवस उजाडल्याची सूचना घणघणली. आतां आज्ञा असावी !—आदाब, सम्राट,....आदाब, साम्राज्ञी....

[ नौबतीवर जोराचा आवाज होऊन मग तो विरून गेला.]

# चाहूल

घटना फारशी नाहीं, भाषेचें नक्षीकाम नाहीं, केवळ मनाच्या अवस्थेच्या निर्णयासाठीं साधारण संभाषणाच्या प्रयोगानें एका विशिष्ट क्षणाला सजीव करूं शकण्यांतच ह्या नाटिकेचा उत्कर्षबिंदु आहे.

चरित्र-सृष्टि नाटकाचें एक अपरिहार्य अंग आहे. ह्या नाटिकेंत व्यक्तिगत चरित्राच्या जागीं एका विशिष्ट क्षणाची आणि त्याच्याशीं संलग्न मनाच्या अवस्थेची निर्मिति केलेली आहे. नभोवाणीवरील नाटकांसाठी 'घटना' मुख्य नाहीं, गौण आहे ह्याचें प्रमाण प्रस्तुत नाटिकेंत सांपडेल.

अभिनय काल: पंधरा मिनिटें

# चाहूल

रेखा:—बाबा !–

बाबा:—काय बाळ ?

रेखा:—डॉक्टर काय म्हणाले ?

बाबा:—काहींच बोलले नाहींत ते.

लेखा:—तुम्ही काहीं तरी लपवून ठेवतां आहांत, बाबा !

रेखा:—जिन्यावरून खाली येतां येतां ते म्हणत होते....

बाबा:—काय म्हणत होते ?

लेखा:— काहींतरीं.—पण तुम्ही म्हणाला–गप्प् !–त्या ऐकतील !

बाबा:—तुम्हीं दोघींनी ऐकलं ?

रेखा:—उंहुं !–मग डॉक्टर काहीं बोलले नाहींत.

बाबा:—डॉक्टरलोकांचं असंच असतं. कधीं मोकळेपणानं गोष्ट सांगतील !–छे. !

लेखा:—पण, आमची आई आजारी आहे,–तिच्या बद्दल आम्हाला काहींच सांगायचं नाहीं ?–

बाबा:—तुम्हाला त्रास होईल ऐकून,–म्हणून !

रेखा:—मनाला त्रास आमच्या आतां देखील होतो आहेच.

लेखा:—आपल्या आईची सेवा–शुश्रूषा आम्ही करूं नये वाटतं !

बाबा:—तुम्हाला कष्ट होऊं नयेत म्हणून तर तुमच्या आईची शुश्रूषा करण्यासाठी नर्स ठेवली आहे.

रेखा:—ही तुम्ही चूक केलीत, बाबा.

बाबा:—चूक ?

लेखा:—हो बाबा. चूकच.

बाबा:—पुन्हा ह्या खेपेलाहि चूकच केली मी ?

रेखा:—हो बावा, हो. चूक नाहीं तर काय ? नर्स, फार झालं तर वेळच्या वेळीं औषध पाण्याचं पाहील, पथ्याचं खायला देईल.–पण आपल्या माणसाचा जिव्हाळा तिला देतां येईल का ?

लेखा:—मी संध्याकाळीं आईच्या खोलीचा पडदा सारून आंत डोकावून पाहिलं होतं. आईची भिरभिर नजर कोणाला तरी शोधीत इकडे तिकडे फिरते आहे, असंच वाटलं मला.–

बावा: हं ऽ !–कदाचित् ती मलाच शोधत असेल !

लेखा:—हं ! नाहीं तर मला.

रेखा:—नाहीं तर मला.

बाबा:—अन कदाचित् आपल्याला सर्वांनाच.

लेखा:—मग आम्हाला तिच्या जवळ कां जाऊं देत नाहीं ?

रेखा:—कां ? काय म्हणून, बाबा ?

बाबा:—कां !–खरंच, काय देऊं याचं उत्तर ?

लेखा:—ती नर्स तर एक मिनिटसुद्धां मला जवळ उभी राहू देत नाहीं.

रेखा:—आमची आई आजारी,–पण आम्हालाच तिच्या पलंगाजवळ जाण्याची परवानगी नाहीं !

लेखा:—आईबद्दल जशी कांहीं आम्हाला काळजीच वाटत नाहीं.

रेखा:—आईवर जसा काही आमचा जीवच नाहीं !

लेखा:—बाबा !

रेखा:—बाबा !

लेखा:—बाबा, तुम्ही बोलत कां नाही ?

रेखा:—तुम्ही तोंड फिरवून बसून काय राहिलांत, बाबा ?

लेखा:—बाबा, बाबा !–

बाबा:—तुम्ही घाबरलांत होय, पोरींनो ?

रेखा:—हो बाबा.–तुम्ही आपले त्या तिकडे टकमक पाहत गप्प बसून राहिलांत !—

लेखा:—आम्ही तुमच्याशीं बोलतों आहोंत,–पण उत्तरच देत नाहीं तुम्ही!—

बाबा:—म्हणून तुम्हाला भिती वाटली ?

रेखा:—नाहीं तर दुसरी कशासाठीं ?

बाबा:—मग तुमचं एका गोष्टीकडे लक्ष गेलं नाहीं !–

रेखा:—कोणत्या ?–कोणत्या गोष्टीकडे ? काय झालं, जें आमच्या लक्षांत आलं नाही ?

बाबा:—तसं झालं नाहीं कांहीं सुद्धां !

लेखा:—मग ?

रेखा:—सांगा ना बाबा !–तुम्ही कांहीं तरी लपवून ठेवतां आहांत !

लेखा:—सांगून टाका बाबा !–आतां कांहींसुद्धा लपवून ठेवूं नका.

बाबा:—तुमची आई गेल्याचा भास झाला मला !

रेखा } :—( आर्त स्वरांत ) बाबा !
लेखा }

बाबा:—कदाचित् ती मलाच बोलावण्यासाठीं आली असावी. दाराजवळ तिच्या लुगडयाचा पदरच तेवढा दिसला मला. मी विचार केला, तिला हांक मारावी, अन इतक्यांत ती निघूनसुद्धां गेली.

रेखा:—आई ?—पण तिला तर, दहा दिवस झाले, अंथरुणावर कड सुद्धां फिरवितां येत नाहीं !—

बाबा:—हं !—कोणाला ठाऊक, आजचं औषध लागू पडलं असेल !

लेखा:—बाबा !—

[ पडदा वाऱ्याने फडफडला असावा ]

रेखा:—हा कोणाच्या पावलांचा आवाज ?

लेखा:—हा पहा, आपल्याच रोखाने येतो आहे !

[ जिन्यावर पावलें वाजताहेत. ]

रेखा:—पडद्याच्या मागें कोण येऊन उभं राहिलं आहे, बाबा ?

बाबा:—कोण आहे ?

रेखा } लेखा }:—कोण ? ?

बाबा:—तुम्ही ?

नर्स:—हो, मी, नवी नर्स ! डॉक्टरनं मला पाठवलं आहे.

बाबा:—पण, इथें आमच्याकडे एक नर्स तर अगोदरपासूनच आहे ?

नर्स:—तें ठाऊक आहे मला. पण आज आणखी एकीची गरज लागणार आहे.—

बाबा:—आजची रात्र काय—

नर्स:—हं.—जरा क्रिटिकलच आहे !

बाबा:—म्हणजे, तुम्हाला काय वाटतं,–ही रात्रहि उलटणार नाहीं ?

नर्स:—मी कधीं म्हटलं तसं ?

रेखा:—तुम्ही तिथेंच काय म्हणून उभ्या ?

नर्स:—सांगितलं ना,–मी नवीन नर्स आहें. पेशंटची खोली ठाऊक नाहीं मला.

बाबा:—चला, मी दाखवतों तुम्हाला.

नर्स:—चला.

रेखा:—बाबा !–

बाबा:—काय बाळ ?

रेखा:—तुम्ही जाऊं नका ना !

बाबा:—भीती कशाची, बेटा ? –हा मी आलोंच बघ परत.

रेखा:—भितीचं नाहीं म्हणत मी, बाबा !

बाबा:—मग !–

रेखा:—आज जें कोणी बाहेरून येणार असेल,–

नर्स:—त्याच्यावर भरंवसा ठेवतां उपयोगाचं नाहीं, असंच ना ?

रेखा:—हो.

नर्स:—कां बरं ?

रेखा:—कोणाला ठाऊक.

नर्स:—रॉट !–चला तुम्ही ! कदाचित् मला आत्तांचे आत्तां एकादं इंजेक्शनहि द्यावं लागेल. डॉक्टरच्या इंस्ट्रक्शन्स आहेत मला तश्या.

बाबा:—चला–चला !

[ कांही क्षण सारेंच निस्तब्ध ]

रेखा:—लेखा !

लेखा:—माझ्या अंगाशी अगदीं खेटून, अश्शी बसून रहा, रेखा!

रेखा:—भिऊं नकोस. ही मी आहें बघ तुझ्याजवळ.

लेखा:—आई सोडून गेली, तर आपलं कसं ग होईल ?

रेखा:—आई ? वेडी!—आई आपल्याला कधीं सोडून जाऊं शकते का ?

लेखा:—ती जाऊं शकत नाहीं, म्हणून तर झगडते आहे.—ते न्यायला आले आहेत,—आणखी येणार आहेत,—त्यांच्याबरोबर आई झुंजते आहे.

[ हलक्या शब्दांचा मर्मर ध्वनि ]

रेखा:—कोण आले आहेत ?—कोण येणार आहेत ?

लेखा:—ऐकूं नाहीं का येत ?

रेखा:—काय ?

लेखा:—पावलांचा आवाज ?

रेखा:—कुठें ?

लेखा:—व्हरांडयांत !—जिन्यावर ! नीट कान देऊन ऐक,—तो पहा, तो पहा !—

रेखा:—नर्स बाबांना काय म्हणून घेऊन गेली ?

लेखा:—ती नर्स नव्हती, रेखा !

रेखा:—( आश्चर्यानें ) नर्स नव्हती ?

लेखा:—मी सांगते तुला, ती नर्स नव्हती.

रेखा:—मग ?

लेखा:—जे येणार आहेत त्यांतलीच कोणी तरी—

रेखा:—कोण येणार आहे पण ?

लेखा:—आपल्या आईला जो घेऊन जाणार आहे, तो.

रेखा:—घेऊन जाणार ?

( अस्पष्ट पावलांचा आवाज पुन्हां ऐकू येतो )

लेखा:—ऐकलास ना पावलांचा आवाज ?

रेखा-आतांच्या खेपेला ऐकल्यासारखा वाटला खरा !

लेखा:-जिन्यावरनं येतो आहे.

रेखा:-आपली चाहूल लागली अन् थांबल्यासारखा झाला.

लेखा:-पडद्याच्या मागे येऊन उभा राहिल्यासारखा दिसतो आहे तो.

रेखा:-पायऱ्या चढून दम लागल्यासारखा दिसतो आहे त्याला.

लेखा:-मला बाई थंडी वाजायला लागली, रेखा !

रेखा:-पडद्याच्या फटींतून गार वारा येतो आहेसं वाटतं, बाई!-

लेखा:-शाल टाकूं का तुझ्या अंगावर ?

रेखा:—हं.-तूं देखील कांहीतर पांघरून घे अंगावर.

लेखा:—ताई ग !-

रेखा:—इश्श !-तुझे हात किती थंड झाले आहेत ग !

लेखा:—पडदा हालतो आहे काय म्हणून ग !-

रेखा:—हा कोणाचा हात दिसतो आहे ?-

लेखा
रेखा } :—कोण आहे ?

शंकर:—मी आहें, रेखा !

रेखा:—शंकर !-

शंकर:—हो !-ओळखलं नाहीं मला ?

रेखा:—एवढया रात्री तूं कसा आलास, शंकर ?

शंकर:—मी यायचं हें ठरलंच होतं मुळीं.

रेखा:—तुझं देखील यायचं ठरलं होतं ?

शंकर:—होय ना !

रेखा:—इतक्या माणसांची जरूर काय, शंकर ?—

शंकर:—म्हणजे, आणखी कोणी आलेलं आहे कीं काय ?

रेखा:—हो ना !–कित्ती तरी !–

शंकर:—असं ?–पण मला तर कोणी दिसलं नाहीं कुठें ?

रेखा:—आम्हाला तरी कुठें कोणी दिसलं आहे !–

शंकर:—मग ?–

रेखा:—पण, पावलांचे आवाज मात्र ऐकले आहेत आम्ही !

शंकर:—हात्तिच्या !–तो मग असेल भोलाच्या पावलांचा आवाज.

रेखा:—भोलाच्या ?

शंकर:—हं !–तो म्हातारा केव्हांपासून सारखा खाली येरझारा घालतो आहे.—

रेखा:—कां बरं ?

शंकर:—तो सांगत होता मला.—म्हणत होता, ह्या घरांत माझं सारं आयुष्य गेलं. ह्या घरची मालकीण लग्न होऊन संसारांत पडली, तें सारं मी आपल्या हातांनी केलं !–आज घरची लक्ष्मी आम्हाला सोडून जाणार ! म्हणूनच एके ठिकाणीं बसवत नाहीं मला !–

रेखा:—तर मग, आमच्या कानीं आला तो भोलाच्या पावलांचा आवाज होता म्हणायचा !

शंकरः—दुसर कोण आलं आहे इथं ?

रेखाः—तूं बैंस इथें, आमच्या शेजारी.

शंकरः—शिः !–किती थंड पडले आहेत तुझे हात !—

रेखाः—लेखा भारी घाबरली आहे !–

शंकरः—अन् तूं ?–

रेखाः—तूं आलास, आमच्या शेजारी वसलास,–आतां मला भिती वाटत नाहीं.

शंकरः—तेवढया साठींच तर आलों मी !—

रेखाः—लेखा !–अग ए लेखा !–

शंकरः—झोप लागली वाटतं तिला !–

रेखाः—असंच दिसतंय !–एकदम कशी बाई झोंप लागली हिला ?

शंकरः—लहान पोर आहे !

रेखाः—आई गेली तर आमचं कसं होईल, शंकर ?

शंकरः—तुझी आई लवकरच बरी होईल बघ, रेखा.

रेखाः—तूं उगाच आपलं, आम्हांला भरंवसा वाटावा म्हणून बोलतो आहेस झालं.

शंकरः—असं कां म्हणतेस तूं ?

रेखाः—तुला कांहींच दिसत नाहीं ?

शंकरः—काय ?

रेखाः—पाहत नाहींस, वारा कसा जड,–भारी झाल्यासारखा झाला आहे ?

शंकरः—एवढंच ना ?–खिडक्या साऱ्या बंद करून ठेवल्या आहेत त्या !

रेखा:—तुझं म्हणणं, खिडक्या बंद आहेत म्हणून खोलींत असं जड जड वाटतं ?

शंकर:—दुसरं काय !–थांब, मी ह्या दोन खिडक्या उघडतों.

रेखा:—शंकर !–

शंकर:—काय रेखा ?

रेखा:—हा आवाज कशाचा झाला ?

शंकर:—खिडकी नाहीं का उघडली मी ?

रेखा:—तो नाहीं रे !–तो निराळाच !–तो बघ, नीट कान लावून ऐक !

शंकर:—खरंच,–कोणी तरी दाबल्या पावलांनी वर येतो आहे, जसा कांही.

रेखा:—ह्या असल्या रात्रीं कोण येणार ?

शंकर—कोणी येणार तर नव्हतं ना ?

रेखा:—आज ज्यांनी ह्या घरांत ये-जा सुरू केली आहे त्यांनी ठरवूनच टाकलं आहे जसं काहीं,—इथे येण्याचा त्यांचा हक्कच आहे जसा !

शंकर:—मी पाहून येतों, कोण जिन्यावरनं येतं आहे तें.

रेखा:—नको, नको !

शंकर:—त्यांत भिती कसली, रेखा ?

रेखा:—तूं माझ्या जवळच बसून रहा. जाऊं नकोस.

शंकर:—पण एकदां पाहूनच येऊं दे ना, कोण येतं आहे तें ?

रेखा:—नको !

शंकर:—बरं तर. बसूनच राहतों.

रेखा:—हें काय ?

शंकर:—काय ?

रेखा:—तुझे ओंठ जसे काहीं भाजून काढताहेत.

शंकर:—तुझ्या बोटांची टोकं कशी बर्फासारखीं थंड गार आहेत !

रेखा:—माझ्या आईची फार इच्छा होती—

शंकर:—तुझं-माझं लग्न व्हावं अशी !

रेखा:—किती दिवसांपासून बाबांच्याहि मागें लागली आहे ती.

शंकर:—तिची इच्छा अपूर्ण राहणार नाहीं.

रेखा:—पण, ती जिथें जायला निघाली आहे त्या ठिकाणीं बातमी पोचविणं शक्य नाहीं.

शंकर:—ती कुठं देखील जात नाहीं, रेखा ! आपल्याला आशीर्वाद देण्यासाठीं ती इथेंच, आपल्याजवळच राहणार !

रेखा:—अजूनहि तूं असं म्हणतोस ?

शंकर:—कां म्हणूं नको ?

रेखा:—खरंच तुला कळत नाहीं ?

शंकर:—नाहीं.

रेखा:—ऐकूं पण येत नाहीं ?.... हा प्रयासानं चाललेला श्वासोच्छास ?—

शंकर:—कुठें ?–मला तर कुठेंच काहीं ऐकूं येत नाहीं.

[ दीर्घ उच्छ्वासासारखा शब्द ]

रेखा:—ऐक नीट कान देऊन !—ऐकलंस ?

शंकर:—हा तर झोपलेल्या लेखेचा श्वासोश्वास !

रेखा:—असं ?

शंकर:—नाहीं का ?

रेखा:—नाहीं !

शंकरः—मग ?

रेखा:—हा आईच्या खोलीकडून येत नाहीं ?

शंकरः—मुळीच नाहीं.

रेखा:—तर मग ?

शंकर:—हा ह्या खिडकीच्या बाजूनेच येतो आहे.

रेखा:—खरं ?

शंकर:—माझी खात्री आहे,

रेखा:—त्या तिथें उभा राहून हा असा कोण मोठ-मोठ्यानं दम टाकतो आहे ?

शंकर:—मी जाऊन पाहून येतों.

रेखा:—नको !

शंकर:—तूं गुपचुप बसून रहा.

[बाहेरून भोला आणि बाबा एकाएकीं आर्त स्वरांत किंचाळले]

बाबा:—कोण आहे ?

भोला—कोण आहे ?

रेखा:—कोण ?

लेखा:—कोण ग ताई, कोण ?

शंकर:—भिऊं नकोस रेखा, भिऊं नकोस.

बाबा:—गप !—तिथून नको !—खोलींत ये.—तूं कशासाठीं आलास वर, भोला ?

भोला:—माझ्या खोलीच्या दारापुढून कोणी तरी झप् झप् पावलें टाकीत निघून गेली !—पांढरे कपडे घातलेली बाई होती कोणी तरी.

रेखाः—बाबा ? कोण गेली ?

बाबा:—नर्स गेली होती गरम पाणी आणण्यासाठीं.

भोला:—मग ती परत येतांना नाहीं कुठं दिसली ती ?

बाबा:— परत आली नाहीं तर काय !–

भोला:–मी जिन्याकडे उभा होतों;–एक तास भर सारखा वर—खालीं जात येत होतों,– मला कशी नाहीं दिसली येतांना ?

बाबा:–आज तीस वर्षं झालीं ह्या घरांत नोकरी करतो आहेस.—वर यायला दुसराहि जिना आहे तें तुला ठाऊक नाहीं ?

भोला:–माझं डोकं कुठं ठिकाणावर आहे, साऱ्या गोष्टींची आठवण रहायला !–मला वाटलं, बाईच जणूं काय निघून गेल्या !—

[ दाबलेले हुंदके देऊं लागला ]

रेखा:–गरम पाणी कशासाठीं, बाबा ?

बाबा:– नवी नर्स आली आहे ना ?—तिला चहा हवा होता, म्हणून.

रेखा:–चहा ?

बाबा:–तिला येते आहे जबरदस्त झोप. डोळे उघडेच राहत नाहींस तिचे.

भोला:–असंच होत असंत ताई, असंच होत असंत !—घरांतून काढून न्यायला ते आले ना, म्हणजे घरांतल्या साऱ्या माणसांच्या डोळ्यांत झोप भरून सोडतात जशी काहीं.

लेखा:–मला देखील झोप लागली होती.

रेखा:–आई जोरजोराने दम लागल्यालारखा श्वास घेत आहे बाबा ?

बाबा:–नाहीं तर !—कां बरं ?

रेखाः–आम्हाला तसं ऐकूं आलं म्हणून म्हणतें !

शंकरः–तो कोणाच्या श्वास घेण्याचा आवाज नाहीं, रेखा.

रेखाः–मग ?

शंकरः–रस्त्यालगतच्या झाडामधून वारा वाहतो आहे, त्याचा आवाज आहे तो.

बाबाः–तूं आलास, शंकर ?

शंकरः–येईन असं कबूल करूनच गेलों होतों मघाशीं.

बाबाः–आतां तुझ्यावरच आमचा सारा भरंवसा आहे.

शंकरः–तुम्ही सारे असं काय करतां आहांत ?

बाबाः–आम्हाला सारखं वाटतं, घरांत कोणीतरी हिंडत फिरतं आहे मघापासून.

रेखाः–कोण तें आम्हाला दिसत नाहीं, पण त्याच्या पावलांचा आवाज मात्र सारखा ऐकायला येतो.

भोलाः–असंच होत असतं, ताई, असंच होत असतं !– माझा बाप ज्या दिवशीं मेला – त्या दिवशीं—

लेखाः–नको भोला, ती गोष्ट काढूं नकोस तूं.

भोलाः–ठीक आहे. नाहीं बोलत, तुम्हाला भिती वाटते तर. नाहीं बोलत मी. पण त्या लोकांची भिती बाळगण्याचं काहीं कारण नसतं खरोखरी !

[ पुन्हां पावलांचा आवाज ]

रेखाः-कोण आहे तिकडे ?

लेखाः-कोण ?

नर्सः-तुम्हा मंडळीला झालं आहे काय ?

रेखाः-तुम्ही अश्या गुपचुप हिंडणं फिरणं कां करीत असतां ?

नर्स:-नर्सेला तेंच शिकावं लागत असतं.

रेखा:-नाहीं!-घरांत रोगी अत्यवस्थ पडलेला. अश्यावेळीं भुता सारखं हिंडणं-फिरणं करूं नये कोणी!

नर्स:-रोगी अत्यवस्थ, म्हणूनच तर आज असंच चालायला हवं, फारसा आवाज न करतां बोलायला हवं.

भोला:-नाहींतर त्यांना येईल राग.

नर्स:-कोणाला?-

भोला:-ज्यांचं जाणं-येणं सुरू आहे, त्यांना.

लेखा:-कोण रे भोला?-कोण करतं आहे जा-ये?

भोला: त्यांना देह नाही, पण गति आहे. त्यांना कोणी थोपवून धरूं शकत नाहीं. कडेकोट बंदोबस्तानं पक्कं लावलेलं दारहि त्यांना अडवूं शकत नाही. जाड भिंतीतूनहि ते सहज पलीकडे निघून जाऊं शकतात.-ते.....

लेखा:-भोला, पुरे कर तुझं हें सारं.

भोला:-नाहीं बोलत ताई, नाहीं बोलत हें सारं. तूं आणखी भीशील म्हणून बोलणं बंद करतों मी आपलं.

नर्स:-बाबासाहेब, आपण माझ्याबरोबर त्या खोलींत चलतां का?

बाबा:—चला.

रेखा:—भोला!-

भोला:-काय, ताई?

रेखा:-तूं ज्यांची गोष्ट सांगत होतास, ते येतात कशाला रे?

[ तऱ्हेतऱ्हेचे आवाज ]

लेखा:—हा कशाचा आवाज भोला?

भोला:–रहायचे नाहींत नेल्याशिवाय !– अगदी न जुमानतां घेऊन जाणार !

रेखा:–नको भोला !–ती गोष्ट पुन्हा नको आतां.

भोला:–ठीक आहे. तुम्हाला जेव्हां तेव्हां भिती वाटायला लागते: तेव्हां नाहीं बोलत मी.

लेखा:–गप्प !–सारे गप्प बसा पाहूं तुम्ही !

रेखा:–कां ग, लेखा ?

लेखा:–पुन्हा मला. कशाचा तरी आवाज ऐकूं आल्यासारखं वाटलं !–तो पहा.

रेखा:–शंकर, हा कशाचा आवाज ?

शंकर:–थंडीची रात्र आहे—

लेखा:–अंहं !–पहा कसा ' खस–खस ,' आवाज होतो आहे.

रेखा:–हो. कोणीं तरी साडी नेसून जातं आहे जसं कांहीं.

शंकर:–भलतंच !–बाहेरच्या झाडावरची फुलं गळून पडताहेत.

रेखा:–खरंच. बाहेर फुलं पडताहेत झाडावरनं खालीं.

शंकर:–आणूं थोडीशीं वेंचून ?

रेखा:–नको. राहूं दे तीं. तूं जाऊं नकोस.

लेखा:–हें कुत्रं कां असं ओरडतं आहे ?

रेखा:–खालीं एक मांजर पण ओरडतं आहे.

लेखा:–तेंच काळं मांजर.

रेखा:–गोठ्यांतली आपली गाय देखील दचकून उठली वाटतं, भोला.

बाबा:– ( पलीकडच्या खोलींतून )–रेखा !–लेखा !–

रेखाः–बाबा हांक मारताहेत.

रेखाः–तूं गप्प कां, शंकर ? चल, बाबा बोलावताहेत.

लेखाः–पुन्हां हांक कुठें मारली त्यांनी ?

[ एकदम सारें स्तब्ध–कांही क्षणांच्या ह्या स्तब्धतेंत कशाचा तरी जणूं काय संकेत ]

रेखाः–सारे असे गप्प कां ?

लेखाः–कुत्रंहि ओरडत नाहीं.

रेखाः–मांजर पण ओरडायचं थांबलं.—शंकर, तूंहि कांही बोलत नाहींस.

लेखाः–भोला, कोणी नाहीं तर तूंच कांही तरी बोल.

रेखाः–बाबाहि गप्प कसे ?–चल शंकर, आपण त्या खोलींत जाऊं.

लेखाः–हा आणखी कोणाच्या पावलांचा आवाज ?

रेखाः-बाबा येताहेत !- बाबा !–

बाबाः–रेखा !- लेखा !–

रेखाः–तुमचं तोंड असं कसं पांढर फटफटीत? काय झालं ?–बाबा ?

लेखाः–बोला बाबा, कांही तरी बोला ना !

रेखाः–बोला बाबा.

लेखाः-बाबा !–

बाबाः-तुमची आई....

रेखाः-आई कशी आहे, बाबा ?

लेखाः-बाबा, बोला ना ?

बाबाः–नाही वाचवूं शकलों.

रेखा:-बाबा !–

बाबा:–घेऊन गेले !-ते तिला घेऊन गेले !

भोला:–कोण अडवूं शकणार ? ते जेव्हां न्यायला येतात तेव्हां त्यांना कोण अटकाव करूं शकणार ? मला चांगलं ठाऊक आहे !–

[ चारी बाजूंनी विकट शब्द; जणूं, कांही तरी कडकडून तुटून पडतं आहे; कोणी कांहींतरी खालीं आपटून आपटून तोडतें आहे........ ]

# स्वप्नविलास

नभोनाट्यांत तऱ्हेतऱ्हेचें वैचित्र्य संभवनीय असतें, त्याचें प्रस्तुत नाटक एक विशेष उदाहरण आहे. ह्या नाटकाचा मूळ उद्देश, निरनिराळ्या युगांतील साहित्याच्या व समाजाच्या आदर्शांचा तुलनामूलक विचार करणें, हा आहे. नीरस, वैदग्ध्य-क्लिष्ट अश्या आलोचनेला नभोनाटकाच्या रूपांत ढाळून अत्यंत सरस कसें बनवितां येणें शक्य आहे तें ह्यावरून स्पष्ट होईल. ह्या नाटकाचें स्थळ कल्पित साहित्य-स्वर्ग, आणि काळ सीमातीत आहे. म्हणूनच तीन युगांतील तीन नायिका एकाच पटभूमीवर येऊन उभ्या राहिलेल्या येथें आढळतात. निरनिराळ्या युगांतील असूनहि भाग्य-विपर्ययांत त्या एकसारख्याच आहेत, विभिन्न युगांतील असूनहि आणि त्यांचे दुर्दैव एकसारखेंच असलें तरी, युगरीतीच्या, व्यक्तित्त्वाच्या आणि आत्मप्रकाशाच्या बाबतींत त्यांत विभिन्नत्व आढळल्या वांचून राहणार नाहीं.

अश्या प्रकारचें नभोनाट्य कदाचित् सर्व-साधारणांसाठी अनुकूल वाटणार नाहीं हें खरें, तरी साहित्यिक श्रोत्यांच्या समाजांत त्याचा आदर झाल्यावाचून राहणार नाहीं.

अभिनय कालः—३० मिनिटें

# स्वप्नविलास

**निवेदकः**—परलोकांत कृष्णकांत राय आपल्या शयन–कक्षांत पलंगावर बसला आहे, त्याने उशीवर पाठ टेकलेली आहे आणि तो गुडगुडी ओढीत आहे. संसारांतील सर्वश्रेष्ठ मादकद्रव्यांपैकीं एकमात्र औषधि ' अहिफेन ' उर्फ आफूच्या निशेंत तो गुंगत पडला आहे. गुंगीत त्याला स्वप्नेंहि दिसतात. त्याने पाहिलें, मृत्युलोकांत त्याने करून ठेवलेलें मृत्युपत्र आतां एकाएकीं विक्रीला काढलें गेलें आहे. जणूं काय हरलालनें तीन रुपये तेरा आणें किंमतींत त्याची सारी संपत्ति विकत घेऊन टाकली आहे. त्याने आणखी पाहिलें,–ब्रह्मयाचा पुत्र विष्णु आला आणि वृषभारूढ शंकराजवळून त्याने एक कटोराभर आफू कर्ज म्हणून घेतली. कर्जरोख्यांत त्यानें हें सारें विश्व–ब्रह्मांड लिहून दिलें. महादेव होते गांज्याच्या तारेंत. ' फोर क्लोज ' करायला ते विसरतच होते. इतक्यांत त्यांना सावध करण्यासाठीं भगवती पार्वतीमाई धावत आल्या!

अश्यांतच विनोदिनी आणि किरणमयीला घेऊन रोहिणी आली.

**रोहिणी**:—आजोबा, झोप लागली कीं काय ?

**कृष्णाकांत**:—आजोबा ? गांज्याच्या धुराने तुझी मति भ्रमिष्ट झाली की काय, भगवती ? महादेवाला तूं ' आजोबा ' कोणत्या नात्याने म्हणतेस ?

**रोहिणी**:—( खळखळून हांसत ) आजोबांच्यावर आफूचा अंमल चढला आहे वाटतं!—महादेवाच्या गोष्टी कुठल्या काढल्या ह्या?

**कृष्णकांत**:—( दचकून, शुद्धीवर येऊन ) कोण ग तूं ? आश्विनी, भरणी, कृत्तिका, रोहिणी ?

**रोहिणी**: – होय. तीच मी रोहिणी !–अन् बरोबर आर्द्रा, पूनर्वसूहि आहेत माझ्या. एकदां कृपा करा, अन् नीट डोळे उघडून पहा तरी आमच्याकडे,–पहा पाहूं,–ओळख पटते का ?

**कृष्णकांत**:—तेंच तर पाहतों आहे ग !–हे इतके चंद्र एकदमच कुठून उगवले, म्हणतों मी? पण कां ग रोहिणी, ह्या मेलेल्यांच्या जगांत एवढया पुष्कळ' चंद्रांचा प्रकाश कशासाठीं?–ह्यांना मी ओळखतों असं कांही वाटत नाहीं !

**रोहिणी**: – ही आहे रवीन्द्रनाथांची विनोदिनी ! आम्ही हिला 'डोळ्यांतला खडा' म्हणून हांक मारतों.

**कृष्णकांत**:—अरे वा: !–फारच देखणी पोर दिसते ! जोडलेल्या भवया, तीक्ष्ण दृष्टी, सुंदर चेहरा ! फार देखणी पोर !—

**रोहिणी**:--अन्, ही आहे शरच्चंद्राची किरणमयी.

**कृष्णकांत**: – वा: ! वा: !!–

**रोहिणी**: – कशी आहे ही ?

**कृष्णकांत**: – एकाच वाक्यांत सांगतों,-असं रूप पृथ्वीवर कुठे पाहिलं नाहीं !

**रोहिणी**: – अन् मी ?--मीच काय ती आपली अशी--तशी, उपेक्षणीय वाटतं !

**कृष्णकांत**:—तूं ?-तुझ्या ओंठावर विडयाचा रंग, हातांत कंकण, मोहक किनारीची साडी नेसलेली तूं, अन् तुझ्या खांद्यावर लोळते आहे काळ-भुजंगिनीप्रमाणें गुंफलेली लोलायमान वेणी !

तुझ्या डोळ्यांत कटाक्ष आहेत. तुझं भय कोणाला वाटणार नाहीं ?–पण आहे काय भानगड, सांग तर खरी ? असल्या भलत्या वेळीं तुम्ही इतक्याजणी ह्या म्हाताऱ्याच्या शयन-कक्षांत शिरलांत कशा-साठीं ? मृत्युपत्राची ती कहाणी तर आतां जुनी––पुराणी झाली, संपली देखील.

**विनोदिनीः**—आम्ही तुमच्याकडे आलों आहोंत तुमचं मत घ्यायला.

**कृष्णकांतः**—मत ? कशाबद्दल मत ?

**किरणमयीः**—एकदां नीटपणें आमच्या चेहेऱ्यांकडे न्याहा-ळून पहा बघूं ! इतकं रूप विधात्यानें पृथ्वीवर कधीं कुणाला दिलं आहे ? –हें सारं व्यर्थच का ? ह्याचं सार्थक करण्याबद्दल त्यानं काहींच कशी योजना आंखली नाहीं ?

**कृष्णकांतः**—झालं !–आपूची सारी मजा मातींत मिळाली आज !–बरं, जाऊं द्या. किरण, स्त्रीचं रूप म्हणजे काय असं तुला वाटतं ?

**किरणः**—मला तर वाटतं, संततिधारणासाठीं जीं सारीं लक्षणं स्त्रीच्या बाबतींत सर्वांपेक्षां अधिक उपयोगी असतील, तेंच तिचं रूप ....रूप म्हणावं कशाला, तें जाणण्याचा प्रयत्न करतांना इथेंच काहीं त्याच्या थांगपत्ता लागल्यासारखा वाटतो. म्हणूनच, स्त्रीचं बाल्यरूप जरी माणसाला आकृष्ट करीत असलं तरी तें त्याला उन्मत्त करीत नाहीं.—अन्, जेव्हां संतानधारणेच्या वयाच्या सीमेपलीकडे ती निघून जाते, त्यावेळींहि तसंच होतं. केवळ स्त्रीचीच नव्हे, पुरुषांचीहि अशीच दशा आहे. जोंपर्यंत त्याच्या ठायीं सृजन-शक्ति आहे तों

पर्यंतच त्याचं रूप. ही सृजन–शक्ति म्हणजेच त्याचं रूप, यौवन. ही सृजन करण्याची इच्छा म्हणजेच त्याचं प्रेम!–असे स्तंभित झाल्या-सारखे पाहतां काय माझ्याकडे ?

**कृष्णकांत**:—पाहतों आहें तुझा बेफाम धीटपणा, किरण! स्वर्गीय प्रेमाची तूं प्रवृत्तीच्या प्रेरणेशीं बरोबरी करतेस ?

**किरण**: – मी त्यांची तुलना नाहीं केली, आजोबा! त्या दोन्ही गोष्टी एकच आहेत, एवढंच फक्त सांगितलं. एंजिन मधील जें यंत्र, जी शक्ति, त्याला पुढें ढकलते, तीच त्याला मागेंहि ढकलूं शकते. —सुंदर म्हणा, कुत्सित म्हणा, पण प्रेम करूं शकतो तोच, ज्याच्या ठायीं ती शक्ति असते.

**कृष्णकांत** – हीं गोष्ट तूं मला समजावून सांगायला आलीस, किरण! माझा गोविंदलाल—

**किरण**:–तुमच्या गोविंदलालचीच गोष्ट सांगतें. त्याच्या ठायींच्या ज्या एका शक्तिमुळें त्याने भ्रमरवर प्रेम केलं, त्याच शक्तिने त्याला रोहिणीकडे एका कुत्सित ओढीने खेचून आणलें. पण हें कुत्सित प्रेम हरलालला करतां येणं शक्य झालं नाहीं. पण म्हणून, तो मनुष्य गोविंदलालपेक्षां चांगला होता असं नाहीं.

**कृष्णकांत**:–पण त्याचा परिणाम काय झाला ?

**विनोदिनी**:–रोहिणी गोळी खाऊन मेली, किरणमयी वेडी झाली, मी काशीला जाऊन बसलें. मला तुम्हाला प्रश्न विचारायचा आहे तो हाच. रूपाने, गुणाने आम्ही कोणापेक्षांहि कमी नव्हतों. समाजाच्या रणक्षेत्रांत तरीहि आम्हाला हार कां खावी लागली मग ?

**कृष्णकांत**:–समाजाकडून आपण ह्यापेक्षां निराळी अशी कोणती अपेक्षा करूं शकतों, विनोद ? बरं. आतां तुम्ही एक एक सांगा बरं मला, तुम्हाला कोणत्या गोष्टीची इच्छा होती, अन तुम्हाला काय मिळूं शकलं नाहीं ?

**रोहिणी**:–( उत्तेजित भावाने ) मी माझीच गोष्ट अगोदर सांगतें. मला हवा होता गोविंदलाल ! गोविंदलालनेहि माझ्यावर प्रेम केलं. तरीहि तो मला मिळण्याच्या बाबतींत किती तऱ्हेच्या आडकाठया आल्या ! भ्रमरने बोलावूं पाठविलं होतं त्याला आपण होऊन,–मरायला. मग तुम्ही गोविंदलालला त्याच्या वडिलार्जित संपत्तीपासून वंचित कां केलं ? संसारांत माझा कशावरच का हक्क नव्हता ? कोणत्याहि दिशेने हात पुढें करतांच तुम्ही सारे मिळून मला हांकून लावण्यासाठी काय म्हणून तुटून पडत होतां ?

**कृष्णकांत**:–समजलों. आतां विनोदिनी, तुझं काय म्हणणं आहे, सांग ?

**विनोदिनी**:–ऐकावं असं माझ्याबाबतींत फारसं नाहींच. पण एक तुम्ही सांगूं शकतां का, आजोबा ? विहारीबाबूची जर माझ्यावर एवढी श्रद्धा होती, तर मग, तो तिथेंच कां थांबला ? माझ्यावर त्यानं प्रेमहि केलं असतं तर काय बिघडलं असतं ? तोहि आशेच्या प्रेमांत कां गुरफटला ? मी वाईट असेन, कशीहि असेन. पण एकदां माझ्या अंतरांतली गोष्ट समजून घेण्याचा प्रयत्न करा. महेन्द्राच्या घरांत राहून मी आपल्या हृदयांतल्या आगींत होरपळत होतें. एकदां मनाला भास झाला, मी महेन्द्रवरच प्रेम करतें आहें म्हणून. पण तो भ्रम होता.

**कृष्णकांत**:–अन् किरणमयी, तुझी गोष्ट सांग आतां.

**किरणमयी**:-माझी गोष्ट ? जीवनांत मी केवळ इहकाळ अन् माझा स्वत:चा देह ह्या दोनच गोष्टी काय त्या खऱ्या असं मानलं. माझा स्वर्गावर विश्वास नव्हता, परमेश्वरावर विश्वास नव्हता, आत्म्यावर विश्वास नव्हता. पण जीवनांत ह्या माझ्या जळत्या मेल्या देहाला आणखी कशाचीहि भूक नव्हती, भूक होती फक्त प्रेमाची ! त्याची ही प्रेमाची भूक मी दुसऱ्या कशानेहि शमवूं शकलें नाहीं. ह्या प्रेमानेच माझ्याहि अंत:करणांत वणवा पेटवून दिला. सर्वनाशाची नशा माझ्या मनावर चढली. पण ज्याच्यावर प्रेम करूं जातांच रोज तिरस्कारावाचून दुसऱ्या कशाचाहि लाभ मला झाला नाहीं, त्याचा सर्वनाश करायला निघतांच नाश केला मी एका अबोध युवकाचा! तिथेहि मला हारच खात्री लागली. हें रूप, एवढी सारी बुद्धी अन् विद्या, कशाचाच कांहीं उपयोग झाला नाहीं. कां असं झालं, आजोबा ?–कां ?

**कृष्णकांत**:-तुमची प्रत्येकीची कहाणी ऐकली. गोष्टी तीन, पण अर्थ एकच. ऐकून मला वाटतं, तुम्ही तिघीहि खरोखरीच एकच आहांत ! एकच रोहिणी जन्माजन्मांत काया बदलून अवतीर्ण झाली आहे. तुम्हा तिघींतलं निराळेपण केवळ काळाचं, बाहेरच्या आवरणाचं! तिघीहि प्रवृत्तीच्या प्रेरणेने आंधळ्या झालेल्या, अन् सूडाच्या नादांत चुका करणाऱ्या. कदाचित् काहीं इतर सामान्य गोष्टी घडल्या असतील निरनिराळ्या, पण तिघीहि खेळल्या एकच खेळ. बंकिमचन्द्राच्या शब्दांत सांगायचं म्हणजे, " धावता मृग आटोक्यांत गवसल्यानंतर कोणता धंदेवाईक व्याध त्याला बाण मारल्यावाचून राहील ? पुष्कळ माणसें मासे पकडतात,-निव्वळ मासे पकडण्यासाठीं.- ते मासे खात नाहींत, सोडून देतात. " शिकार केली जाते ती नेहमी

खाण्यासाठी नाहीं; पुष्कळदां ती केवळ शिकारीच्या आनंदासाठींच केली जाते. रूपाच्या दंभाने, बुद्धीच्या अहंकाराने तुमच्यावरहि तोच खेळ खेळण्याची मस्ती चढली होती. दुर्दैवाने तुम्ही मारलेला तीर येऊन लागला तुमच्या स्वत:च्याच हृदयावर !

**किरण**:—नुसता दुर्दैवालाच दोष देऊन तुम्ही ह्या गोष्टीला उडवून लावाल ?

**कृष्णकांत**:-दुसरं काय करूं मग, तूंच सांग ? तुम्ही जें काहीं केलं ते खेळ सोडून दुसरं काहींहि नव्हतं. अन् खेळ म्हटला कीं त्यांत हारणं. जिंकणं आलंच ! तुम्ही हारलांत हें खरं, पण, कोणी सांगावं, तुम्ही जिंकूंहि शकलां असतां.

**रोहिणी**:-जिंकू शकलों असतों ?

**कृष्णकांत**:-शंका आहे कीं काय ? खेळांत कोणता पक्ष हारेल अन् कोणता जिंकेल, हें कोण सांगू शकतो ?

**विनोदिनी**: समजा, आम्ही जिंकलों असतों, तर काय परिणाम झाला असता ?

**कृष्णकांत**:-तो तर डोळ्याला स्पष्ट दिसतो आहे. रोहिणीने गोविंदलालशीं अन् किरणमयीने उपेन्द्रशी लग्नं लावून टाकलीं असतीं ! भ्रमर मेल्यानंतर गोविंदलालने रोहिणीला घेऊन कलकत्त्यांत घर केलं असतं. कारण खेडेगावांत विधवा- विवाहाची प्रथा त्याकाळांत नव्हती. पैसा अडका सारा भ्रमर गोविन्दलालला देऊन गेली होतीच. त्याचे दिवस चांगले राजासारखे गेले असते. हवं काय आणखी ? त्याची मुलं विलायतेहून बॅरिस्टर होऊन आलीं असतीं, बडया लाटसाहेबाच्या एक्झिक्यूटिव्हचीं सदस्य झालीं असतीं !

**रोहिणी**:-मग तसं होऊं दिलं असतं तर त्यांत बंकिमबाबूंचं काही गाठोडं गेलं असतं का ?

**कृष्णकांत**:-मुळींसुद्धां नाहीं.

**किरण**:-मग त्यांनी कां तसं केलं नाही ? कां गोविंदलालच्या हातून मला निष्कारण गोळी मारविली ?

**कृष्णकांत**:-कारण ते तुमच्या-आमच्यासारखे साधारण मनुष्य नव्हते. ते कवि होते !

**रोहिणी**:-कवींच्या हृदयांत दया-माया कांहीं नसते वाटतं ?

**कृष्णकांत**:-नक्की ठाऊक नाहीं.-मी तर काहीं कवि नाहीं. तूं मृत्यु-पत्राची चोरी केलीस, त्याबद्दल मी तुला क्षमा केली होती; पण कवि तुला त्याबद्दल क्षमा करूं शकला नाहीं.

**विनोदिनी**:-माझ्या मनांत काय येतं, सांगूं ?

**सर्वजण**:-काय ?

**विनोदिनी**:-कवि सारे विधात्यासारखेच निष्ठुर असतात. माझ्या बिहारीभाऊजीं-सारखेच अगदीं. तरीपण, जितकं दुःख ते दुसऱ्यांना देतात त्यापेक्षा दसपट अधिक दुःख स्वतःच भोगतात. त्या निष्ठुरतेंतहि, मला वाटतं, एक प्रकारचं सौंदर्य आहे.

**रोहिणी**:-( क्रोधाने )-म्हणूनच तूं बिहारीबाबूंच्यापाशीं जाऊन धडपडलीस वाटतं.

**विनोदिनी**:-असंभव नाहीं, बाई. त्या पाषाणासारख्या निष्ठुर माणसाने माझ्या संपूर्ण दंभाचा जसा कांहीं चुरा चुरा करून टाकला. केवळ माझीच गोष्ट नाहीं, रोहिणी. तूं ह्या किरणलाहि विचारून पहा ना. तिचा उपेन्द्रबाबूहि असाच निष्कलंक, निष्ठूर माणूस होता.

**किरण**:–खरं आहे. बायका कश्या, कुठं जाऊन धडपडतील, कोणालाहि सांगतां यायचं नाहीं. एके दिवशीं अगदीं मनीं–मानसीं नसतांना तो मला अचानकपणे लाभला, अन् तशींच एके दिवशीं मी त्याला अचानक गमवूनहि बसलें. त्यानंतर, माझ्या ह्या अगदींच साधारणश्या जीवनांत जें मी असाधारण नाटक निर्माण केलं तें जसं काहीं दगडावरची रेघच ठरलं. विनोदिनी, तुझं भाग्य थोर, म्हणून बिहारीबाबू शेवटपर्यंत तुलाच मिळाले असं म्हटलं पाहिजे ! त्यांचं तुझ्यावर प्रेम होतं, तुझ्याशीं लग्न लावायला देखील ते तयार झाले होते. पण माझ्याबद्दल तर विचार करून पहा थोडा ! माझ्यासारखी विटंबना किंवा तिरस्कार आपल्या पैकीं कुणालाच सहन करावा लागला नाहीं. अन् मोबदल्यांत पदरांत काय पडलं ? जीवन—सागर पार करण्यासाठीं कशाचाहि आसरा मला मिळूं शकला नाहीं ! एवढं झाल्यानंतर वेड लागणार नाहीं तर काय होईल दुसरं, माणसाला ?

**कृष्णकांत**:—किती हृदयद्रावक कारुण्यानें भरलेली कहाणी आहे ही ! पण नवल पहा, सीतेचं दुःख ऐकून किती युगांपासून माणसांच्या डोळ्यांत अश्रु भरून येतात, पण तुमची दुःखं ऐकून कितींचे डोळे ओलावतात, सांगा ?

[ थोडीशी स्तब्धता, दूर करुण संगीत; किंचित् समुद्राच्या-लाटांचा ध्वनि, आणि जहाजाचा भोंगा ]

**किरण**:—दिवाकरला घेऊन जहाजांत बसून आराकान मध्यें मी पळून गेलें होतें, त्या प्रसंगाची आठवण आली मला. काय ते दिवस होते, बाई–बाई ! मनांत आठवण आली कीं छातीची धडधड वेडावूं लागते.

**विनोदिनी**: – दिवाकरला घेऊन तूं कां पळून गेलीस, किंवा मी स्वतःतरी महेन्द्राच्या नाकांत वेसण घालून त्याला कां नाचवीत सुटलें ? ह्या गोष्टीचा विचार मनांत आला कीं वाटायला लागतं, बायकांचं मन तरी किती विचित्र! तिचं तिलाच आपलं मन कळत नाहीं !

**रोहिणी**: – पण, सर्वापेक्षां अधिक आश्चर्य मला कशाचं वाटतं ठाऊक आहे ?

**विनोदिनी**: – कशाचं ?

**रोहिणी**: –ज्याच्यासाठीं अर्धं अधिक हिंदुस्थान तूं पालथं घातलंस, अन ज्याच्या नाकांत वेसण घालून त्याला हिंडवीत बसलीस, त्यानंच जेव्हां आपल्या तोंडांन तुझ्याजवळ लग्नाची गोष्ट काढली तेव्हां तुझ्या अंगांत संचरला नीतिवागीश दार्शनिक तत्त्वज्ञानी !

**विनोदिनी**:– नीतिवागीश, दार्शनिक, तत्त्वज्ञानी ! – शिः ! मी एक विधवा, समाजाने तिरस्कारलेली, लांछित ! मी आपल्या क्षुद्र देहाच्या एवढया सुखासाठीं त्याला कलंकित करूं ? तें होणं शक्य नाहीं!

**किरणः** – दुसरं काय होणं शक्य होतं, तर मग ? कशासाठीं तूं सारा देश पालथा घालीत हिंडलीस ? त्या बिहारीबाबूच्या घरीं गेली, होतीस ती तरी कशासाठीं ?

**विनोदिनी**—कोणाला ठाऊक !–पण एक गोष्ट मात्र खरी. ज्या क्षणी त्यानं मला बोलून दाखविलं, माझ्यावर तो प्रेम करतो त्याच क्षणीं माझीं प्रचंड भूक, एका क्षणांतच, जशी काहीं शांत झाली ! मनाला वाटलं, आतां माझी सारी तहान-भूक निमाली. आतां माझी कोणतीहि इच्छा-कामना शिल्लक उरली नाहीं ! मी तृप्त झालें. मला शांति मिळाली.

**रोहिणी**:—ही झाली एखाद्या नीति–कथेंतल्या सत्प्रवृत्त नायिकेची गोष्ट.—पण गोविंदलालचा हा हुंकार जरा कान देऊन ऐकतर खरा!

**गोविंदलाल**:—रोहिणी, थांब! एकदां तूं जीव द्यायला निघाली होतीस. पुन्हां तसं करण्याचं साहस आहे तुझ्या अगीं?

**रोहिणी**:—नशीबांत होतं तें झालं!–आणखी मरायचंच असलं तर मरीनहि!

**गोविंदलाल**:—तर मग उभी रहा, हालूं नकोस. कोणत्याप्रकारें मरणं आवडेल तुला?

**रोहिणी**:—(आपल्या मनाशी)–पण, मी मरूं कशासाठीं? फार झालं तर हा माझा त्याग करील,–करो. ह्याचा विसर मला कधीहि पडणार नाही हें खरं;–पण तेवढयासाठी मरूं कशाला मी? ह्याची मनांतल्या मनांत मी पूजा करीत राहीन, दुःख कोसळलं म्हणजे ह्याची आठवण करून जिवाला विरंगुळा निर्माण करीन, ह्या प्रसादपुराचा सुखराशीचं नित्य जतन करीन, ह्यांतहि कमी सुख का आहे? ह्यांतहि आशा आहेच ना! मी मरूं कशाला? [ उघड ] मला मरायचं नाहीं! मला मारूं नको! पायाशीं आश्रय द्यायचा नसेल तर मला जायला सांग हवं तर, पण मला मारूं नको.

**गोविंद**:—मी तुला मोकळेंच करतों!—

**रोहिणी**:—मारूं नकोस, मला मारूं नकोस! माझं नवं वय नवं सुख! मी पुन्हां तुझ्या दृष्टीपुढें येणार नाहीं, पुन्हां तुझ्या वाटेस जाणार नाहीं.–ही मी निघालें बघ. मला मारूं नकोस.

[ पिस्तुलाचा आवाज ]

**रोहिणीः**—ऐकलंस ?

**विनोदिनीः**—किती निष्ठुर !—प्रेमाचा किती शोचनीय परिणाम झाला हा !

**रोहिणीः**—तुझ्यापेक्षांहि ? –किरणमयीपेक्षांहि ? तारुण्यांतच योगिनी बनून, अन्नपूर्णेचा हात धरून तूं निघून गेलीस काशीला. जन्मभर नास्तिकपणांत घालविल्यानंतर अंतकाळीं किरणमयीला परमेश्वर आठवला. उपेन्द्र जेव्हां वारला, तेव्हां मग तिला निवांत झोंपच लागली म्हणा ना ! कुठें गेली मग तिच्या डोळ्यांतली ती विद्युद्दीप्ति ?–कुठें गेली ती तिखट धारेची बुद्धि ? ही अवस्था मृत्यूपेक्षांहि अधिक भयंकर नाहीं का ?

[ कृष्णकांत प्रवेश करतो ]

**कृष्णकांतः**—माझी आफूची डबी कुठें आहे, ठाऊक आहे ?

**रोहिणीः**—मला ठाऊक नाहीं, आजोबा. माझं नांव घेऊं नका.

**कृष्णकांतः**—तूं माझ्या खोलींत कशी ?

**रोहिणीः**—नाहीं, खरंच मी घेतली नाही तुमची डबी ! आफूचं मी काय करीन घेऊन ?

**कृष्णकांतः**—तूं काय वाटेल तें करशील !-तूंच माझं मृत्युपत्र चोरलं होतस ना !

**रोहिणीः**—पण आफू म्हणजे मृत्युपत्र थोडंच आहे !

**किरणः**—तुमच्या हाताच्या मुठींत तें काय आहे, आजोबा ?–आफूच्या डबीसारखंच कांही तरी दिसतं आहे.

**कृष्णकांतः**—खरंच कीं !-आतां हें पहा. डबी आहे माझ्या हातांत, अन शोधीत हिंडतो आहें सगळीकडे !

[ सारे "हो-हो" करून हंसतात ]

**कृष्णकांत**:— आज पुन्हां अश्या सकाळच्या प्रहरीं तुमची सभा कशासाठी भरली आहे, विनोदिनी ?

**विनोदिनी**:— कांही नाहीं.—आपल्या अश्याच गप्पा करीत बसलों आहोंत.

**कृष्णकांत**:— असा विषय तरी कोणता मिळाला आहे तुम्हाला ? —थोडी थोडी आफूची गोळी घ्या. आफू म्हणजे गप्पाष्टकांची बैठक रंगायचं औषध आहे.

**किरण**:—ठीक आहे. आफूहि खाऊं. सारं कांही तर पाहून चुकलों आहोंतच. आतां तुमच्या जवळून हा एवढा मंत्रहि शिकून घ्यायला हरकत नाही.

[ सारे हंसतात ]

**रोहिणी**:—आजोबा, आतां तुम्ही लग्न करून टाका !

**कृष्णकांत**:—( आफूची गोळी तोंडांत टाकून ) काय पण गोष्ट सुचविली आहेस !

**रोहिणी**:—तुम्हाला कोण आवडते, सांगा पाहूं ? विनोदिनी की किरणमयी ?

**कृष्णकांत**:—अग, आवडीनिवडीचं आतां माझं वय का आहे ? आतां तर ज्या कोणत्या ठाणावर हें माकड बांधतां येईल, तेंच उत्तम !

**रोहिणी**:—पाहिलंत, आजोबा किती उदार आहेत !— ( कृष्ण-कांताला उद्देशून ) तरी पण आजोबा, उमेदवार जिथें उभे राहिलेच आहेत, तिथें त्यांच्यापैकी कोणातरी एकाला पसंद करावंच लागेल, नाहीं का ?

**कृष्णकांत**:— असं म्हणतेस ? तर मग जरा थांब. विनोदिनी, किरणमयी, अश्या माझ्या समोर येऊन उभ्या रहा. हं, ह्या इथें.

अस. ! ठीक. आतां सांग. विनोदिनी, तुला कोण कोणता स्वयंपाक झकास करतां येतो ?

**विनोदिनी**:—स्वयंपाक ?--म्हणजे ? मला तुमच्या घरांत स्वयं-पाकीण म्हणुन ठेवणार कीं काय ?

**कृष्णकांत**:—बरं. तूं ग किरणमयी ?--उपेन्द्राला तर किती तरी वेळां मारे पुऱ्या तळून तळून खाऊं घातल्या आहेस तूं ! मलाहि तश्याच खाऊं घालशील का तूं ?

**किरणमयी**:—माझं अडलं आहे !

**कृष्णकांत**:—( हंसत )—मग बाबा मी लग्न करूं कोणत्या सुखासाठीं ? नाहीं येत तुला चिलीम भरतां;– नाहीं येत स्वयपाक पाणी ! मग तुला घेऊन मी करूं काय ?

**किरण**:—तर मग लग्न करण्यांत अर्थ नाहीं तुम्ही, आजोबा ! त्या पेक्षां, हे थंडीचे दिवस आहेत. तुम्ही आपले उन्हाकडे पाठ करून बसा. आम्ही तुमच्या डोक्यावरचे पांढरे केस वेंचून काढतों, या.

**कृष्णकांत**:—तेंच उत्तम !

[ सारे हंसतात ]

[ कांही क्षणापुरतां संगीत-सेतु ]

**निवेदक**:—ज्या ठिकाणीं पूर्वी गोविंदलालचें प्रमोदोद्यान होतें, त्या ठिकाणीं आतां निबिड अरण्य वाढलें आहे. त्याच ठिकाणीं, गोविंदलालच्या बहिणीचा नवरा शचीकांत आजकाल रोज फिरायला येत असतो, आणि त्याच ठिकाणीं बसून भ्रमरचें चिंतन करीत असतो. चिंतन करतां करतां त्यानें पुन्हां त्याच ठिकाणीं उद्यान

बनवायला आरंभ केला. पुन्हा त्याने एक सुंदर कठडा बनविला, पुष्करिणींत उतरता यावें म्हणून काळ्या दगडाच्या पायऱ्या बनविल्या. पुन्हां नवे बाफे तयार करून त्यांत तऱ्हेतऱ्हेचीं झाडें लावलीं; पण त्यांत रंगीबेरंगी फुलांची झाडें त्यानें लावली नाहींत. देशी वृक्षांपकीं त्याने लावलीं बकुळ आणि कामिनी, आणि: विदेशी झाडांत सायप्रस आणि विलो ! प्रमोद भवनाच्या जागीं त्याने एक मंदिर उभारविलें. मंदिरांत कोणत्याहि देवी–देवतेला स्थान 'दिलें नाहीं. पुष्कळ पैसा खर्च करून त्याने भ्रमरची एक सोन्याची मूर्ति गढविली आणि ती आणून तेथें स्थापित केली. स्वर्णप्रतिमेच्या पायाशीं एका दगडावर कोरून ठेवलें होतें:—

**" सुख-दुखांत, दोष-गुणांत, जो भ्रमरसारखीच असेल, तिला मी ही स्वर्ण-प्रतिमा देऊन टाकीन ! "**

**रोहिणी**:–ही काय भानगड आहे, आजोबा ?

[ किरणमयीने तो लेख पुन्हां एकदां वाचला. ]

**किरण**:–ह्याचा अर्थ काय हो, आजोबा ? शचीकांतला काय वाटलं, सोन्याच्या मूर्तिच्या लोभानं जगांतल्या यच्चयावत् स्त्रिया भ्रमरच्या भूमिकेचा अभिनय करूं लागतील ?

**विनोदिनी**:–भ्रमरने अस काय केलं होतं हो आजोबा, कीं ज्यासाठीं ती जगांतल्या सर्व स्त्रीजातीला आदर्शभूत ठरावी ?

**कृष्णकांत**:–भ्रमरनं ?-म्हणजे, म्हणतांतरी काय तुम्ही, पोरीनों ! सुख-दु:खाच्या, दोष-गुणांच्या बाबतींत कोणाशीं तिची तुलना तरी होणं शक्य आहे कां ?

ग्रंथ संग्रहालय
३०८६४

**किरणमयी**:–नाहीं ?–माझी " डोळ्यांतला खडा " आशातरी तिच्यापेक्षां कोणत्या बाबतींत कमी आहे, सांगा ? दोघीहि आपापल्या पतींना अडवून ठेवूं शकल्या नाहींत. त्यामुळें दोघींनाहि अनंत दुःख भोगावं लागलं. पण, भ्रमरच्या ठिकाणीं जो दंभ होता, तेवढाहि आशाच्या ठिकाणीं नव्हता, म्हणून तिचा पति तिला परत मिळाला अन् ती नव्याने आपलं जीवन सुरू करूं शकली ! मी विचारतें, भ्रमरपेक्षा माझी आशा कमी कोणत्या दृष्टीने आहे ?

**विनोदिनी**:–मी म्हणते, भ्रमरमध्यें असाधरणत्व काहीं नव्हतंच ! आपल्या बंगाली समाजांत, विशेषें करून त्या काळांत शंभरापैकीं ऐशीं विवाहित स्त्रियांचं नशीब असंच असे. आमच्या समाजांत " विवाह-विच्छेद " मान्य नाहीं. घराच्या बाहेर, अन् घरांत बसूनहि पतिदेवानं वाटेल तसलं दुष्कर्म केलं तरी तें डोळे मिटून सहन करण्यापलीकडे दुसरा उपाय कोणता ? भ्रमरने तेंच केलं, तिच्या जागीं दुसरी कोणी असती तरी तिला देखील तेंच करावं लागलं असतं.

**विनोदिनी**:–मला तर वाटतं, आजोबा वारल्यानंतर गोविंदलाल हट्टान देश सोडून चालता झाला नसता तर त्या गोष्टीवर त्याठिकाणींच शेवटचा पडदा पडून तिचा शेवट झाला असता. आपला पति चारित्र्यहीन आहे ह्या जाणिवेचा पहिला धक्काच काय तो सहन करायला कठिण असतो. तो धक्का भ्रमर सहन करूं शकली नाहीं असंच मला वाटतं. गोविंदलाललाहि संकोचाची कांचणी लागली होती. म्हणजे, गोविंदलाल घरींच राहिला असता तर, घरच्या घरीच तो मजेने आपलं आयुष्य क्रमीत राहूं शकला असता ! आपले सारे प्रयत्न व्यर्थ आहेत हें उमजल्यानंतर भ्रमरने

मग त्याला आडकाठी करण्याचें सोडून दिलें असते. घरकामांत ती मन लावूं लागली असती.

**रोहिणी**:—मला स्वतःलाहि तसंच वाटतं. प्रारंभाला भ्रमरने जरा आततायीपणा केला हें खरं; पण शेवटीं शेवटीं अतिरेक घडला गोविंदलाल कडूनच.–काय तें त्याच वागणं! त्याचंच फळ म्हणजे हा एवढा अनर्थ!

**कृष्णकांत**:—( थट्टेच्या स्वरांत )–तुला देखील असंच वाटतं?

**रोहिणी**:—( रागाच्या स्वरांत ) नाहीं वाटणार?–मी विचारतें तुम्ही तुमच्या तारुण्यांत केलं नाहीं असं गोविंदलालनं काय केलं होत सांगा पाहूं?–मला तर सारंच ठाऊक आहे, आजोबा!–प्रमोद–उद्यानांत तुम्हीं काय काय करीत होतां तें सारं कांहीं मी ऐकलं आहे. आजी कधीं तिकडे लक्षच देत नसत! त्या आपल्या घरांत संसाराच्या साम्राज्ञी होत्या. हा मान आपल्याला पुरे झाला असंच त्यांना वाटत असे. सांगा खरं कीं नाहीं?

**कृणकांत**:—खरं आहे, रोहिणी. सुरुवाती–सुरवातीला बदनामी होत नाहीं असं नाहीं. पण मागाहून ती नाहींशी होऊन जाते. पण गोविंदलाल तर जसा काहीं साऱ्या सीमा ओलांडून गेला होता.

**रोहिणी**:—तो काय माझा अपराध झाला? आपल्या कपाळीं अपरिसीम कलंकाचं चिन्ह लावून घेऊन मी त्यावेळीं मेलें कशासाठीं? काय मिळालं?–गोविंदलालचं तर काहींच बिघडल नाहीं. साक्षीदारांना फोडून त्याच्या सासऱ्यानंच खुनाच्या आरोपांतून त्याची सुटका घडवून आणली कीं नाहीं? त्यानंतर तो संन्यास घेऊन घर सोडून चालता झाला. चांगली हातभर दाढी वाढविली, डोक्यावर

जाटाजूट धारण केला ! आणि मग डोळे उलटे करून, भक्तिगद्‌गद्‌ स्वरांत मारे सांगून गेला,–विषयसंपत्तीपेक्षांहि जें धन अधिक, जें कुबेरालाहि मिळणं शक्य नाहीं, तें मला मिळालं आहे ! ह्या भ्रमरपेक्षांहि जें अधिक मधुर, भ्रमरपेक्षांहि ज अधिक पवित्र, तें मला मिळालं आहे ! जगाने गोविंदलालला "धन्य ! धन्य !' म्हटलं. आणि सर्वांचा राग आदळला शेवटीं ह्या पापी रोहिणीच्या डोक्यावर ! जसा कांही सारा अपराध माझाच होता !

**विनोदिनीः**–असंच होतं रोहिणी, जगांत असंच चालतं.– आशा महेन्द्राला धरून ठेवूं शकली नाहीं. तिचं स्वर्गीय प्रेम सुद्धां पाहतां पाहतां श्रांत झाल्यासारखं होऊन गेलं. हा काय माझा दोष ? महिनोंगणती, काहीं सुद्धां पदरांत न पडतां महेन्द्र माझ्या मागें पाळीव कुत्र्यासारखा घोटाळत राहिला, तो कांहीं माझा अपराध नव्हता. पण लोकांनी दोष कुणाला दिला ?–मलाच ! राजलक्ष्मी, अन्नपूर्णा, आशाची गोष्ट सोडा.–बिहारी भाउजींनी शेवटीं मलाच त्याबद्दल दोषी ठरवलं ! ते सुद्धां मला क्षमा करूं शकले नाहींत.--हें असंच होत असतं रोहिणी, असंच होत असतं !

**किरणः**–हा आरोप माझ्या माथीं मारायला जागा नाहीं. उपेन्द्रावर प्रेम करून गुरें हाकलण्याच्या बाबतींतल्या अधिकारांत मी हस्तक्षेप केला असेल हे कबूल. पण दिवाकरला घेऊन पळून जाण्यांत तर मी कोणाच्याच कोणत्याच प्रकारच्या हक्काचा उपमर्द केला नव्हता. तरीहि परिणाम झाला तोच. फार काय पण त्रिकालदर्शी, सत्यनिष्ठ उपेन्द्रालाहि मला क्षमा करायचं जमूं शकलं नाहीं ! मला तर बाई शंकाच वाटते ! जी सावित्री माझ्या तुलनेने

मातीचं ढेकूळ, तिला देखील बहिण म्हणून त्यांनी जवळ केलं, पण मला नाहीं ! कां बरं ? तुमच्या समाजाच्या कायद्याचं हें स्वरूप मला समजावून सांगा !

**कृष्णकांतः**–तें मला सांगता येणं शक्य नाहीं !–रोहिणी, माझी आफूची डबी ?

**रोहिणीः**–पुन्हां हरवली ?

**कृष्णकांतः**–तीच तर शोधतों आहे.

**विनोदिनीः**–हा तर लपणा-शिपणीचा खेळ झाला, आजोबा

**कृष्णकांतः**–( हंसत ) खरं आहे. ठाऊक आहे तुला, ह्यालाच म्हणतात प्रेम ! अन् ह्यांत नाहींत तुमचे ते घोटाळे, मारहाण नाहीं, खुनाखुनी नाहीं, ओढा–ताण नाहीं, जळफळाट नाहीं !-फार चांगलं आहे हें !

**किरणः**–पण एक गोष्ट ह्यांतहि आहेच. प्रमाणाच्या बाहेर गेलं की घोटाळा ह्यांतहि आलाच !

**कृष्णकांतः**–हां !—मर्यादेचं उल्लंघन येथेंहि चालायचं नाहींच ! पण एक आहे. ज्यांना, संवय असते ना, ते प्रेमाच्या व्यवहारांतहि कधीं मर्यादा सोडून वागत नाहींत. आफूबाज इसम फार आफू खाऊन मेल्याचं कधीं ऐकलं आहे कोणी ?

[ सारे हांसतात ]

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ........
क्रमांक ........
नों दि.
IRBK-0103398

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
३३९८ नों दि ............
पु. क्र. ....................
वि. ....वा: प... क. ............

# नागपूर प्रकाशन,

सीताबर्डी, नागपूर

★

## प्रकाशित वाङ्मय


| | | | |
|---|---|---|---|
| १ माझें कादंबरी लेखन | १॥ | १८ तेरी चूप मेरी चूप | २ |
| २ वीणा | ३ | १९ दोन प्रख्यात युद्धतंत्रें | २ |
| ३ लढवय्ये | ३ | २० सन १८५७ चें स्वा. यु. | -॥- |
| ४ शककर्ता शालिवाहन | २॥ | २१ नवीं मूल्यें | ४ |
| ५ परामर्श | ३ | २२ सखी | २॥। |
| ६ प्रमद्वरा | २॥ | २३ सावलीच्या उन्हांत | ३ |
| ७ द्राविडी प्राणायाम | २। | २४ जीवनप्रवाह | २॥ |
| ८ अमावास्या | २॥ | २५ हंसदूत | २। |
| ९ कंगाल | २। | २६ मार्क्सवादी अभ्यासक्रम | १॥ |
| १० अडेलतट्टू | ४ | २७ तिसरें राज्य | ॥= |
| ११ प्रत्यय | २॥ | २८ इंदिरा | २॥। |
| १२ पुन्हां एकदां | ४ | २९ गोल देऊळ | ३ |
| १३ माझी शाला | १॥ | ३० दूर कुठें तरी | २॥। |
| १४ मृगाचा पाऊस | २ | ३१ जगाला कळलं पाहिजे | ३॥ |
| १५ दोन घडीचा डाव | ३। | ३२ कालसमुद्रांतील रत्नें | ४ |
| १६ म्हणे लढाई संपली | १॥ | ३३ लकेरी | २॥ |
| १७ लांब लांब सांवल्या | २ | ३४ मधु | २॥ |
| | | ३५ विचित्रिता | २ |


★

★


म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
दिनांक
अ. क्र.